CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर | सोमवार, १६ मार्च २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १०७ । पाने १२ । किंमत रु. ६/-



## करजखेडा पाटीजवळ भीषण अपघात

# एकाचा जागीच मृत्यू, चारजण गंभीर

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

तुळजापूर-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील करजखेडा पाटीजवळ रविवारी भीषण आणि तिहेरी अपघात घडून एकाचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. नियंत्रण सुटलेल्या बोलेरोने प्रथम समोरून येणाऱ्या वॅगनआर कारला जोरदार धडक दिली. त्यानंतर बोलेरो पलटी होऊन रस्त्याच्या दुसर्या लेनमध्ये जाऊन स्विफ्ट कारवर आदळली. या तिहेरी धडकेत अपघात अत्यंत भीषण झाला असून एकाचा जागीच मृत्यू झाला. तसेच चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात होंडा सिटी कारमधील जीवन वसंत पाटील (वय ७०) यांचा मृत्यू झाला. तर नित्यानंद मोहन बुके (वय ३५), मोहन बुके (वय ५५), अर्जुन



पटुळे (वय ५५) व आणखी एक अनोळखी पुरुष (अंदाजे वय ४०) असे चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी शासकीय जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे हलविण्यात आले आहे.

अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की काही काळ घटनास्थळी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच बेंबळी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे पाठविण्याची व्यवस्था केली.

दरम्यान, अपघातामुळे काही काळ तुळजापूर-लातूर मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. याप्रकरणी अधिकचा तपास पोलीस करीत आहेत.

### महामार्गावर मृत्यूचे तांडव

या विचित्र आणि तिहेरी अपघातात तीनही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. अपघातातील मृताची संख्या एक असून त्यांचा जागीच प्राण गेल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच, अन्य चार जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने तातडीने रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### तांदुळवाडीत महिलांना रमजान किटचे वाटप

**वैराग, दि. १५ मार्च-**

पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून एकता महिला मंचच्या बार्शी तालुक्यातील तांदुळवाडी येथे गरजू मुस्लिम महिलांना जीवनावश्यक खाद्यपदार्थांच्या किटचे वाटप करण्यात आले. मुस्लिम धर्मात रमजान हा अत्यंत पवित्र महिना मानला जातो. या काळात महिनाभर अत्यंत निष्ठेने रोजे (उपवास) पाळले जातात. अनेक कष्टकरी आणि गरजू कुटुंबांना सण साजरा करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. हीच बाब ओळखून एकता महिला मंचाचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनाखाली हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमासाठी उड्डाण सोशल फाउंडेशन, बार्शी यांचे सहकार्य लाभले. उडान फाउंडेशन अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष जाफर शेख, कार्याध्यक्ष शकील मुलाणी, सचिव जमील खान, सहसचिव अख्तर शेख,मोहसीन पठाण,साजन शेख, राजू शिकलकर, तोसिफ बागवान, मुदस्सर सय्यद, सादिक काझी, रियाज बागवान, अकिल मुजावर, रियाज बागवान मिरचीवली, अल्ताफ शेख, इंजिनिअर एजाज शेख, मोईन नाईकवाडी, ॲड. रियाज शेख, मुन्ना बागवान,जावेद शेख, युवा उडान फाउंडेशन अध्यक्ष सलमान बागवान, साहिल मुजावर उपस्थित होते. तसेच एकता महिला मंच तांदुळवाडीच्या नूरजहाँ शेख, शमा शेख, मैमुना शेख, नूरजहाँ सिजर शेख, अनवरबी शेख, बिस्मिल्ला मुलाणी, जमेला शेख, शाबिया काजी या सदस्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



### सायकलवर जाऊन मरवडेतील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची स्वच्छता

**मंगळवेढा, दि. १५ मार्च-**


पर्यावरण रक्षण, आरोग्य संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या मंगळवेढ्यातील वारी परिवार सायकल क्लबच्या वतीने रविवारी सायकलवरती जाऊन मरवडे येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळा व परिसराची स्वच्छता करण्यात आली सद्य स्थितीत छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास सुरु असताना सायकलवरती जाऊन शंभू भक्तांनी पुतळ्याची स्वच्छता करून व ध्येयमंत्र घेऊन खऱ्या अर्थाने छत्रपतींना अभिवादन केले आहे तसेच निसर्गाप्रती आपली जबाबदारी प्रत्येकाने पार पाडली पाहिजे यासाठी पक्षी वाचवा,निसर्ग वाचवा,सायकल चालवा,इंधन वाचवा हा संदेश देण्यासाठी वारी परिवार सायकल क्लबने स्तुत्य उपक्रम राबविला आहे यावेळी पर्यावरण रक्षणानार्थ काढण्यात आलेल्या सदर सायकल राईडमध्ये वारी परिवार सायकल क्लबचे अध्यक्ष स्वप्नील टेकाळे, राहुल सावंजी, सचिन साळुंखे, डॉ. राहुल शेजाळ, नंदकुमार नागणे, विष्णू भोसले, सिद्धेश्वर डोंगरे, प्रफुल्ल सोमदळे,अविनाश जाधव,गणेश मोरे,नागेश डोंगरे, प्रा. विनायक कलुबर्मे आदींनी सहभाग नोंदविला.

### राजरत्न मंडळ होनमुर्गी जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी शिंदे

**सोलापूर, दि. १५ मार्च-**



राजरत्न तरुण मंडळ होनमुर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची बैठक लक्ष्मण वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाल पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी शुध्दोदन शिंदे, उपध्यक्ष नितेश गासयकवाड, सचिव मारुती कंटे, सहसचिव योगेश कांबळे, खजिनदार अर्जुन काळे, सहखजिनदार सुनील गायकवाड, कार्याध्यक्ष अमोल कांबळे, मिरवणूक प्रमुख चंद्रकांत वाघमारे, राहुल गायकवाड, शिवानंद वाघमारे, सुधाकर काळे यांची निवड करण्यात आली. यावेळी अमोगसिध्द वाघमारे, महेश वाघमारे, परमेश्वर वाघमारे, संतोष गायकवाड, बबलू वाघमारे, संतोष गायकवाड, अमोगसिध्द गायकवाड, आप्पाशा काळे, सिध्दू बनसो, शिवलंत वाघमारे, राजू वाघमारे, प्रकाश वाघमारे, मल्लेशी वाघमारे, कल्लप्पा गायकवाड, मुतण्णा वाघमारे उपस्थित होते.



### सिद्रामप्पा हत्तुरे शाळेत फूड फेस्टिव्हल

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत फूड फेस्टिव्हल उत्साहात पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन जाधव, प्रमुख अतिथ म्हणून श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, संगीता हुमनाबादकर, सुधारक कामशेट्टी यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन झाले. मान्यवरांच्या हस्ते फूड फेस्टिव्हल कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांमार्फत बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांची मान्यवरांच्या हस्ते पाहणी करण्यात आली. यामध्ये एकूण १६ स्टॉल्स होते. सूत्रसंचालन मनिषा पाटील यांनी केले तर आभार ज्योती भालके यांनी मानले.

### पत्रकार प्रसाद पाटील यांचे निधन

**बार्शी दि. १५ मार्च-**



पानगाव येथील पत्रकार प्रसाद उर्फ पिंटू पाटील (वय ५३) यांचे शनिवारी हृदय विकाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई पुतण्या असा परिवार आहे. पत्रकारिता बरोबरच त्यांनी तंटामुक्ती, वृक्ष संवर्धन, एक गाव एक गणपती, जि.प. शाळा वाचवा, मतदान जागृती अशा विविध शासकीय उपक्रमात त्यांचा पुढाकार असायचा.

# बार्शी लोकअदालतीत २ हजार ३७० प्रकरणे निकाली

- ३ कोटी ४९ लाखांची वसुली
- ११ हजारांहून अधिक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ मार्च-**



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीत तब्बल २३७० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली असून ३ कोटी ४९ लाख २४ हजार ५८६ रुपयांची वसुली करण्यात आली.

ही राष्ट्रीय महालोकअदालत तालुका विधी सेवा समिती बार्शी व बार्शी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या उपक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे अध्यक्ष एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शन व पी. पी. पेटकर यांचे सहकार्य लाभले. या महालोकअदालतीत बार्शी न्यायालयातील ४०४० प्रलंबित दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे तसेच ७१२४ दाखलपूर्व प्रकरणे अशी ११,१६४ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी मोठ्या प्रमाणावर प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या महालोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष रणजित गुंड, पॅनल विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी, विविध बँका व फायनान्स कंपन्या, पंचायत समिती बार्शी तसेच महावितरणचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य लाभले. या महालोकअदालतीत मोठ्या संख्येने पक्षकारांनी सहभाग नोंदवून प्रकरणे तडजोडीने निकाली काढत न्यायालयीन वेळ व खर्चाची बचत केल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

**पाच न्यायालयीन पॅनलद्वारे सुनावणी**

या महालोकअदालतीसाठी बार्शी न्यायालयात पाच पॅनल तयार करण्यात आले होते. त्यामध्ये- १) जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे २) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पी. बी. लोखंडे ३) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी. व्ही. राऊत ४) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एच. यू. पाटील ५) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आर. पी. बागडे यांचा समावेश होता. तसेच सह दिवाणी न्यायाधीश जी. एस. पाटील यांच्या न्यायालयात गुन्हा कबुलीचे विशेष न्यायालयही चालविण्यात आले.

**विशेष उल्लेखनीय प्रकरणे**

पॅनल क्रमांक २ मधील दिवाणी न्यायाधीश पी. बी. लोखंडे यांच्या न्यायालयात ६८ लाख ३३ हजार ५७३ रुपयांचा रक्कम वसुलीचा दावा तडजोडीने निकाली काढण्यात आला. तसेच पॅनल क्रमांक ३ मधील सह दिवाणी न्यायाधीश पी. व्ही. राऊत यांनी वयोवृद्ध पक्षकार राजाराम चापले यांच्या प्रकरणात स्वतः दालनाबाहेर जाऊन तडजोडीची प्रक्रिया पूर्ण केली. पॅनल क्रमांक ५ मधील सह दिवाणी न्यायाधीश आर. पी. बागडे यांनी किडनी आजाराने त्रस्त असलेल्या पक्षकार संजय नानासाहेब कुरुंद यांच्या प्रकरणातही दालनाबाहेर जाऊन तडजोडीची प्रक्रिया पूर्ण केली.

| वसुलीची आकडेवारी | |
|---|---|
| प्रलंबित प्रकरण | १ कोटी ६४ लाख ९२ हजार ५६४ रुपये. |
| दाखलपूर्व प्रकरण | १ कोटी ८४ लाख ३२ हजार २२ रुपये. |
| एकूण वसुली | ३ कोटी ४९ लाख २४ हजार ५८६ रुपये |

| विविध प्रकारची प्रकरणे निकाली | |
|---|---|
| मोटार अपघात भरपाई प्रकरण- १ प्रकरण | १७ लाख २५ हजार रुपये भरपाई मंजूर. |
| एन.आय.ॲक्ट कलम १३८ अंतर्गत- १८ प्रकरणे | ३ लाख ६८ हजार ३५४ रुपये वसुली |
| रक्कम वसुलीची प्रकरणे १२ प्रकरणे | १ कोटी १५ लाख ८ हजार २२७ रु. वसुली |
| तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे | ५ प्रकरणे |
| कबुलीची प्रकरणे | ९४ प्रकरणे- १ लाख ३३ हजार ५०० रुपये दंड वसूल |

## धारसंग जि.प. शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

जिल्हा परिषद प्राथमिक धारसंग शाळेत वार्षिक स्नेह संमेलन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन पंचायत समिती सदस्य रश्मी हिप्परगी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन सुरेश गड्डी, प्रशांत बंदे, एपीआय सुनील खेड, अजित सुतार, भिमाशंकर कुंभार, तम्मण्णा पाटील, सागर हिप्परगी, संगीत पूजा, शिवनिंगप्पा अरवत, सुरेश पाटील, गिरमल्लया स्वामी, सिध्दाराम भानुमते, कल्लप्पा पुजारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.

यावेळी मराठी, कन्नड व देशभक्ती गीतावर नृत्य, व्यसन मुक्तीवर नाट्य करुन उपस्थित मान्यवरांना व पालकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मान्यवरांनी व पालकांनी शाळेला ७१ हजार ७२२ रुपयांची मदत केली. सुरेश गड्डी यांनी शाळेला २१ हजार, सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य मिळून २१ हजार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष १० हजार, डॉ. सागर हिप्परगी पाच हजार, अजित सुतार ५ हजार १५१, सिध्दाराम भानुमते पाच हजार १५१, सुनल खेड २५००, सुरेश पाटील २१००, अक्षय गंदगे २५००, लक्ष्मण कोळी यांच्याकडून शाळेतील सर्व मुलांसाठी टॉय बेल्ट देणार असल्याचे सांगितले. ग्रामस्थ, माजी शिक्षक व पहुणे यांच्याकडून १६ हजार ४९८ रुपयांच मदत मिळाली. शाळेसाठी माज विद्यार्थी कल्लप्पा पुजारी यांच्याकडून शाळा रंगरंगोटी व शाळा डिजिटल करण्यासाठ ७५ हजारांची मदत करण्याचे सांगितले. यावेळी नरोणे, कोळी, उमराणी, देसाई, कांबळे, शिंदे, कोरे, पुजारी, पाटील, भानुमते, उपस्थित होते. सूत्रसंचालन बिराजदार यांनी केले. सदरखेड व कोळी यांनी कार्यक्रम यशस्वीसाठी परिश्रम घेतले.

## महसूल विभागाने संवेदनशिलता ठेवून लाभार्थ्यांची कामे करावीत : संजयमामा शिंदे

**निमगाव टें येथे महाराजस्व अभियान**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १५ मार्च-**



शेतक-यांची शेतीविषयक अवजारासाठी लागणारे दाखले, विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचे दाखले, सर्वसामान्यांना आरोग्याच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक दाखले, ७/१२ च्या नोंदी, वर्ग दोनच्या वर्ग एक नोंदी, वारसाच्या नोंदी असतील याबाबत नागरीकांच्या अनेक तक्रारी असून याबाबत महसूल विभागाने संवेदनशिलता ठेवून लवकरात लवकर विलंब न लावता सर्वांची कामे करावीत, असे म्हणून शासन नियम सुरळीत व सुटसुटीत असल्याने गावोगावचे पानंद रस्त्यासाठी महसूल विभागाने जास्तीत जास्त काम करून सर्व रस्ते किमान रेकॉर्डवरती तरी घ्यावेत, असे प्रतीपादन माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत जिल्हाधिकारी सोलापूर व तहसीलदार माढा यांचे मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी कार्यालय निमगाव टें (ता. माढा) येथे समाधान शिबिर आयोजित केले होते, त्यावेळी माजी आमदार संजयमामा शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपिठावर जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, पंचायत समिती सभापती पंडीत देशमुख, उल्लास राऊत, सदस्य प्रतिनीधी दिगंबर माळी, नायब तहसिलदार पांडूरंग भडकवाड,निवासी नायब तहसिलदार विजय कवडे, संजय गांधी योजनेचे नायब तहसिलदार लक्ष्मण पवार, विस्तार अधिकारी ए.टि.शिंदे, मंडलअधिकारी संदिप लटके, ग्रामविकास अधिकारी नवनाथ दोंड, निमगाव टें ग्राम महसूल अधिकारी प्रिती काळे, शामल जमादार, सिध्देश्वर घुघे, चंद्रकुमार बुटे, श्रावण भोये उपस्थीत होते. प्रथमता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतीमेचे पुजन नूतन पं.स.सभापती पंडीत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

| शिबिरात दिलेल्या लाभांची आकडेवारी | |
|---|---|
| उत्पन्न दाखले | ७१ |
| जात प्रमाणपत्र | ७ |
| नॉन क्रिमीलेअर | १६ |
| प्रतिज्ञापत्र | ४६ |
| सातबारा उतारे | १२६ |
| ८ अ उतारे | ७१ |
| श्रावण बाळ प्रकरणे | ८ |
| वारस नोंद प्रकरण | १ |
| अपाक शेरा कमी करणे | १ |

## पिलीव आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १५ मार्च-**



आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकारतर्फे महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशव्यापी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम सुरू झाला आहे.

या अनुषंगाने सोलापूर जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीव येथे सदर मोहिमेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीव येथे तीन लाभार्थ्यांनी या लसीकरणाचा लाभ घेतला. जिल्हा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या मोहिमेअंतर्गत १४ वर्षे पूर्ण पण १५ वर्षांखालील मुलींसाठी एचपीव्ही लस मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मोहीम ही पुढील तीन महिने चालणार आहे. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत मोफत लसीकरण सत्र सुरु राहतील. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एचपीव्ही संक्रमण हे गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण असून, योग्य वयात दिलेली एचपीव्ही लस हा त्याविरुद्धचा प्रभावी उपाय आहे.

पिलीव अंतर्गत येणाऱ्या सर्व मुलींच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी ही मोफत लसीकरण मोहीम राबवत आहे, अशी माहिती पिलीवचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमेय फुले यांनी दिली.

## जनसेना पक्षाची सदस्य नोंदणी १७ मार्चपर्यंत

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

आंधप्रदेश येथील उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांची जनसेना पक्षाची नोंदणी सध्या सुरु आहे. त्यांची कालावधी १७ मार्चपर्यंत आहेत. त्यासाठी युवकांनी व नागरिकांनी याचा फायदा घ्यावा, असे आवाहन अतुल्य सेवा प्रतिष्ठान जनसंपर्क कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

सोलापूर शहरातील पवनकल्याण फॅन्स असलेल्या तसेच जनसेना पक्षावर विश्वास असणाऱ्या युवकांनी व नागरिकांनी या सदस्य नोंदणीचा अवश्य लाभ घ्यावे. ज्यांना सदस्य नोंदणी करायचे आहे. त्यांनी पूर्व विभाग श्री दत्त मंदिर देवस्थान गाळा नंबर २ येथे अतुल्य सेवा प्रतिष्ठान जनसंपर्क कार्यालय येथे श्रीनिवास बिटला (मो. ९८३४८५०२४२) व अनिल कोंडा (मो.९२७१२८३०१६) यांच्याशी संपर्क करून नावे नोंदवावीत, असे आवाहन जनसेना पक्षाच्यावतीने करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानाला बार्शीत उत्स्फूर्त प्रतिसाद

- नारी, पानगाव व सुर्डी मंडळात २५५५ नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ
- एकाच ठिकाणी महसूल, आरोग्य, पंचायत समिती आदी विभागांच्या सेवा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ मार्च-**



महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानात येथील विविध मंडळांमध्ये ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अंतर्गत १४ मार्च रोजी नारी, पानगाव आणि सुर्डी मंडळात सकाळी ९ ते सायं. ५ या कालावधीतील या शिबिरात सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे त्वरित निराकरण करण्यात आले.

**पानगांव मंडळ**

पानगांव येथील शिबिरास पंचायत समिती सभापती मीनाक्षीताई रोंगे, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदूणे, तहसीलदार एफ.आर. शेख यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह सुमारे ४०० ते ५०० ग्रामस्थ उपस्थित होते.

**नारी मंडळ**

नारी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिबिरात नायब तहसीलदार रविंद सानप, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच स्थानिक सरपंच उपस्थित होते. मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आशा वर्कर तसेच विविध विभागातील कर्मचारी यांची उपस्थिती होती. या शिबिरात ६०० ते ७०० लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवला. नारी मंडळातील कारी गावातील शाळेत विशेष शिबीर घेऊन सुमारे १७० दाखले वितरीत करण्यात आले.

**सुर्डी मंडळ**

सुर्डी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिबिरात निवासी नायब तहसीलदार, जिल्हा परिषद सदस्य सुजाता डोईफोडे, पंचायत समिती सदस्य विमल काटे आदी उपस्थित होते. मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, आरोग्य सेवक व विविध विभागांचे कर्मचारी सहभागी झाले. या शिबिरात ५०० ते ६०० ग्रामस्थांनी सहभाग घेतला. शिबिरामध्ये विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी महसूल विभागासह आरोग्य, पंचायत समिती, आधार सेवा केंद्र आदी विभागांनी सहभाग नोंदवला. आरोग्य विभागामार्फत नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. १८ वर्षाखालील मुलांचे नवीन आधार कार्ड व नाव, पत्ता, जन्म तारीख दुरुस्ती करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी प्रलंबित प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. अधिकार अभिलेखातील तांत्रिक चुका दुरुस्त करण्यात आल्या. सामाजिक सहाय्य योजनेंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

पंचायत समितीमार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट देण्यात आले. घरकुलासाठी वाळू पास वितरण, महा-डीबीटी अंतर्गत शेतीसाठी साहित्य वतरण तसेच ट्रॅक्टरचे वितरण करण्यात आले. गरोदर व स्तनदा मातांना बेबी किट देऊन आरोग्य तपासणी करण्यात आली. अपाक खातेदारांचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर अपाक शेरा कमी करण्यात आला.

| फेरफार निकाली काढले | |
|---|---|
| ११३, ७/१२ मधील दुरुस्त्या | ४१ |
| डिजिटल ७/१२ उपलब्ध | ४३० |
| ८-अ उतारे वितरीत | २९७ |
| विविध प्रमाणपत्रे (उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रिमीलेअर इ.) | १०१० |
| एक खिडकी अंतर्गत निकाली अर्ज | ६५४ |
| भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके | ५ |
| अकृषक प्रकरणी कमी-जास्त पत्रके | ५ |

CMYK



प्रेसिडेंट ट्रम्प यांच्या दबावामुळेच मोदींनी ऑपरेशन सिंदूर अचानक मागे घेतले. आम्ही कोणाकडून तेल खरेदी करायचे, याची परवानगी आता ट्रम्प देत आहेत, हा भारताचा अपमान आहे.

**संजय राऊत**, उबाठा खासदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोमवार, १६ मार्च २०२६ ३



भाजपा आणि काँग्रेसप्रमाणेच समाजवादी पार्टीही बहुजन समाजाच्या हितासाठी काम करणारा पक्ष नाही. या पक्षांकडून बहुजन समाजाचे हित आणि कल्याण करण्याची आशा ठेवणे म्हणजे वाळवंटात पाणी शोधण्यासारखे आहे.

**मायावती**, बसपा प्रमुख

## विचारपुष्प



निसर्गनिर्मित सगळ्या घटकांमध्ये सहअस्तित्वाची रचना आहे. सगळे पदार्थ एकमेकांस पूरक आहेत; परंतु निसर्गाचे हे देणे उपयोगात येत नाही. या अनैसर्गिक आणि अनाचारी अव्यवस्थेचे निराकरण करण्यासाठी आमच्या तत्त्वज्ञांनी एकात्मतेची जीवनदृष्टी दिली आहे. निसर्गाने मानवाला नवनिर्माण करण्याच्या क्षमतेचे वरदान दिले आहे. या वरदानामुळेच माणूस निसर्गाच्या साधनसामग्रीचा उपयोग करून जीवन अधिकाधिक सुखमय करतो आहे.

भारतीय तत्त्वज्ञान हे एकात्मतेच्या जीवनदृष्टीवर आधारित आहे.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# बिगुल वाजला

## आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, पुडुचेरीत विधानसभा निवडणुका घोषित

| राज्य | टप्पे | जागा | मतदार | मतदान |
|---|---|---|---|---|
| पश्चिम बंगाल | २ | २९४ | ६.४४ कोटी | २३ आणि २९ एप्रिल |
| तामिळनाडू | १ | २३४ | ५.६७ कोटी | २३ एप्रिल |
| केरळ | १ | १४० | २.७० कोटी | ९ एप्रिल |
| आसाम | १ | १२६ | २.५० कोटी | ९ एप्रिल |
| पुडुचेरी | १ | ३० | ९.४० लाख | ९ एप्रिल |

४ मे रोजी होणार मतमोजणी

◆ **नवी दिल्ली, १५ मार्च**

निवडणूक आयोगाने आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केंद्रशासित प्रदेश पुडुचेरी येथे होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तारखा रविवारी येथे झालेल्या पत्रपरिषदेत जाहीर केल्या. महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामतीत २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे.

तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये मतदान दोन टप्प्यांत २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी पार पडेल. केरळ, आसाम आणि पुडुचेरी या तीन राज्यांमध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान घेण्यात येईल. या निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जातील.

या चार राज्यांमध्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात एकूण १७.४ कोटी मतदार आणि ८२४ जागांचा समावेश आहे, असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मागील १२ महिन्यांत निवडणूक आयोगाने पारदर्शकता वाढवण्यासाठी अनेक नवीन उपक्रम राबवले. यातील पहिला उपक्रम 'एसआयआर' हा होता. मतदारयादीत अपात्र व्यक्तीचे नाव राहणार नाही, अशी ही एक उपाययोजना आहे. (वृत्तसंस्था)

# वेश्या व्यवसायाचे रॅकेट उघड; ५ आरोपींना अटक, २५ महिलांची सुटका

## टेंभुर्णीतील कलाकेंद्र संशयाच्या भोवऱ्यात



(सौजन्य : एआय)

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१५ मार्च-**

माढा तालुक्यातील मोडनिंब येथील स्वरांजली कलाकेंद्रात सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाचे रॅकेट उघडकीस आले आहे. यात ५ आरोपींना अटक करण्यात आली तर २५ महिलांची सुटका करण्यात आली. प्रभारी अधिकारी राहुल आत्राम (परिविक्षाधीन भा.पो.से.) यांच्या नेतृत्वाखाली टाकलेल्या छाप्यातंर्गत ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, टेंभुर्णी शहरातील जंजिरा हॉटेल-लॉजवर गेल्या दोन महिन्यांपुर्वी कारवाई करण्यात आली होती. या दोन्ही कारवायांचा विचार करता, कलाकेंद्र संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याचे सांगण्यात येते.

मोडनिंब येथील स्वरांजली कलाकेंद्रात परराज्य व परजिल्ह्यातील महिलांना आणून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत कुंटणखाना चालविला जात असल्याची गोपनीय बातमी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत त्या कलाकेंद्रावर छापा टाकला. यात कला केंद्राचे मालक जगन्नाथ तुकाराम घाडगे (रा.अरण, ता.माढा), चालक विशाल लता पवार (वय-२४, रा.जामखेड, ता.अहिल्यानगर), व्यवस्थापक बाळासाहेब गोविंद गिड्डे (वय-६३, रा.अरण, ता.माढा), पार्टी मालकीन छाया बाळासाहेब सुरवसे (वय-३५, रा.आंबेजोगाई, जि.बीड), रिक्षाचालक नितीन चांगदेव चव्हाण (वय-४९, रा. मोडनिंब, ता. माढा) व स्वागत लॉज व्यवस्थापक सिध्दांत सुखदेव गायकवाड (वय-३३, रा.मोडनिंब, ता. माढा) यांचा सहभाग असल्याचे समोर आले.

याप्रकरणी पोहेकॉ सहदेव देवकर यांनी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींना माढा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १७ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सुटका करण्यात आलेल्या महिलांना न्यायालयाच्या आदेशानुसार सोलापूर येथील महिला सुधारगृहात पाठविण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, करमाळा उपविभागाच्या सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली.

# संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्रीय विचारांचा विस्तार

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन ● वसाहतवादी मानसिकतेतून मुक्तता आवश्यक




◆ **समालखा (पानीपत), १५ मार्च**

संघाचा विस्तार म्हणजे राष्ट्रीय विचारांचा विस्तार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शनिवारी केले. रा. स्व संघाच्या अ. भा. प्रतिनिधी सभेची तीन दिवसीय बैठक संपन्न झाली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

अ. भा. प्रतिनिधी सभेची बैठक संघटनात्मक कार्याचा विस्तार करण्याचा, राष्ट्रहितासाठी समाजातील सज्जनशक्तींचा सहभाग वाढविण्याचा आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचा संकल्प करून संपन्न झाली. मागील वर्षभरात संघटनेच्या कार्यात लक्षणीय विस्तार झाला आहे. संघाच्या शाखांची संख्या वाढून ८८,००० झाली आहे. यात सुमारे ६,००० शाखांची वाढ झाली आहे, तर ज्या ठिकाणी या शाखा कार्यरत आहेत, अशा ठिकाणांची संख्याही वाढून ५५,००० पेक्षा जास्त झाली आहे. या व्यतिरिक्त साप्ताहिक मिलन आणि लहान गटांची संख्याही वाढली आहे. संघटनात्मक विस्ताराकडे या संदर्भात पाहणेही आवश्यक आहे की, संघाच्या शाखा आता अंदमान बेटे, अरुणाचल प्रदेश, लेह आणि दुर्गम आदिवासी भागांसारख्या प्रदेशांमध्ये कार्यरत आहेत. संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित केल्या जात असलेल्या विविध कार्यक्रमांमध्येही हा संघटनात्मक विस्तार स्पष्टपणे दिसून येत आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

संघटनात्मक विस्तारासोबतच संघ समाजातील गुणवत्ता वाढवण्यासाठीही सातत्याने कार्यरत आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले. (शेवटच्या पानावर




दैनिक तरुण भारतची पुणे आवृत्ती वाचकांच्या सेवेत दाखल झाली आहे. रविवारी पुणे मेट्रो भवनच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. यावेळी त्यांनी दैनिक 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे अनौपचारिक स्वागत करत शुभेच्छा दिल्या. 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक सचिन कापसे यांनी त्यांना अंकाबद्दल माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपुरे, 'तरुण भारत'चे सहयोगी संपादक विजय लाड, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, भाजपा पदाधिकारी जयंत येरवडेकर तसेच भाजपचे पश्चिम महाराष्ट्र माध्यम विभाग प्रमुख अमोल कविटकर उपस्थित होते.

## नेपाळमध्ये बस अपघात, सात भारतीयांचा जागीच मृत्यू

**काठमांडू** : नेपाळमधील गंडकी प्रांतातील गोरखा जिल्ह्यात शनिवारी रात्री भारतीय भाविकांनी भरलेली एक बस दरीत कोसळली. यात ७ लोकांचा मृत्यू झाला, तर ७ जण जखमी झाले आहेत. प्रवासी मनाकामना मंदिरातून दर्शन करून परत येत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांना घेऊन जाणारी एक खासगी बस मनाकामना मंदिरातून परत येत असताना अनियंत्रित होऊन २०० फूट खोल दरीत कोसळली. अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना भरतपूर येथील चितवन मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले, तिथे डॉक्टरांनी सात भारतीय नागरिकांना मृत घोषित केले, तर इतरांवर उपचार सुरू आहे. गोरखा जिल्हा वाहतूक पोलीस कार्यालयाचे प्रमुख सूरज अर्याल यांनी सांगितले की, मृतांमध्ये दोन महिला आणि पाच पुरुषांचा समावेश आहे. सर्व भारतीय नागरिक होते.

# इराणच्या इस्फान शहरात विध्वंस

## अमेरिका-इस्रायलकडून शेकडो ड्रोनचा मारा, ४२ नागरिक ठार

◆ **तेहरान, १५ मार्च**

औद्योगिक शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या इराणच्या इस्फान शहरावर इस्रायल-अमेरिकेने रविवारी पहाटेपासून शेकडो ड्रोन आणि ५० पेक्षा अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात लष्करी तळ, संरक्षण आणि औद्योगिक प्रतिष्ठाने उद्ध्वस्त झाली. या हल्ल्यात ४२ पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला, तर १२५ जखमी असल्याची माहिती इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली.

इस्फहान हे मध्य इराणमधील एक महत्त्वाचे औद्योगिक शहर असून, तेथे अनेक संरक्षण आणि तंत्रज्ञान प्रतिष्ठाने आहेत. इराणची राज्य वृत्तसंस्था, फार्सने दिलेल्या वृत्तात म्हटले की, रविवारी पहाटेपासून सकाळपर्यंत इस्रायल-अमेरिकेच्या वायुदलाने ड्रोन, क्षेपणास्त्राचा मारा केला. यात अनेक इमारती, शस्त्रनिर्मिती प्रतिष्ठाने आणि लष्करी तळ उद्ध्वस्त झाले. बचावपथकाने इमारतीच्या ढिगाऱ्यातून ४२ मृतदेह बाहेर काढले, तर १२५ पेक्षा अधिक जखमींना रुग्णालयात हलविले. बचावकार्य अजूनही सुरूच असल्याने मृतकांची संख्या वाढू शकते. राष्ट्रपती पेझेश्कियान यांनी हल्ल्याची पुष्टी केली आहे. निवासी भागांवर अनेक हल्ले चढविण्यात आले, यात निष्पाप लोकांना मृत्यू झाल्याचा आरोप त्यांनी केला. अमेरिकेची आखाती देशातील लष्करी आणि हवाई तळांवर ताकदीने प्रत्युत्तर देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



### निष्पाप नागरिकांच्या मृत्यूचा सूड घेणार : पेझेश्कियान

पेझेश्कियान यांनी सांगितले की युद्ध असूनही, इराणमधील व्यवसाय सामान्यपणे सुरू आहे. आमच्या भागीदारांनी सेवा सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. लादलेल्या आणि अन्याय्य युद्धाला पंधरा दिवस उलटून गेले आहेत आणि वाहतूक, दळणवळण आणि इतर आव्हानांना न जुमानता जनतेला देण्यात येणारी सेवा सुरळीत सुरू आहे. नुकत्यात झालेल्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी गेले. त्याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.

### युएईवर बॉम्बचा वर्षाव

आयआरजीसीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, युएईवर १,६०० ड्रोन, २९४ क्षेपणास्त्राचा मार करण्यात आले. ज्यामध्ये किमान २९४ लोक ठार झाले आणि १४१ जण जखमी आहे. त्यांनी हल्ल्याची चित्रफीत प्रसारित केली आहे. युएईने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, इराणने मारा केलेले सर्व ड्रोन, क्षेपणास्त्रे हवाई संरक्षण प्रणालीने नष्ट केले. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

### दुबई, कुवेत विमानतळांवर हल्ले

खार्ग बेट आणि इस्फान शहरावर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने रविवारी दुबई आणि कुवेतच्या आंतरराष्ट्रीय विमानतळांवर क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला. या हल्ल्यांमुळे दोन्ही विमानतळावरील विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली. दुबईच्या मरीना आणि अल सुफूह भागात शक्तिशाली स्फोट झाले. कुवेतच्या फुजैराह शहरात झालेल्या हल्ल्यात १५ नागरिक जखमी झाले. (वृत्तसंस्था)

# आम्ही पाच वर्षे लढण्यास तयार

## इराणचा अमेरिकेला इशारा, कोणताही त्याग करण्यास तयार

◆ **तेहरान, १५ मार्च**

अमेरिकेशी आता कोणतीही चर्चा होणार नाही, गरज पडल्यास दीर्घ युद्ध लढण्यास तयार आहे आणि शत्रूंसमोर कदापि गुडघे टेकणार नाही. देशाला इराक युद्धाचा अनुभव आहे आणि लोक भूमीचे रक्षण करण्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार असल्याचा इशारा इराणच्या सर्वोच्च नेत्याचे प्रतिनिधी अब्दुल माजिद हकीम इलाही यांनी दिला.

संघर्ष पाच वर्षापर्यंत टिकला तरी, इराण शेवटपर्यंत लढण्यास तयार आहे. आम्ही रक्त सांडण्यास तयार आहोत, पण आमची एक इंचही जमीन सोडणार नाही. आम्ही यापूर्वी इराकविरुद्ध आठ वर्षांच्या युद्धाचा सामना केला. इराण अमेरिकेशी वाटाघाटी करणार नाही, युद्धाची सुरुवात त्यांनी केली मात्र अंत आम्हीच करणार असल्याचे वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत इलाही म्हणाले. इराणने वारंवार या प्रदेशात संघर्ष टाळण्यासाठी शेजारी देशांना मदतीचे आवाहन केले. मात्र आखाती देशांनी अमेरिकन सैन्याला मदत केली, याची किंमत त्यांना मोजावी लागेल.

### होर्मुझच्या सुरक्षेसाठी मदत करावी : ट्रम्प



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, होर्मुझ जलमार्गाला सुरक्षित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहे. इतर देशांनी मदत केल्यास हा मार्ग खुला करण्यास मदत होऊ शकते. चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इतर देशांनी त्यांच्या युद्धनौका पाठवून अमेरिकेला सहकार्य करावे. एकत्र येऊन सर्वांनी इराणच्या प्रतिकाराला विरोध केल्यास या मार्गातून जहाजांची वाहतूक पूर्ववत होऊ शकते.

### युएईच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

संयुक्त अरब अमिराती (यूएई) सरकारने नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी करत बंदर, लष्करी तळ, अमेरिकेची कार्यालये यापासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या आहे. इराणकडून कोणत्याही क्षणी या भागात हल्ला होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# झारखंडच्या लातेहारमध्ये दोन माओवाद्यांना अटक

◆ **लातेहार, १५ मार्च**

झारखंडच्या लातेहार जिल्ह्यात सीपीआयच्या (माओवादी) दोन स्वयंघोषित कमांडरला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. त्यांच्या ताब्यातून एके-४७ रायफल, इतर शस्त्रे आणि काडतुसे जप्त केली, असे त्यांनी सांगितले.

सीपीआयचा (माओवादी) एक विभागीय कमांडर आपल्या पथकासह नेतरहाट, मुआडांर, बारेसांड, गारू आणि छिपदोहर या भागांत फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर हे अटकसत्र राबवण्यात आले, असे लातेहारचे पोलिस अधीक्षक कुमार गौरव यांनी सांगितले. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांचे एक पथक तयार करण्यात आले आणि छिपादोहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत शोधमोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेदरम्यान दोघांना अटक करण्यात आली, तर इतर तिघे पळून जाण्यात यशस्वी ठरले, असे गौरव यांनी पत्रकारांना सांगितले. त्या दोघांवर एकूण १२ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. छत्तीसगडसह विविध जिल्ह्यांमधील व राज्यांमधील दाखल असलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात ते दोघेही पोलिसांना हवे होते, असे अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

# श्रीलंकेतून ८४ इराणी खलाशांचे मृतदेह रवाना

**कोलंबो** : अमेरिकेच्या हल्ल्यात बुडालेली इराणी युद्धनौका आयआरआयएस डेना मधील ८४ खलाशांचे मृतदेह श्रीलंकेने इराणला पाठवले आहेत. ४ मार्च रोजी श्रीलंकेतील गॅलेच्या किनाऱ्यावर विशाखापट्टणम येथील नौदल सरावातून परत येत असताना यावर हल्ला झाला होता.

तुर्कीच्या एका खासगी विमानाने हे मृतदेह इराणला पाठवल्याची माहिती श्रीलंका सरकारने दिली. हल्ल्यानंतर ८४ खलाशांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले होते, तर ३२ जणांना श्रीलंकेच्या रुग्णालयात उपचारासाठी हलविले होते. श्रीलंकेच्या मुख्य दंडाधिकाऱ्यांनी करापिटिया राष्ट्रीय रुग्णालयाच्या संचालकांना मृतदेह इराणी दूतावासाकडे सोपवण्याचे आदेश दिले.

# आसाम सरकारचा चार सशस्त्र गटांसोबत करार

◆ **गुवाहाटी, १५ मार्च**

आसाम सरकारने रविवारी तीन कुकी आणि एका हमार सशस्त्र गटासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून, यामुळे राज्यातील वांशिक बंडखोरीचा अंत झाल्याचा दावा एका निवेदनात केला आहे.

या चार गटांनी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शस्त्रे खाली ठेवली होती आणि कारवाया स्थगिती करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. युनायटेड कुकीगम डिफेन्स आर्मी (यूकेडीए), कुकी रिव्हॉल्युशनरी आर्मी (केआरए) आणि कुकी लिबरेशन ऑर्गनायझेशन (केएलओ), कुकी लिबरेशन आमी (केएलए) या कुकी गटांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हमार पीपल्स कन्व्हेन्शन डेमॉक्रॅटिकनेही (एचपीसी-डी) येथे आयोजित एका कार्यक्रमात सरकारसोबत अंतिम करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्रिपक्षीय चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडल्या आणि त्यांचा समारोप करारांमध्ये झाला, असे निवेदनात म्हटले आहे.

कुकी आणि हमार गटांशी करण्यात आलेल्या दोन करारांनुसार-ज्यामध्ये प्रत्येक गटाशी एका कराराचा समावेश आहे. कुकी आणि हमार लोकांसाठी कल्याण व विकास परिषदा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याचे मुख्यालय गुवाहाटी येथे असेल. (वृत्तसंस्था)

# पंजाबमध्ये इसिस मॉड्यूलचा भंडाफोड

## दोघांना अटक, शस्त्रसाठा जप्त

◆ **अमृतसर, १५ मार्च**

पंजाब पोलिसांनी अमृतसर ग्रामीण भागात इसिस पुरस्कृत दहशतवादी मॉड्यूलचा भंडाफोड करीत दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून एक एके-४७ रायफलसह दारूगोळा जप्त केला. महावीर उर्फ काका आणि मनप्रीत उर्फ मणी अशी आरोपींची नावे आहेत.

दोन्ही आरोपी समाज माध्यमावरून परदेशी हँडलर्सच्या संपर्कात होते. हे मॉड्यूल कट्टरतावाद पसरवणे तसेच भारतविरोधी आणि पोलिसविरोधी कथानक प्रसारित करण्यात सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. या कारवाईदरम्यान त्यांच्याकडून एक ९ एमएम ग्लॉक पिस्तूल आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपी परदेशातील गोपी नवशेहरिया आणि जस्सी कुलम यांच्या सूचनेवरून काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रतिबंधित दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित असल्याचे तपासात उघड झाले आहे. आरोपींनी परदेशी हँडलरच्या सूचनेवरून आयईडी आणि हँडग्रेनेड खरेदी केली होती. (वृत्तसंस्था)

## कॅनडात पंजाबी तरुणाची हत्या

**ओटावा** : पंजाबच्या मोगा जिल्ह्यातील एका तरुणाची कॅनडात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. तरुणाच्या टॅक्सीत बसलेल्या एका महिलेचा काही गुंड पाठलाग करत होते. त्यांनी टॅक्सीवर अंदाधुंद गोळीबार केला, यात त्याचा जागीच मृत्यू झाला. दविंदर सिंग असे मृतकाचे नाव आहे. मृत दौलतपुरा नीवां गावचा रहिवासी असून, चार तो वर्षांपूर्वी कामासाठी कॅनडाला गेला होता.

## अग्रलेख...

# युद्ध आणि विरोधकांची भूमिका

जग सध्या मोठ्या ऊर्जा संकटातून जात आहे. गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा वापर आता शस्त्रासारखा होऊ लागला आहे. रशिया-युक्रेन युद्ध भरात असताना अमेरिका आणि मध्य पूर्वेतील तेल उत्पादक देशांनी त्या परिस्थितीचा फायदा उचलत कच्च्या तेलाचे दर वाढवीत भरपूर नफा कमाविला. अशा परिस्थितीत रशिया भारताच्या मदतीला आला. अमेरिकेच्या दबावाला न जुमानता रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करीत आपले ऊर्जा साठे आणखी मजबूत केले. रशिया-युक्रेन युद्ध लांबत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार शुल्काचा दंडुका हातात घेतला आणि रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी दिली. याचा जो परिणाम व्हायचा तो झालाच. भारताने एका झटक्यात रशियाकडून तेल आयात थांबविली नाही, पण त्यात मोठी कपात केली. स्वस्तात मिळणारे कच्चे तेल बंद झाले. इराणवरही आर्थिक निर्बंध असल्याने तेथूनही कच्चे तेल आयात करणे थांबले. वास्तविक पाहता इराणकडून कच्चे तेल आयात करणे भारताला आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. पण, ट्रम्प यांच्या हेकेखोर वृत्तीचा फटका भारताला बसला. तेहरानपासून सुरू झालेले युद्ध आता समुद्रांमध्ये पोहोचले आहे. आशियाई देशांना होर्मुझ सामुद्रधुनीतून कच्चे तेल आणि वायूचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो. पण, होर्मुझमध्ये सध्या शेकडो मालवाहू जहाजे अडकली आहेत. तेल घेऊन येणारी जहाजे अडकल्याने पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. तेलाचे दरही प्रती बॅरेल १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. भारतात अद्याप पेट्रोल-डिझेलचे दर वाढले नसले तरी युद्ध लांबल्यास परिस्थिती बिकट होऊ शकते. कच्च्या तेलाच्या किमती वाढत असल्याने पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा वाढतो. पाठोपाठ चलनवाढ होऊन महागाई वाढते. म्हणूनच स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात सरकारला नाईलाजाने वाढ करावी लागली. तशी ही सामान्य परिस्थिती आहे. आपल्या पुरवठा साखळीशी संबंधित असलेल्या भागांत युद्ध सुरू झाल्यानंतर वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याने किमती वाढणे अस्वाभाविक नाही. अशाप्रसंगी सरकार कुणाचे हे महत्त्वाचे नाही. २१ व्या शतकातील तिसरे दशक जगासाठी जणू संकटे घेऊन आले, असेच म्हणावे लागेल. भारताला तर एका वेळी अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.

कोरोनाच्या महामारीने जगात हाहाकार उडविला होता. लक्षावधी नागरिकांचा कोरोनाने बळी घेतला. जागतिक अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली होती. अनेक देश देशोधडीला लागले. अशा आर्थिक संकटाच्या काळात रालोआ सरकारने परिस्थिती कुशलतेने हाताळली, असेच म्हणावे लागेल. कोरोनातून सावरत असतानाच २०२३ पासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले. त्यात इस्रायल-हमासची भर पडली. त्याचा परिणाम हळूहळू का होईना, पण झालाच. भारत युक्रेनकडून सूर्यफूल बिया मोठ्या प्रमाणात आयात करतो. सोबतच उच्च दर्जाच्या मक्यालाही मागणी होती. पण, गेली चार वर्षे युद्ध सुरू असल्याने व्यापार विस्कळीत झाला. तेलाच्या किमती गगनाला भिडू लागल्या. पर्यायी मार्ग शोधल्याने कमोडिटी मार्केट स्थिरस्थावर होत असतानाच डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आले. त्यांनी टॅरिफ वॉर सुरू करून जगाला पुन्हा संकटात टाकले. भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क आकारले. भारताला याचा मोठा फटका बसला. अमेरिकेत होणारी काही वस्तूंची निर्यात घटली. तब्बल सहा महिने अशीच परिस्थिती राहिली आणि अखेर दोन्ही देशांत व्यापार करार झाला. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्क्यांवर आले. या व्यापार कराराची दोन्ही बाजूंनी अधिकृत घोषणा आणि अंमलबजावणीही झालेली नसताना इराण-इस्रायल-अमेरिका युद्ध भडकले. जगात पुन्हा अस्थैर्य निर्माण झाले. इंधन आणि वायू पुरवठा विस्कळीत झाला. पंधरा दिवस लोटून आणि दोन्ही बाजूंचे मोठे जीवित आणि आर्थिक नुकसान होऊनही संघर्ष थांबण्याची चिन्हे नाहीत. उलट, संघर्षाची नवी केंद्रे निर्माण होत आहेत. तेहराननंतर युद्ध आता समुद्रात शिरले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत धुमश्चक्री सुरू झाली. वायू आणि कच्चे तेल हे खाडी देशांच्या श्रीमंतीचे गमक आहे. होर्मुझमधील अडथळे दूर करण्यासाठी अमेरिकेने इराणच्या खर्ग बेटावर हल्ला केला. या बेटावर इराणची सर्वांत मोठी रिफायनरी आहे. विशेष म्हणजे या बेटावरून चीनला इंधनाचा पुरवठा होतो. येथूनच इराणच्या ९० टक्के इंधनाची निर्यात होते. अमेरिकेने याच बेटावर असलेल्या लष्करी तळाला लक्ष्य केले. सध्या फक्त लष्करी तळांनाच लक्ष्य केले. इराण शरण न आल्यास तेलसाठे आणि रिफायनरीजवर हल्ले करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला.

चीन हा इराणसाठी कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा आयातदार देश आहे. होर्मुझपेक्षा खर्ग बेटावरून चीनकडे दररोज अधिक मालवाहू जहाजे जात असतात. अमेरिकेची ही कारवाई एकप्रकारे चीनला दिलेला इशारा आहे. कारण, खामेनेई राजवटीच्या मागे चीन ठामपणे उभा आहे. इराणच्या लष्करी शक्तीबाबत इस्रायल आणि अमेरिकेने लावलेले अंदाज चुकीचे ठरत आहेत. पंधरा दिवस होऊनही आणि प्रचंड नुकसान झेलूनही इराण मागे हटायला तयार नाही. युद्ध केवळ शस्त्रास्त्रे आणि मनुष्यबळांची उपलब्धता यावर लढली जात नाहीत. ती इच्छाशक्तीच्या बळावर लढली आणि जिंकली जातात हे वारंवार सिद्ध झाले आहे. बलाढ्य सैन्यशक्ती असलेल्या अमेरिकेच्या तोंडाला इराणने सध्या फेस आणला आहे. इस्रायलच्या तर अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. इराणच्या स्वस्त, हलक्या आणि विध्वंसक ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने अमेरिकेचे मध्यपूर्वेतील लष्करी तळ नेस्तनाबूत झाले आहेत. युद्ध कोणत्या दिशेने जाईल याचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे. इराण लवकरच शरण येईल, ही डोनाल्ड ट्रम्प यांची अपेक्षा फोल ठरली. शेकडो सैनिक ठार झाले, प्रत्यक्ष सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनाही गमावले. तरीही इराण अजूनही मैदानात पाय रोवून उभा आहे. या संघर्षात मध्यपूर्वेतील अनेक देश होरपळत आहेत. कतार, सौदी अरब, बहरीन, कुवैत, संयुक्त अरब अमिरात या देशांचे मोठे नुकसान झाले. वायू आणि कच्च्या तेलाची निर्यातच ठप्प झाल्याने व्यापारातील तोटा वाढला आहे. अशा कठीण प्रसंगातही भारत संयम ठेवून परिस्थिती हाताळत आहे. गॅसची कमतरता भासू नये म्हणून इराण आणि रशियासोबत बोलणी सुरू केली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेल्या आणि एलपीजी घेऊन निघालेल्या दोन जहाजांना जाऊ देण्यास इराणने होकार दर्शविला आहे. एवढेच नव्हे तर भारताला त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार असल्याचे इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले आहे. संकट डोक्यावर असतानाही युद्धग्रस्त देशांमधील जनता राज्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. भारतात मात्र उलटे चित्र दिसत आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष या युद्धाच्या आडून स्वतःचा राजकीय फायदा शोधत आहेत. देशात सिलेंडर आणि इंधनाचा साठा मुबलक असून, नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन सरकारने केलेले असतानाही काँग्रेस रस्त्यावर उतरून जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याचे काम करीत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरविल्या जात आहेत. परिणामी मोठ्या प्रमाणात सिलेंडरची पॅनिक बुकिंग केली जात आहे. काँग्रेससह साऱ्या विरोधी पक्षांना विरोध करण्याचा अधिकार आहे. पण देशात अराजक निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणेही आवश्यक आहे. युद्ध किती काळ चालेल हे कुणालाही माहीत नाही. पण, जणू काही भारतामुळेच मध्यपूर्वेतील युद्ध भडकले, अशा पद्धतीने विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ठिकठिकाणी सरकारविरुद्ध काँग्रेसने रान उठविणे सुरू केले आहे. विरोध करणे हे त्यांचे काम असले तरी त्यामागे ठोस कारण असले पाहिजे. परिस्थिती निवळण्यास मदत करण्याऐवजी ती कशी चिघळेल, यासाठीच विरोधकांकडून प्रयत्न केले जात आहेत, जे चुकीचे आहे. संकटाच्या परिस्थितीत राजकीय नफा-तोट्याचे गणित बाजूला ठेवून सरकारच्या पाठीशी उभे राहण्याची भारतात आतापर्यंत पद्धत होती. ती पद्धत विरोधक विसरले असतील तर आता जनतेने शहाणे व्हायला हवे, एवढेच सध्या म्हणता येते.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# डॉलर-बॅरलचे युद्ध!

"राजकीय सत्ता ही बंदुकीच्या बॅरलमधून प्रवाहित होत असते." चीनचे नेते माओ त्से तुंग यांचे हे एक प्रसिद्ध विधान होते. अर्थात ते विसाव्या शतकातील होते. एकविसाव्या शतकात सत्तेचे माध्यम बदलले आहे. आता ही सत्ता कच्च्या तेलाचा बॅरल आणि अमेरिकन डॉलर यातून प्रवाहित होत आहे. आणि त्यावरील पकड मजबूत करण्यासाठी मध्यपूर्वेत युद्ध छेडले गेले आहे.

**दोनशे डॉलर?** : युद्ध आणखी काही काळ सुरू राहिल्यास तेलाच्या एका बॅरलसाठी २०० डॉलर मोजण्याची तयारी जगाने ठेवावी अशी भाषा इराणने उच्चारली आहे. आताच एका बॅरलने शंभर डॉलरची पातळी ओलांडली आहे तर दुसरीकडे एक डॉलर शंभर रुपयांचा होण्याची वाटचाल सुरू आहे. हा सारा परिणाम आहे- अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा. या युद्धाशी संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, टर्की, कुवैत, कतार या देशांचा काहीही संबंध नाही. पण, त्या देशांना या युद्धाचे परिणाम भोगावे लागत आहेत. तीच स्थिती भारताची झाली आहे. भारताचे इस्रायल व इराण या दोन्ही देशांशी चांगले संबंध. पण, त्यांच्यातील युद्धाचा फटका भारताला, भारतीय जनतेला बसणे सुरू झाले आहे.

मध्यपूर्वेत सुरू झालेले हे युद्ध आणखी किती दिवस चालेल याची कल्पना करणे अवघड आहे. कारण, इस्रायल व अमेरिका या दोन्ही देशांची उद्दिष्ट्ये वेगवेगळी आहेत. इराणी नेते खामेनी यांना ठार करणे व इराणचा आण्विक कार्यक्रम उद्ध्वस्त करणे हे इस्रायलाचे मर्यादित उद्दिष्ट होते. ते युद्धाच्या पहिल्याच दिवशी साध्य झाले. त्यानंतर इस्रायलने हे युद्ध थांबवावयास हवे होते. पण, अमेरिकेमुळे इस्रायलला हे करता आलेले नाही.

**अमेरिकेचे उद्दिष्ट** : अमेरिकेला इराणमध्ये कठपुतली सरकार हवे आहे, जेणेकरून इराणच्या कच्च्या तेलावर अमेरिकेला आपला हक्क सांगता येईल. अमेरिकेचे हे उद्दिष्ट साध्य होणे जरा अवघड आहे. कारण, इराणच्या तेलावर चीनने आपला हक्क अगोदरच सांगितलेला आहे. इराणच्या एकूण तेल निर्यातीपैकी ८६ टक्के निर्यात एकट्या चीनला होते. आणि चीनच्या एकूण तेल आयातीत इराणचा वाटा सर्वांत मोठा आहे.

**चीन निश्चिंत** : इराणने आपली आपली हार्मुजची खाडी बंद केल्याने काही तेल उत्पादक देश चिंतित आहेत. इराणने काही तेलवाहक जहाजांना आगी लावल्या आहेत. या खाडीतून एक लिटर तेलही बाहेर जाणार नाही अशी घोषणा इराणने केली आहे. पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांना जोडणारी खाडी म्हणजे हार्मुजची खाडी. काही ठिकाणी ही खाडी एवढी उथळ आहे की मोठ्या तेलवाहक जहाजांना इराणच्या किनारपट्टीला लागूनच प्रवास करावा लागतो आणि तो सारा भाग इराणने बंद केला आहे. यात चीन असा एकमेव देश आहे की त्याच्यावर हार्मुज खाडी बंद झाल्याचा कोणताही परिणाम होणार नाही. कारण, चीनने इराणचे तेल आयात करण्यासाठी काही वर्षांपूर्वीच रेल्वे मार्ग बांधला आहे. इराणचे कच्चे तेल सागरीमार्गाने चीनच्या तेल शुद्धीकरण कारखान्यात पोहोचण्यास ४५ दिवस लागतात तर रेल्वेने हेच काम १५ दिवसांत पूर्ण केले जाते. १०,४०० किलोमीटर लांबीचा हा रेल्वेमार्ग २०२५ च्या जून महिन्यात पूर्ण करण्यात आला. तेहरानजवळील अप्रीन बंदर ते चीनमधील झियान यांना जोडणारा हा रेल्वेमार्ग चीनच्या महत्त्वाकांक्षी योजनेनुसार पूर्ण करण्यात आला. चीन यावरच थांबलेला नाही. त्याने आणखी एक पर्यायी रेल्वे मार्ग बांधण्याची योजना आखली आहे. पाच देशांना जोडणारा हा नवा रेल्वे मार्ग काहीसा जास्त वेळ घेणारा असला तरी तो पूर्ण करण्याचा चीनचा मनोदय आहे. याशिवाय चीन-इराण यांच्यात २५ वर्षांचा सुरक्षा करारही झाला आहे. म्हणजे वेळ पडल्यास चीन इराणच्या रक्षणासाठी



उघडपणे समोर येण्यास मागे-पुढे पाहणार नाही.

**खामेनींची निवड** : इराणने अयातुल्ला खामेनी यांचे पुत्र मोताबा खामेनी यांना उत्तराधिकारी निवडून अमेरिकेला एकप्रकारे आव्हान दिले आहे. सुरक्षेच्या कारणांसाठी ही निवड 'ऑनलाईन' करण्यात आली. ८८ पैकी ८० 'मतदारांनी' मोताबा खामेनींना पाठिंबा दिला. यात इराणच्या लष्कराची फार मोठी भूमिका होती. या निवडीला चीनचा आशीर्वाद असल्याचे सांगितले जाते. इराणच्या नव्या राजवटीमागे चीन व रशिया हे दोन्ही देश असल्याने अमेरिकेचे उद्दिष्ट कसे साध्य होणार हा एक मोठा प्रश्न आहे. आमच्या पाठिंब्याशिवाय इराणमध्ये नवा नेता निवडला जाऊ शकत नाही असे राष्ट्रपती ट्रम्प वारंवार सांगत असले तरी इराणने अगोदरच चीनचे मांडलिकत्व पत्करले आहे.

**तेल भडकले** : मध्यपूर्वेतील या युद्धाची किंमत आता साऱ्या जगाला मोजावी लागत आहे. ब्रेंट कच्चे तेल १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहे. याशिवाय आखाती देशांनी तेलाचे दररोजचे उत्पादन ८ मिलियन बॅरल म्हणजे ८० लाख बॅरलने घटविले आहे. जे तेल उत्पादित होते, ते हार्मुजची खाडी बंद असल्याने बाहेर पाठविणे अशक्य झाले आहे. याने साऱ्या जगभर हाहाकार होण्याची स्थिती तयार होत आहे. म्हणजे हे युद्ध लवकर न थांबल्यास एक वेगळ्या प्रकारचा 'लॉकडाऊन' जगात सुरू होईल.

**डॉलर-बॅरल** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी सत्ता हाती घेतल्यापासून ते सातत्याने डॉलरला मजबूत करण्याची भाषा बोलत आहेत. ब्रिक्स म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन हे देश युरोच्या धर्तीवर नवे चलन तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत असे ट्रम्प यांना वाटत होते. त्यात भारतही सामील असल्याचा त्यांना संशय होता. त्यातून त्यांचा भारतविरोधी पारा अधिक भडकत गेला. अमेरिका कोणत्याही परिस्थितीत डॉलर कमजोर होऊ देणार नाही असे प्रतिपादन ते करीत आले आहेत.

**विकासाचे इंजिन** : प्रत्येक देशाला आपल्या विकासासाठी लागणारे इंधन म्हणजे कच्चे तेल. या तेलावर कब्जा करावयाचा अशी महत्त्वाकांक्षा बाळगून ट्रम्प निर्णय घेत आहेत. रशियाचे खच्चीकरण करावयाचे असेल तर व्हेनेझुएलाच्या तेलावर ताबा मिळवावा लागेल या योजनेतून त्यांनी या देशाच्या राष्ट्रपतीलाच पळविले आणि आता ते तेथील नामधारी सरकारकडून कच्चे तेल मिळवीत आहेत.

इराण हा चीनच्या विकासाचे एक प्रकारचे इंजिन आहे असे ट्रम्प यांना वाटते. त्यांनी व्हेनेझुएलाची पुनरावृत्ती या देशात करण्याचा प्रयत्न चालविला आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याचे अपहरण करणे शक्य नसल्याने त्याची चक्क हत्याच करण्यात आली. आता इराणमध्ये सत्तापालट करण्याचा त्यांचा मनोदय आहे. ते कितपत साध्य होईल असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**जीपीएस विरुद्ध बीडीएस** : २०२५ च्या मे महिन्यात भारत- पाकिस्तान यांच्यात झडलेल्या संघर्षाची एका वेगळ्या प्रकारची पुनरावृत्ती या संघर्षात दिसत आहे. चार दिवसांच्या युद्धादरम्यान, चीन पाकिस्तानला भारताच्या लष्करी हालचालींचे 'लाईव्ह लोकेशन' पुरवीत होता आणि पाकिस्तान त्याआधारे आपले हल्ले चढवीत होता. अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धात हेच होत असल्याचे म्हटले जाते. इराण ज्या अचूकपणे अमेरिकन लष्करी तळांना व इस्रायली लष्करी केंद्रांना लक्ष्य बनवीत आहे ही सारी चीनची करामत असल्याचे मानले जाते. कुवैतमध्ये अमेरिकेची किमान तीन एफ-१५ विमाने इराणने पाडली. यामागे चीन होता असे आता मानले जाते.

अमेरिका-इस्रायल हे जीपीएस म्हणजे ग्राऊंड पोझिशनिंग सिस्टिमचा वापर करून इराणवर हल्ले चढवीत आहेत तर इराणने चीनच्या बीडीएस म्हणजे बायदू सिस्टिमचा वापर चालविला आहे. बहुतेक तज्ज्ञांच्या मते चीनची बायदू प्रणाली ही अमेरिकेच्या जीपीएसपेक्षा कितीतरी पटीने अचूक आहे. त्याचा प्रत्यय या युद्धात येत आहे. अगदी नेमक्या शब्दात सांगावायचे झाल्यास, अमेरिका व चीन यांच्यातील युद्ध मध्यपूर्वेच्या रणांगणात लढले जात आहे.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# वारसा परंपरेचा

अवघ्या दोन दिवसांनी चैत्र महिना सुरू होईल. गुढीपाडव्याची तयारी घरोघरी एव्हाना सुरू देखील झाली असेल. अर्थात, हे काम घरातील आई-वडील, आजी-आजोबाच सांभाळतात. गुढीसाठी काठी काढून धुतली जाईल, गुढीचे वस्त्र पाहून ठेवले जाईल. गाठी ठेवलेलीच असणार. या दिवशी मेन्यू काय करावा, त्यावरही आई-आजीची चर्चा सुरू असेल. गुढीची पूजा दरवर्षीप्रमाणे बाबाच करतील, आई नैवेद्य आणून ठेवेल, गुढीला हळदी-कुंकू वाहून नमस्कार करेल. तिचे औक्षण केले जाईल. संध्याकाळी सूर्यास्तापूर्वी बाबा ती गुढी व्यवस्थित खाली उतरवून ठेवतील आणि आई, बाबा, आजी, आजोबा गाठीचा आणि कडूलिंबाच्या पानांचा प्रसाद मोठ्या श्रद्धेने ग्रहण करतील. पण, हे काय, या संपूर्ण चित्रात नवीन पिढी कुठेच दिसत नाही. दुर्दैवाने ही वास्तविकता आहे की, आपल्या या पारंपरिक सणांमध्ये नवीन पिढीचा सहभाग फारच कमी आहे.



आज चाळीस-पन्नासच्या वयात असलेल्या मंडळींनी आपल्या लहानपणीचा गुढीपाडवा आठवून पाहावा. काठी शोधून ती धुऊन ठेवणे, गुढीची तयारी करणे, घरातील अन्य कामांत मदत करणे, गुढीची पूजा झाल्यानंतर तिला मनोभावे नमस्कार करणे, सायंकाळी गुढी उतरवल्यानंतर इच्छा नसली तरीही कडूलिंबाचा प्रसाद ग्रहण करणे असा सहभाग घरातील मुलांचा नक्कीच असायचा.

आताचे चित्र जरा वेगळे आहे. गुढीपाडवा असला तरी घरातील मुलगा किंवा मुलगी स्वतःच्या वेळेवरच झोपून उठणार, वर सांगितल्याप्रमाणे गुढीपाडव्याच्या एकूणच छोटेखानी समारंभात घरातील अपत्याची भूमिका अगदी पाहुणे कलाकारासारखीही नसते. याला दोषी ही नवीन पिढी नाही तर घरातील आई-वडील आणि मोठी मंडळी आहेत. कारण त्यांनी मुलांना आपल्या परंपरेचा वारसा योग्य पद्धतीने हस्तांतरित केलेलाच नाही.

हा आपला सण आहे आणि याचे महत्त्व काय आहे, हे नवीन पिढीला पटेल अशा पद्धतीने सांगण्यातच आलेले नाही. याआधीची पिढी धाकाने सर्वकाही करायची. पण, आताच्या पिढीला धाक कामाचा नाही. त्यांना विश्वासात घेऊन शांतपणे सारे काही समजावले पाहिजे. त्यांनी सणांसाठीची तयारी स्वतःहून, उत्साहाने करावी इतका जोश पालकांनीच त्यांच्यात भरला पाहिजे. हा आपला सण आहे आणि आजपासून आपले नवे वर्ष सुरू होत आहे. तुम्ही ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता नवीन वर्षाचा जल्लोष करता, पण आपला सण सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असतो. तुम्ही जसे नवीन वर्षासाठी काहीतरी 'रिसोल्यूशन' ठेवता त्याच पद्धतीने आपण या कालावधीत आपण संकल्पाची गुढी उभारतो. सर्वांना सुखी, आरोग्यपूर्ण, संपन्न जीवन मिळावे, अशी कामना करतो. या दिवशी नवे कपडे घालायचे, गुढीला नमस्कार करून घरातील सर्व मोठ्यांचेही आशीर्वाद घ्यायचे. गोडा-धोडाचे जेवण करायचे आणि संपूर्ण दिवस कुटुंबासोबत आनंदाने घालवून सायंकाळी सूर्यास्तापूर्वी गुढीला नमस्कार करून खाली उतरवायचे. गुढीला बांधलेल्या कडूलिंब आणि गाठीच्या प्रसादाचेही अपार महत्त्व आहे. कडू-गोडाचा हा मिलाफ आयुष्याचे रंग दाखवतोच पण, त्या दिवशी खाल्लेला कडूलिंबाचा पाला आगामी काळातील व्याधींपासून रक्षण करतो.

अशा सर्व पद्धतीने नव्या पिढीला या सणाचे स्वरूप समजावले तर कदाचित ते पुढील वर्षी स्वतःहून याच्यासाठी सज्ज राहतील. त्यांना यातील आनंदाची जाणीव झाली तर ते त्यांच्या पिढीतील इतरांना आणि नंतर आपल्या मुलांनाही तो वारसा अलगद सोपवतील.

अजूनही वेळ गेलेली नाही. त्यामुळे घरातील मोठ्यांनी लहानांना गुढीपाडव्याच्या सणात सहभागी करून घेण्याची पूर्वतयारी करावी. घरातील काठी शोधण्यापेक्षाही आपल्या परंपरेचा आधार असणारी नव्या पिढीची काठी शोधणे जास्त गरजेचे आहे. गुढीच्या गाठीइतक्याच नात्यांतील गाठीत देखील गोडवा निर्माण होणे गरजेचे आहे आणि कडूलिंबाचा पाला खाण्याइतके हे काम कठीण वाटत असले तरी निरोगी समाजव्यवस्था तसेच कुटुंबव्यवस्थेसाठी हे जास्त गरजेचे आहे. हे काम घरातील मोठ्यांनी यशस्वीपणे पार पाडले तर यंदा गुढीपाडव्याला आपण नव्या पिढीला काहीतरी चांगला वारसा सोपवतोय, याचे समाधान नक्कीच मिळेल.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# संघ-युगाचा शालिवाहन



"उजाळीलेस तू तममय जीवन, संघ युगाचा शालिवाहन" अशा पद्धतीचे संघामध्ये एक गीत आहे. ज्याप्रमाणे शकांचा पूर्णपणे पराभव करणारा शालिवाहन राजा याने भारतभूमीला संकटमुक्त केले, यासाठी त्याने मातीतून सैनिक निर्माण केले. मातीतून सैनिक निर्माण केले म्हणजे या वाक्याचे अनेक अर्थ असू शकतात. याच मातीत जन्मलेल्या लोकांतून त्यांनी सैनिक निर्माण केले, हा त्याचा एक अर्थ असू शकतो. मातीप्रमाणे थंड आणि आकारहीन लोकांना त्यांनी राष्ट्रभक्तीचे संस्कार देऊन शकांविरुद्ध उभे केले आणि त्यातून भारतभूमीला संकटमुक्त केले.

वर्ष प्रतिपदा हा पूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार, ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, त्यांचा जन्मदिवस आहे. संघामध्ये सहा उत्सव साजरे केले जातात. हे सर्व उत्सव समाजप्रबोधनाचे माध्यम आहेत. संघामध्ये कोणाचीही जयंती आणि पुण्यतिथी साजरी केली जात नाही. डॉ. हेडगेवार सुद्धा याला अपवाद नाहीत. संघामध्ये वर्ष प्रतिपदा हा सहा उत्सवांपैकी एक उत्सव आहे. तो त्याच्या पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे आहे. तो डॉक्टरांचा जन्मदिवस आहे म्हणून संघात उत्सव म्हणून साजरा केला जात नाही.

संघ हा व्यक्तिपूजक नाही. ज्या डॉक्टरांनी संघाची स्थापना केली त्यांनी सुद्धा जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी होताना आपले सरसंघचालकपद डॉक्टर परांजपे यांना सोपविले. आज आपण समाजामध्ये एकाच पदाला वर्षानुवर्षे चिकटून राहणारे लोक बघतो, त्यावेळेस आपल्याला पूजनीय डॉक्टरांचे वेगळेपण लक्षात येते. संघामध्ये पद हा शब्द नाही. त्याला दायित्व असे म्हटले जाते. "देअर आर नो डेकोरेटिव्ह पोस्ट्स इन आरएसएस." संघामध्ये शोभेचे कोणतेही पद नाही. प्रत्येकाला जबाबदारी समजून कार्य करावेच लागते.

स्वयंसेवकांना उद्देशून डॉक्टरजी म्हणतात की, आज जरी मी संघाचा सरसंघचालक असलो तरीसुद्धा उद्या तुम्हाला असे वाटले की मी या कामासाठी योग्य नाही तर माझ्यापेक्षा योग्य व्यक्तीला तुम्ही हे कार्य द्या. तुम्ही ज्याला नियुक्त कराल त्याच्या सोबत मी एक सामान्य स्वयंसेवक म्हणून कार्य करेल, असा विश्वास तुम्ही असू द्या.

संघामध्ये गुरू कोणाला मानले पाहिजे या विषयावर जेव्हा चर्चा झाली, त्यावेळेस स्वाभाविकपणे सर्व स्वयंसेवकांनी असे मत दिले की, डॉक्टरजी तुम्ही संघाची स्थापना केलेली आहे त्यामुळे तुम्हीच संघाचे गुरू असायला पाहिजे. त्यावेळेला त्यांच्या जागी दुसरी व्यक्ती असती तर तिला मनातून आनंद झाला असता व त्याने "ठीक आहे बाबा, तुम्ही म्हणता तर मी गुरू होतो" असे म्हटले असते. परंतु ते म्हणाले की, बघा आपल्या संघाचे काम काय आहे. आपल्याला हिंदूंचे संघटन करायचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य हे शेकडो, हजारो वर्षांचे आहे. इतक्या वर्षांपर्यंत त्याला मार्गदर्शन करेल अशा कुठल्यातरी प्रतीकाला आपण गुरुस्थानी ठेवले पाहिजे.

त्यानंतर भगव्या ध्वजाला गुरुस्थानी मानण्यात आले. या सर्व उदाहरणांकडून आपल्याला लक्षात येते की डॉक्टरांनी कधीही स्वतःचे कुणालाही स्तोम माजवू दिले नाही. संघामध्ये वर्ष प्रतिपदेच्या कार्यक्रमाच्या आधी आद्य सरसंघचालक प्रणाम देण्यात येतो. हा प्रणाम सुद्धा व्यक्तिपूजेचा भाग नाही, तर हा कार्यपद्धतीचा भाग आहे. त्याचबरोबर डॉक्टरांच्या जन्मजात देशभक्तीला केलेला हा प्रणाम आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी संघाची स्थापना करून सर्वस्वाचा होम करणाऱ्या त्यांच्या त्यागी वृत्तीला हा प्रणाम आहे.

" संघटना के पुण्यकार्य में कण कण होम किया था<br>
हिंदुराष्ट्र है भारत तुमने यह उद्घोष किया था"

व्यवसायाने जरी ते डॉक्टर नसले तरी शिक्षणाने डॉक्टर होते. त्यांचे निदान अचूक होते. कोट्यवधी लोकांच्या देशावर मूठभर इंग्रज राज्य कसे करू शकतात, या प्रश्नाने त्यांना बेजार केलेले होते. देश आणि समाजाच्या समस्या ते बघत होते. देशाच्या इतिहासाचा त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यातून जे सत्य त्यांच्या मनाला उमजलेले होते ते म्हणजे समाजामध्ये असलेली अनुशासनहीनता, स्वार्थकेंद्रिता, संघटनेचा अभाव, देशभक्तीला प्राधान्य नसणे, स्वबोध नसणे हे होय.

आता जे समाजात दोष आहेत ते कदाचित काही काळ काम केल्यावर निघून जातील, परंतु ते पुन्हा निर्माण होणार नाहीत असे नाही. ते निर्माण झाले असता त्याचे निराकरण पुन्हा कोण करणार? त्यामुळे वर्षानुवर्षे समाजातील, देशापुढील समस्यांना सोडवू शकेल अशी राष्ट्रभक्त, संघटित, नित्यसिद्ध शक्ती त्यांना हवी होती.

त्यांच्या दृष्टिकोनातून देशभक्ती ही काही तात्पुरती किंवा हंगामी भावना नव्हती. हंगामी देशभक्तीच्या भावनेने राष्ट्र कधीही संकटमुक्त होणार नाही हे त्यांना माहीत होते. म्हणूनच देशभक्तीची ज्योत सदा सर्वकाळ समाजामध्ये तेवत राहावी यासाठीच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.

संघाच्या स्थापनेनंतर संघाला उपेक्षेचा सामना करावा लागला. किशोरवयीन मुलांना एकत्र करून त्यांनी संघाची शाखा सुरू केली. किशोरवयीन मुलांसोबत उभे असलेले प्रसिद्ध पुढारी व क्रांतिकारक डॉ. हेडगेवार यांना पाहिल्यावर लोक थट्टा करायचे. संघ सुरू झाला तेव्हा त्याचे नाव ठरलेले नव्हते, प्रमुख कोण राहणार हे ठरलेले नव्हते, शाखा नावाची कार्यपद्धती सुद्धा ठरलेली नव्हती. देशासाठी कार्य करणारी देशभक्त, जागृत, सक्रिय संघटना उभी करायची एवढेच त्यांच्या मनामध्ये होते.

एखाद्या कळीचे फुलामध्ये रूपांतर व्हावे तसे संघाची कार्यपद्धती हळूहळू विकसित होत गेली. सुरुवातीला जे शब्द होते त्याचा पुढे मंत्र झाला. याच सामान्य कार्यपद्धतीतून असामान्य स्वयंसेवक व नेतृत्व निर्माण झाले. संघामध्ये आयात केलेल्या नेतृत्वाची आवश्यकता राहत नाही. जे येतात ते येथील कार्यपद्धतीतून संघकार्य करण्यासाठी कुशल बनतात.

पूजनीय डॉ. हेडगेवारांच्या काळामध्ये जे कुशपथक होते, त्या कुशपथकामध्ये बाल स्वयंसेवक म्हणून प्रवेश करणारे पूजनीय बाळासाहेब देवरस हे पुढे संघाचे तृतीय सरसंघचालक झाले. संघाने जातिभेद नष्ट करण्याच्या घोषणा दिल्या नाहीत, फक्त हिंदुत्वाच्या आधारावर संघटन सुरू ठेवले. त्याचा योग्य तो परिणाम झाला.

"जातीपंथ भाषेचे अंकुर कधी न येथे रुजले"

संघामध्ये कुठलीही घराणेशाही नाही. येथील सामान्य स्वयंसेवक सुद्धा संघाच्या सर्वोच्च सरसंघचालक पदावर आरूढ होऊ शकतो. संघाला घराणेशाहीचा इतिहास नाही.

पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्यानंतर "हू आफ्टर हेडगेवार", "हेडगेवार यांच्यानंतर कोण" असा प्रश्न कधीही संघात निर्माण झाला नाही. डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालक कोण होईल याचे उत्तर डॉक्टरांनी पत्रामध्ये लिहून ठेवलेले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे माधव सदाशिवराव गोळवलकर अर्थात श्रीगुरुजी हे संघाचे द्वितीय सरसंघचालक झाले.

त्यावेळेस श्रीगुरुजींपेक्षाही संघकार्याचा अधिक अनुभव असलेले अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ कार्यकर्ते संघामध्ये होते. तरीही संघामध्ये त्यांचे गट निर्माण झाले नाहीत, दुफळी माजली नाही. सगळ्यांनी डॉक्टरांचा आदेश शिरसावंद्य मानला. डॉक्टरांचे नेतृत्व असे असामान्य होते.

डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालकपद स्वीकारल्यानंतर बोलताना पूजनीय श्रीगुरुजी म्हणाले होते की, संघाचे सरसंघचालकाचे पद हे विक्रमादित्याचे सिंहासन आहे. या सिंहासनावर बसलेला गुराख्याचा पोर देखील योग्य तोच न्याय करेल.

आज संघाला शंभर वर्षे पूर्ण झालेले आहेत. समाजाला संघातून निर्माण झालेल्या विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राजकीय क्षेत्रात काम करणारी भाजप अशा संघटना व त्यांचे नेते माहीत आहेत. परंतु ज्यातून या फांद्या निर्माण झाल्या तो वटवृक्ष आणि तो वटवृक्ष ज्या बीजातून उत्पन्न झाला ते बीज म्हणजे पूजनीय डॉक्टर हेडगेवार हे अजूनही समाजाला माहीत नाही.

**थे अकेले आप, लेकिन बीज का था भाव पाया।<br>
बो दिया नीज को अमर वट, संघ भारत में उगाया।<br>
राष्ट्र ही क्या, अखिल जगत का आसरा हो जाय।<br>
और उसकी हम टहनियाँ पत्तियाँ बन जाय।<br>
हम सभी का जन्म तव प्रतिबिंब सा बन जाय।<br>
और अधुरी साधना चिर पूर्ण बस हो जाय।**

डॉक्टरांनी जे कार्य सुरू केले ते अजूनही अपूर्ण आहे. वर्ष प्रतिपदा हा हिंदू नवीन वर्षाचा प्रारंभ दिवस आहे. हा नवसंकल्प दिवस आहे. स्वार्थत्यागी, राष्ट्रसमर्पित जीवन माझे बनावे यासाठी व्यक्ती म्हणून मी अल्पसा का होईना प्रयत्न करीन, अशा पद्धतीचा संकल्प करणे हा संघनिर्मात्याला केलेला प्रणाम असेल. हा नवसंकल्प हीच खरी वर्ष प्रतिपदा ठरेल.

राष्ट्र देवतेच्या या साधकास शतशत वंदन.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### 'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' रोखठोक मत

'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' हा रोखठोकमधील लेख मानवी स्वभावाचे योग्य विश्लेषण करणारा आहे. एखाद्या परिस्थितीत कसलीही टंचाई निर्माण झाली की त्याचा साठा करणे हा मानवी स्वभाव आहे तर तो बंदिस्त ठेवून जास्त किमतीला विकणे ही तापल्या तव्यावर पोळी भाजायची विकृती आहे. आजच्या एलपीजी सिलेंडरची टंचाई ही खूपशी मानवनिर्मितच वाटते कारण सर्वसाधारणपणे सर्वांकडे दोन सिलेंडर असतात व एक संपला की दुसरा लावला जातो व नवीन सिलेंडरसाठी बुकिंग केले जाते. प्रश्न आहे तो बिनानंबरचे सिलेंडर घेणारे यांचा. मुळात आता गॅस कनेक्शन सहजगत्या मिळते तरीही काळ्या बाजारातून सिलेंडर घेणे चुकीचे आहे. त्यांना जर त्रास होत असेल तर ही त्यांच्या चुकीच्या वागण्याची परिणती आहे. एकूणच जेव्हा जग युद्धात लोटले गेलं आहे तिथे आपल्या देशात इंधनाचे दर स्थिर असून इराणने भारताच्या तेल बोटी सोडल्या आहेत त्यामुळे अति टंचाई होण्याची शक्यता कमीच वाटते. मुळात सर्वांनीच आपल्या साठेबाज वृत्तीला लगाम घालणे गरजेचे आहे.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात महिला दिन उत्साहात

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात महिला दिन साजरा करण्यात आला. सोलापूर विभागातील अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव यांचे प्रमुख व्याख्यान होते. त्या विशेष पाहुण्या आणि प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना, सोलापूर विभागाच्या अध्यक्षा निभा कुमारी यांच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकारी आणि सदस्या उपस्थित होत्या.



### दयानंद कॉलेज स्टुडन्ट सर्कल डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळ अध्यक्षपदी वाघमारे

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दयानंद कॉलेज स्टुडन्ट सर्कलच्या वतीने जयंती मिरवणूक काढण्याचे नियोजन आहे. त्यासाठी कॉलेजच्या प्रांगणात झालेल्या वार्षिक बैठकीत अध्यक्षपदी यशपाल वाघमारे यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीत महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून निवड झालेले सत्यजित वाघमोडे यांचा गौरव करून सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी नेते अतिश बनसोडे, ॲड. अखिल शाक्य, सागर शितोळे, सुजित खुर्द, रुपेश तडसरे, अभि शिंगे, सुनील मस्के, अनिकेत गायकवाड, सोनू गजधाने, विजय माने उपस्थित होते. **अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष : प्रविण दलशिंगे, राज गायकवाड, अनिकेत येरवडे, सुयश गायकवाड, प्रदीप कांबळे, सचिव : अनिकेत बनसोडे, सहसचिव : रितेश भोसले, कार्याध्यक्ष : ओंकार वडतिले, खजिनदार : दियेश सावंत , प्रमुख : आदित्य कांबळे, अवि गायकवाड, सिद्धू काळे, रियाज बेग, आदित्य लोणारी, सिद्धार्थ बनसोडे, सुंदर उबाळे आणि रॉक मुरुमकर, प्रमुख सल्लागार : ॲड.आनंद कांबळे, सुनील मस्के आणि अनिकेत गायकवाड.



### दिशा संस्थेतर्फे नूतन नगरसेवकांचा सत्कार


**सोलापूर, दि.१५ मार्च-**

दिशा सामाजिक संस्था, सोलापूर यांच्या वतीने नूतन नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला. बापूजी नगर येथील तयाम्मा देवी मंदिरात हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी स्थायी समिती सभापती तथा श्री जांबमुनी मोची समाजाचे अध्यक्ष देवेंद्र भंडारे यांनी भूषविले. यावेळी नगरसेविका श्रीदेवी फुलारे, निर्मला जंगम, सुनीता कामाठी, अंबिका चौगुले तसेच नवनिर्वाचित नगरसेवक नरसिंह आसादे, श्रीनिवास गुरम, विजय चिप्पा आणि स्वीकृत नगरसेवक ऋषिकेश मेट्रे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक विठ्ठल तलवारे, अध्यक्ष डॉ. योगेश पल्लोलू व महिला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते मान्यवरांना गौरविण्यात आले.कार्यक्रमास शंकर चौगुले, लिंगराज पल्लोलू, लक्ष्मण मिसालोलू, विठ्ठल मेट्रे, अंबादास माढेकर उपस्थित होते. द सूत्रसंचालन सेक्रेटरी नरसिंह मिसालोलू यांनी केले, तर प्रस्ताविक अध्यक्ष डॉ. योगेश पल्लोलू यांनी केले. आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख हणमंतु भंडारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी अंबादास पंदिरोलू, लक्ष्मण मिसालोलू, लिंगराज पल्लोलू, साई जगले, हणमंतु भंडारे, भिम आसादे, विष्णू सानेपागोलू, सल्लागार सिद्राम म्हेत्रे, बाबू सज्जन यांनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात तापमानाची चढउतार

**उन्हाच्या झळांसोबतच अवकाळी पावसाचीही चाहूल**

**आभाळी वातावरणामुळे शेतकरी धास्तावले**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मार्च-**

राज्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच सोलापूरने आपला तापमानाचा तडाखा दाखवण्यास सुरुवात केली आहे. चालू हंगाम ात तिसऱ्यांदा सोलापूरच्या कम ाल तापमानाने शनिवारी ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असून, शहर अक्षरशः होरपळून निघत आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच, वातावरणातील बदलांमुळे आता आता हवामान विभागाकडून अवकाळी पावसाचे संकेतही मिळत आहेत. यामुळे सुगी सुरू असलेल्या भागातील शेतकरी बांधव धास्तावले आहेत. रविवारी आभाळी वातावरण झाल्याने तापमान १ अंशाने कमी होवून ३९ अंशावर आले होते.

हवामान विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, सोलापूरचे तापमान सरासरीच्या वर सरकले आहे. मार्च महिन्याच्या सुरूवातीपासूनच तापमानाचा आलेख चढता आहे. आता चाळीशी पार केलेल्या तापमानाम ुळे दुपारच्या वेळी प्रचंड उकाडा वाढत आहे. अंगाची लाहीलाही होत असल्याने सोलापूरकर हैराण होत आहेत. तर आता पावसाचाही अंदाज व्यक्त केल्याने सुगी करीत असलेल्या शेतकरी बांधवांत भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे सुगी उरकण्याची शेतकरी गडबड करीत असल्याचे सर्वत्र दिसून येत आहे.

दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून, नागरिक उन्हापासून वाचण्यासाठी टोपी, रुमाल आणि सनग्लासेसचा आधार घेत आहेत. आर्द्रता २८% पर्यंत खाली आल्याने कोरड्या उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे. भीषण उष्णतेच्या लाटेसोबतच अरबी समुद्रावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे वातावरणात बदल होण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, वाढत्या तापमानामुळे स्थानिक पातळीवर 'क्युम्युलोनिम्बस' ढगांची निर्मिती होऊन दुपारनंतर किंवा संध्याकाळी मेघगर्जनेसह अवकाळी पावसाच्या सरी कोसळू शकतात. दरम्यान, वाढत्या उन्हामुळे उष्माघाताचा धोका वाढला आहे. प्रशासनाकडून खालील काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भरपूर पाणी प्या: तहान नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत शक्यतो उन्हात जाणे टाळावे. ताक, लिंबू सरबत आणि नारळ पाण्याचा आहारात समावेश करा. जर पावसाच्या सरी आल्या, तर झाडाखाली किंवा पत्र्याच्या शेडखाली उभे राहू नका; वीज पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.सोलापूरकर सध्या एका बाजूला कडक ऊन आणि दुसऱ्या बाजूला पावसाची प्रतीक्षा अशा दुहेरी कात्रीत अडकले आहेत.

## महिलांचे आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरण आवश्यक : डॉ. पुरव-सामंत




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

स्त्री केवळ कुटुंबाचा आधार नसून ती समाजाच्या प्रगतीचा मुख्य कणा आहे. महिलांनी स्वतःच्या क्षमता ओळखून आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या स्वावलंबी होणे, ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे, असे मत पुणे येथील अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा पुरव-सामंत यांनी व्यक्त केले.

येथील श्री हिराचंद नेमचंद वाचनालयातील लोकमान्य टिळक सभागृहात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'महिलांचे सक्षमीकरण' या विषयावर त्यांचे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाच्या जेष्ठ कार्यकारिणी सदस्या प्रा.सुलभा पिशवीकर होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.पिशवीकर यांनी महिलांनी निर्धार केल्यास आणि गरजा लक्षात घेऊन तसेच निर्णय घेतल्यास. त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊ शकतात.

या कार्यक्रमात वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी वाचनालयाच्या उपक्रमांची माहिती प्रास्ताविकेतून दिली. तर अँड. नीला मोरे यांनी सूत्रसंचालन केले, आणि आभार मानले. याप्रसंगी प्रा. पुष्पा आगरकर, डॉ. माधवी रायते, डॉ. सुमन सरदेसाई, सरिता मोकाशी, रवींद्र मोकाशी, पद्माकर कुलकर्णी फय्याज शेख, गायक प्रशांत देशपांडे निशा भोसले आदी उपस्थित होते.

## बार्शीतून तरुणीचे अपहरण, ९ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ मार्च-**

बायपास रोड परिसरातील २१ वर्षीय तरुणीचे फोटो, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत अपहरण करुन जबरदस्तीने लग्न लावल्याचा आणि नंतर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी निर्भयाने दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी तरुणी (वय २१, रा. बार्शी) ही ६ मार्च रोजी दुपारी बायपास रोडवर थांबली असताना आरोपी गणेश टेकाळे (रा. अलिपूर रोड, माऊली चौक, बार्शी) याने तिला फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. चारचाकी वाहनमधून तिला जबरदस्तीने घेऊन गेल्याचा आरोप आहे.

आरोपींनी तिला येरमाळा, बीड, अहिल्यानगर येथे नेले. पुढे इतर आरोपींनी धमक्या देत तिला इरटिगा कारमध्ये बसवून मुंबई व नंतर आळंदी (पुणे) येथे आणले. तेथे एका मंगल कार्यालयात तिचे जबरदस्तीने सुरज मोरे (रा. गोरम ाळे, ता. बार्शी) याच्याशी लग्न लावल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादीनुसार, लग्नानंतर सुरज मोरे याने तिला पनवेल (मुंबई) येथे नेऊन एका खोलीत मारहाण केली. तसेच ७ ते ९ मार्च दरम्यान तिच्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## हायवे रस्ता ओलांडताना दिली धडक

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

सोलापूर - पुणे हायवे रस्ता ओलांडून पायी चालत जात असताना दि. ५ मार्च रोजी गणेश शिवानंद स्वामी रा. देशमुख पाटील वस्ती, सोलापूर याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एम एच १३ डिके ८६०९ ही भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवून गजानन आनंदाप्पा जिगजेवणगी रा. मुक्काम पोस्ट, लोणी बुद्रुक, ता. चडचण, जि. विजापूर, कर्नाटक यांना धडक देऊन त्यांच्या कपाळावर, दोन्ही डोळ्याजवळ दुखापत झाली व जखमी केले. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दि. १४ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ढोबळे करत आहेत.

## सोलापूरच्या वनिता भोसले ''महाराष्ट्र भूषण सन्मान'' पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

महिला व बाल आरोग्य क्षेत्रात गेल्या ११ वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वनिता आनंद भोसले यांना आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशन आयोजित कर्तुत्ववान व्यक्तींच्या सन्मान सोहळ्यात ''महाराष्ट्र भूषण सन्मान'' या पुरस्काराने पुणे येथे जवाहरलाल नेहरू भवन येथे गौरविले.

समाजकार्याचे शिक्षण पूर्ण करून भोसले या व्यवस्थापन, प्रशासन व प्रकल्प समन्वय या क्षेत्रातील अनुभवाचा प्रभावी वापर करत महिला व बालविकास क्षेत्रात समाजाच्या प्रगतीसाठी कार्यरत आहेत. तसेच महिला समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि महिलांचे मानसिक आरोग्य यांसारख्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून या कार्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. हा पुरस्कार सिने अभिनेत्री अपूर्वा परदेशी व नेहा पटिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भोसले यांचे कार्य म हिलांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे मत पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश विटकर यांनी व्यक्त केले. या पुरस्कारामुळे सामाजिक कार्यासाठी नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यात आणखी जोम ने समाजासाठी कार्य करण्याची भावना भोसले यांनी व्यक्त केली. भोसले या सध्या जामश्री रियाल्टी येथे कार्यरत असून त्याचे जामश्री रियाल्टीचे संस्थापकिय संचालक राजेश दमाणी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## सन्मान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे महिलांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून सन्मान बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आंबेडकर गृहनिम ाण संस्था यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना ''सन्मान राज्यस्तरीय पुरस्कार २०२६'' प्रदान करून गौरविण्यात आले.



संस्थेच्या संस्थापिका प्राचार्या डॉ. मीना गायकवाड यांच्या पुढाकारातून हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. यावर्षी डॉ. ज्योत्सना कोरे, वंदना कुलकर्णी, दिपाली भडकुंभे, कल्पना पोतन आणि उज्वला कटारे या पाच कर्तृत्ववान महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नवनिर्वाचित नगरसेविका संगीता शंकर जाधव यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी निवृत्त पोलीस अधिकारी मीनाक्षी पेठे व सहाय्यक धम ादाय उपायुक्त संजय पाईकराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. मीना गायकवाड यांनी वर्षभर संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देत उपस्थितांचे स्वागत केले.

सूत्रसंचालन वंदना वाघमारे व प्रा. वैभव दुड्याल यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी मेलडी बिट्स म्युझिक अकॅडमीच्या वतीने हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये दत्ता भडकुंभे, विकास सुरवसे, सुशील गायकवाड, सिद्धार्थ जाधव, रमेश बनसोडे, राम कांबळे, मनोज शिंदे, साहिल भंडारे, ऐजाज शेख, अतिश इंगळे, किरण उडानशीव, संजीवनी सिदगणे व वंदना वाघमारे यांनी सुरेल गीतांनी उपस्थितांचे मनोरंजन केले.

## आयशर टेम्पोने दिली चारचाकीला धडक

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

दि. १४ मार्च रोजी सुरेश शिवराम कटफळकर रा. मु.पो. जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे हे पत्नीसोबत, मुलगा सोहम असे चारचाकी वाहन क्रमांक एम एच १२ टीडी ४१३७ मधून तुळजापूर कडे जात असताना पर्ल गार्डन जवळ आले असता मागून येणारे आयशर टेम्पोच्या अज्ञात चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगहिने, निष्काळजीपणाने, भरधाव वेगाने चालवून चारचाकी वाहनास मागून धडक देऊन गाडीच्या मागील काच, दरवाजा, सीट व इतर वस्तूचे नुकसान केले. पत्नी वैशाली यांच्या मणक्याला व उजव्या पायाला मार लागून गंभीर जखमी केले. याबाबत आयशर टेम्पो क्रमांक एम एच ११ डीडी ८५८० चा अज्ञात चालक तेथून पळून गेला. त्याच्या विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दि. १४ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास भोगशेट्टी करत आहेत.



## मेडिकल कॉलेज पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आदर्श उभा केला : डॉ. घाटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

डॉ.व्ही.एम.मेडिकल कॉलेज कर्मचारी सह. पतसंस्थेने आपल्या पारदर्शी स्वच्छ व विना राजकारण कारभार करीत पन्नास वर्षे इतका मोठा कालखंड गाठला आहे. तीच विश्वासार्हतक वाटचाल आजही चालु आहे. सहकार क्षेत्रातील हे विरळा उदाहरण असावे असे गौरवोद्गार माजी अधिष्ठाता डॉ. सुनील घाटे यांनी काढले.

हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्तच्या जाहीर समारंभात अध्यक्षस्थानावरुन डॉ घाटे मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर श्री.छ.शिवाजीम हाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्वीक जयकर, पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, डि. टी. जोशी, कवी-देवेंद्र औटी, रमाकांत फुटाणे उपस्थित होते.

प्रारंभी डि. टी जोशी यांनी स्थापनेपासुनचा सर्व इतिहास सविस्तर मांडला. यावेळी आर. आय.तळे, बी. टी जोशी, रविंद्र नायडु,वाय.आर पांढरे,,विद्यमान चेअरमन सौ.वर्षा कमटम,यांचेसह संचालक मंडळ सर्व सभासद उपस्थित होते. सुत्रसंचालन कवी देवेंद्र औटी यांनी केले. आभार संस्थेचे लिपीक एम. एन. बोलाबत्तीन यांनी मानले.

## निधन वृत्त...



### डॉ. प्रणव ताटी

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रणव ताटी यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ३४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, भाऊ असा परिवार आहे. दिवंगत डॉ.पांडुरंग रामलिंग ताटी यांचे ते चिरंजीव होत.

# समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी मंडळात छत्रपती शिवाजी म हाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान उत्साहात पार पडले. मार्डी मंडळात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर टप्पा क्र. १ या शिबिराचे आयोजन केले होते; त्यास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

यावेळी उपजिल्हाधिकारी म हसूल लक्ष्मण कुसेकर, तहसिलदार निलेश पाटील, या कार्यक्रमास महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, जिल्हा परिषद सदस्य इंद्रजीत पवार, चैताली मुळे, पंचायत समिती सभापती तेजस्विनी बोराडे, उपसभापती सुनील भोसले, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, सहा. गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, तालुका कृषी अधिकारी माळी, उपाधीक्षक भूमि अभिलेख उत्तर सोलापूर पवार यांच्यासह सरपंच प्रांजली पवार, उपसरपंच श्रीकांत म ार्तंडे, नरोटेवाडी गावचे सरपंच उमेश भगत, सेवालाल नगर गावचे सरपंच दीपा राठोड, अकोली काटीचे सरपंच अंजली क्षीरसागर, बानेगावचे सरपंच लिंबाजी जाधव, कारंबा सरपंच तुकाराम चव्हाण, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. तसेच मार्डी मंडल अधिकारी व मार्डी मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, सर्व महसूल सेवक, पोलीस पाटील, तहसिल कार्यालय मधील सर्व मंडल अधिकारी, तहसिल कार्यालय मधील महसूल शाखा, पुरवठा शाखा, संजय गांधी शाखा, कृषी विभाग, आरोग्य विभाग,पंचायत समिती, भूमी अभिलेख कार्यालय तसेच शासनाचे विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते; त्यावेळी वेगवेगळे लाभ लाभार्थी यांना वाटप केले.

**विविध विभागाने शिबिरात केली अशी कामगिरी**

महाराजस्व अभियानात संजय गांधी शाखेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी १०६ जणांचे अर्ज घेवून त्यांच्या समस्या मार्गी लावल्या. तर पशु संवर्धन व दुग्धव्यवसाय योजनेची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. सहा. दुय्यम निबंधकांनी आपल्या खात्यातील कामे केली. यामध्ये बक्षीसपत्र, वाटणीपत्र, सलोखा योजना, सोडपत्र आदींविषयक माहिती दिली. राशन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी २४६ नागरिकांच्या तक्रारी निवारण केल्या. उपाधिक्षक भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी २७, प्राथमिक आरोग्य केंद्र मार्डी अंतर्गत ११० जणांच्या समस्या निवारण, ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी मंडळातील तब्बल ५५५ जणांना सातबारा वाटप केला, ४०६ जणांना ८ अ, तलाठी उत्पन्न दाखले ८३ दिले. याचबरोबर साबांवि ५०० जनजागृती पुस्तके वाटप, महिला व बाल कल्याण योजना माहिती दिली. प्रादेशिक परिवहन, कृषी विभाग, सहाय्यक निबंधक, महावितरण आदी विविध विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध समस्या निवारण केल्या.

Classifieds

**विकणे आहे**

**चौपाड दर्शन हाईट्स येथील बिल्डींग नं. 2, RCC, I.R.K. सर्व सोईनेयुक्त 1 फ्लोर विकणे आहे.**
**9960383792**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर**

**ई निविदा सुचना - २०२६**

श्रीच्या दर्शनरांगेत बॅरीगेटींग, तात्पुरते पत्राशेड उभारणे, विद्युत व्यवस्था व इतर अनुषंगीक कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
बांधकाम विभाग/कावि/१९/२०२६
दि.१५/०३/२०२६

**सही/-**
**कार्यकारी अधिकारी**
**(संपर्क क्र. ०२१८६-२२८८८८)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जय शाह यांना उत्कृष्ट योगदानाबद्दल पुरस्कार



**मुंबई** :मुंबईत आयोजित इंडियन बिझनेस लीडर अवॉर्ड्स सोहळ्यात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दलचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाह यांनी ऑक्टोबर २०१९ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव म्हणून कार्यभार सांभाळला आणि त्यानंतर त्यांनी आयसीसीच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. बीसीसीआय मधील त्यांच्या कार्यकाळात भारताने लक्षणीय यश संपादन केले; यामध्ये दोन १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषक व दोन १९वर्षांखालील महिला विश्वचषकांचा समावेश आहे. वरिष्ठ संघांनीही उत्कृष्ट कामगिरी करत पुरुष टी-२० विश्वचषक २०२४ चे विजेतेपद पटकावले. याशिवाय दोन जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धांमध्ये व पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३ मध्ये भारत उपविजेता ठरला.

### फिरकीपटू कुलदीप यादव मसुरीमध्ये विवाहबंधनात



**डेहराडून** : भारतीय क्रिकेटपटू कुलदीप यादव याने मसुरी या निसर्गरम्य गिरीस्थानात आयोजित एका खाजगी, तरीही अनेक मान्यवरांच्या उपस्थितीने बहरलेल्या समारंभात आपली होणारी पत्नी वंशिका सिंग हिच्याशी विवाह केला. या विवाह सोहळ्याला क्रिकेट विश्वातील अनेक नामवंत व्यक्तींनी उपस्थिती लावली होती. यामध्ये तिलक वर्मा, रिंकू सिंग, युजवेंद्र चहल, मोहम्मद कैफ, आर.पी. सिंग आणि सुरेश रैना यांचा समावेश होता; या सर्वांनी भारताच्या या फिरकी गोलंदाजासोबत हा विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी एकत्र हजेरी लावली. विवाहाचे विधी आठवड्याच्या सुरुवातीला सुरू झाले होते आणि शनिवारच्या रात्री उशिरापर्यंत सुरू राहिले, ते या लोकप्रिय पर्यटन स्थळावरील एका प्रसिद्ध आलिशान हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आले होते. या समारंभासाठी विवाहस्थळ विशेषत्वाने सजवण्यात आले होते. बागेश्वर धामचे आध्यात्मिक गुरु धीरेंद्र शास्त्री यांनीही या समारंभाला उपस्थिती लावली आणि नवविवाहित जोडप्याला आपले आशीर्वाद दिले.

### भारत-हाँगकाँग आशियाई कप पात्रता सामना ३१ मार्च रोजी

**नवी दिल्ली** : भारतीय पुरुष फुटबॉल संघाचा एएफसी आशियाई चषक सौदी अरब २०२७ पात्रता फेरीतील हाँगकाँगविरुद्धचा अखेरचा सामना ३१ मार्च रोजी कोची येथे खेळला जाणार आहे. एएफसी आशियाई चषक २०२७ स्पर्धेतील स्थान मिळवण्याच्या शर्यतीतून बाहेर पडलेल्या भारताचे ध्येय आपली पात्रता मोहीम विजयासह संपवण्याचे असेल. पात्रता फेरीच्या संदर्भात हा सामना केवळ औपचारिकता असेल, कारण हाँगकाँग संघही स्पर्धेबाहेर झाला आहे, तरीही फिफा क्रमवारीचे गुण मिळवण्याची संधी असल्याने या सामन्याला अजूनही महत्त्व आहे. एएफसी आशियाई चषक सौद अरब २०२७ पात्रता फेरीच्या अंतिम टप्प्यात भारतासाठी हे तिसरे वेगळे यजमान शहर असेल. यापूर्वी गत मार्चमध्ये शिलाँगने बांगलादेशविरुद्धच्या सामन्याचे, तर गत ऑक्टोबरमध्ये मडगावने सिंगापूरविरुद्धच्या सामन्याचे यजमानपद भूषवले होते. या सामन्याद्वारे, कोची येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर भारतीय संघ खेळण्याची घटना १० वर्षांनंतर प्रथमच घडणार आहे. मार्च २०१६ मध्ये, याच मैदानावर भारताचा सामना फिफा विश्वचषक पात्रता फेरीत तुर्कमेनिस्तानविरुद्ध झाला होता.

### सरफराज अहमद निवृत्त

कराची : पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या भारतावर मात करत, दोन प्रमुख आयसीसी स्पर्धांचे अंतिम सामने जिंकणारा एकमेव पाकिस्तान संघाचा कर्णधार आणि यष्टिरक्षक-फलंदाज सरफराज अहमद याने रविवारी क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती जाहीर केली. डिसेंबर २०२३ मध्ये पर्थ येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात अखेरचा राष्ट्रीय संघाकडून खेळणाऱ्या सरफराजने एका निवेदनाद्वारे आपल्या या निर्णयाची माहिती दिली. या औपचारिक घोषणेमुळे आता पीसीबीला सरफराजची राष्ट्रीय कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी दीर्घकालीन कालावधीसाठी नियुक्ती करणे शक्य होईल. कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जागा गत काही काळापासून रिक्त होती. गत वर्षी कसोटी संघाचे हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहणारे अष्टपैलू खेळाडू अझहर महमूद यांचा करार पीसीबीने संपुष्टात आणल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. मे महिन्यात ३९ वर्षांचा होणाऱ्या सरफराजची अलीकडेच पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील संघाचा व शाहीन संघांचा मार्गदर्शक व व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

# संजू सहा षटकांतच सामना जिंकून देऊ शकतो : गंभीर

**नवी दिल्ली, १५ मार्च**

संजू सॅमसनमध्ये अशी जबरदस्त क्षमता आहे की, जेव्हा तो आपल्या सर्वोत्तम व आक्रमक लयीत असतो, तेव्हा तो पॉवरप्लेमध्येच प्रतिस्पर्ध्यांच्या हातून सामना हिरावून घेऊ शकतो, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी म्हटले आहे.

पुरुष टी-२० विश्वचषकाच्या निर्णायक टप्प्यावर सॅमसनने अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली; उपांत्य व अंतिम सामन्यात त्याने धडाकेबाज अर्धशतके झळकावत भारताला विक्रमी तिसरे विजेतेपद पटकावून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

अभिषेक शर्माच्या साथीने, सॅमसनने अंतिम सामन्यात पॉवरप्लेमध्येच ९२ धावा काढत न्यूझीलंडकडून सामना हिरावून घेतला.

संजू काय करू शकतो हे आम्हाला ठाऊक आहे; त्याच्या प्रतिभा व आक्रमकतेबद्दल आमच्या मनात कधीच कोणतीही शंका नव्हती. जर त्याला सूर गवसला, तर तो पहिल्या सहा षटकांतच सामना जिंकवून देऊ शकतो, असे गंभीरने सांगितले.



गौतम गंभीर व संजू सॅमसन

न्यूझीलंडविरुद्धच्या विश्वचषकापूर्वीच्या मालिकेत वाईट कामगिरी झाल्यामुळे सॅमसनला विश्वचषकातील सुरुवातीच्या सामन्यांमध्ये अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाले नव्हते.

मात्र, झिम्बाब्वेविरुद्धच्या जिंकणे अनिवार्य असलेल्या सामन्यात जेव्हा त्याला संधी देण्यात आली, तेव्हा सॅमसनने १५ चेंडूंत २४ धावांची जलद खेळी करत भारताला एक जबरदस्त सुरुवात करून दिली.

भारताच्या शेवटच्या तीन सामन्यांमध्ये त्याने अनुक्रमे ९७ (नाबाद), ८९ आणि ८९ धावांची खेळी केली. मी त्याला जिममध्ये असतानाच याबद्दल सांगितले होते. खरे तर, आम्ही दोघेही एकत्रच सराव करत होतो. मी त्याला सहजच सांगितले की, तू झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात खेळणार आहेस. त्यावर तो म्हणाला, येऊ दे तो सामना! आमच्यात अशाच प्रकारची अनौपचारिक चर्चा होत असते. आमच्यातील नाते हे केवळ मुख्य प्रशिक्षक आणि खेळाडू यांच्यातील औपचारिक नाते नाही, तर ते असे नाते आहे जिथे आमच्यातील बहुतेक वैयक्तिक चर्चा सराव सत्रांदरम्यानच होत असतात, असेही गंभीर म्हणाला.

संघात सॅमसनचा समावेश नसताना भारताच्या फलंदाजीच्या अव्वल फळीत- ईशान किशन, अभिषेक शर्मा व तिलक वर्मा या तीन डावखुऱ्या फलंदाजांचा समावेश होता. मात्र, सॅमसनला अंतिम एकादशमध्ये स्थान देण्याचा निर्णय हा डावखुऱ्या फलंदाजांची ती जोडी तोडण्याच्या उद्देशाने घेतला नव्हता, तर संघाच्या फलंदाजीमध्ये अधिक आक्रमकता आणि ताकद वाढवण्याच्या उद्देशाने घेतला होता, असे गंभीरने स्पष्ट केले. गत दीड वर्षापासून मैदानात उतरून शक्य तितका आक्रमक खेळ करायचा अशीच आमची विचारसरणी राहिली आहे, असे तो म्हणाला. अभिषेकला या स्पर्धेचा पहिला टप्पा कठीण गेला, त्याला तीन वेळा शून्य धावांवर बाद व्हावे लागले. मात्र, या सलामीच्या फलंदाजाने जोरदार पुनरागमन केले आणि दोन अर्धशतके झळकावली, यात अंतिम सामन्यातील एका अर्धशतकाचाही समावेश होता.

अभिषेकबद्दल आमच्या मनात यत्किंचितही शंका नव्हती. खरे सांगायचे तर, त्या ड्रेसिंग रूममधील कोणत्याही खेळाडूच्या बाबतीत आमची हीच भावना होती. टी-२० विश्वचषकासाठी देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्यांची निवड झाली होती, त्या प्रत्येकावर आमचा नेहमीच पूर्ण विश्वास होता, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# भारताची ५ पदकांसह सांगता

### जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक

**बँकॉक, १५ मार्च**

बँकॉक येथे आयोजित जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक २०२६ स्पर्धेतील भारताच्या मोहिमेची सांगता एकूण पाच पदकांसह झाली. यामध्ये एका सुवर्ण, तीन रौप्य आणि एका कांस्य पदकाचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाच्या युवा मुष्टियुद्ध खेळाडूंची होत असलेली सातत्यपूर्ण प्रगती प्रकर्षाने दिसून येते.

भारताच्या या कामगिरीचे नेतृत्व चंद्रिका पुजारी हिने केले. महिलांच्या ५१ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत तिने अत्यंत वर्चस्वपूर्ण कामगिरी करत, उझबेकिस्तानच्या मार्दोनोव्हा नाझोकतचा एकमताने दिलेल्या निर्णयाद्वारे पराभव केला.

युवा ऑलिम्पिकच्या विविध वजनी गटांमध्ये स्पर्धा करताना, भारताच्या १९ वर्षांखालील पुरुष व महिला संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध आत्मविश्वासाने भरलेल्या कामगिरीची मालिकाच सादर केली. या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय पथकातील निम्म्याहून अधिक खेळाडूंनी पदके जिंकून मायदेशी परतीचा प्रवास केला.

जागतिक बॉक्सिंगचे अध्यक्ष गेनाडी गोलोव्हकिन व बीएफआयचे अध्यक्ष अजय सिंग हे या स्पर्धेचे बारकाईने निरीक्षण करत असताना, बँकॉक येथील या प्रदर्शनाने भारताच्या युवा बॉक्सिंग परिसंस्थेची होत असलेली सातत्यपूर्ण जडणघडण दर्शविली. तीन भारतीय बॉक्सर्सनी आपापल्या वजनी गटांच्या अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर रौप्य पदकांवर समाधान मानावे लागले. गुंजन (४८ किलो) हिला अंतिम फेरीत इंग्लंडच्या प्रतिस्पर्ध्याकडून ५-० अशा निर्णयाने पराभव पत्करावा लागला, तर जॉयश्री देवी (५४ किलो) हिने कडवी झुंज दिली, मात्र तिला अमेरिकेच्या बॉक्सरकडून ४-१ ने पराभूत व्हावे लागले. पुरुषांच्या ५० किलो वजनी गटात, एल. अंबेकर मीतेई यालाही अंतिम लढतीत युक्रेनच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभव पत्करावा लागल्याने रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. या स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात, राधामणी लोंगजाम (५७ किलो) हिने कांस्य पदक निश्चित केले. उपांत्य फेरीत युक्रेनच्या येव्हानहेलिना पेट्रुकविरुद्ध झालेल्या अत्यंत अटीतटीच्या लढतीत पराभव पत्करावा लागल्याने तिला अंतिम फेरीत प्रवेश करता आला नाही. (वृत्तसंस्था)



# अमरावती, अहिल्यानगरला विजेतेपद

### राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धा : सोलापूरला तृतीय स्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धेत इंडियन राऊंड प्रकारात १३ वर्षांखालील मुलांच्या गटात अमरावती व मुलींच्या गटात अहिल्यानगरने विजेतेपद पटकाविले. नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ही स्पर्धा पार पडली. मुलांच्या गटात पिंपरी चिंचवड व सोलापूर तर मुलींच्या गटात नाशिक व साताराने अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान संपादिले.

या स्पर्धेतील वैयक्तिक विजेते : मुले : सिद्धांत घुंगर्डे (३५५, पिंपरी चिंचवड), देवांश काळे (३४७, पुणे), अंकुश सिंग (३४६, पिंपरी चिंचवड). मुली : आरवी जाधव (३५२, पुणे), जिवाशा अग्रवाल (३५०, अहिल्यानगर), सायली जाधव (३४७, सातारा).

## चंद्रशेखर गायकवाड ५ किलोमीटर धावण्यात द्वितीय

**सोलापूर, दि. १५ मार्च-**



तुळजापूर येथे झालेल्या रोटरी क्लबच्या ५ किमी रनिंग स्पर्धेत ४५ ते ५५ वयोगटात येथील चंद्रशेखर गायकवाड यांनी द्वितीय स्थान मिळविले. हे अंतर त्यांनी २४ मिनिटांत पूर्ण करत आपल्या फिटनेस व सातत्यपूर्ण सरावाची छाप पाडली. घाटातील स्पर्धेत चुरशीची लढत पाहायला मिळाली, चंद्रशेखर गायकवाड हे धावण्याच्या क्षेत्रात सक्रिय असून सोलापूरमध्ये आयोजित होणाऱ्या आझादी अल्ट्रा मॅरेथॉन या स्पर्धेचे ते आयोजक आहेत. धावण्याच्या माध्यमातून फिटनेस आणि आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांचे चाललेंजर स्पोर्ट्सतर्फे अभिनंदन करण्यात आले.



# कराटे कलर बेल्ट परीक्षा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स यांच्या वतीने आयोजित कलर बेल्ट परीक्षा नेहरूनगर येथील जागृती विद्या मंदिर येथे उत्साहात पार पडली.

या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कराटेच्या विविध तंत्रांचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. पंच, किक, काता तसेच स्वसंरक्षण तंत्रांचे मूल्यमापन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षा देत आपली तयारी प्रभावीपणे सादर केली. ही परीक्षा ग्रँड मास्टर युवराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षक मास्टर किशोर चंदनशिवे यांनी घेतली. कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन मुख्य प्रशिक्षक मास्टर अभिजीत गायकवाड यांनी केले. तसेच प्रशिक्षक सम्राट गायकवाड, अनुराग देडे, संदीप गायकवाड, किमया सपाटे मॅडम, वैभवी दळवी मॅडम व मोनिका गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.



# वर्धापन दिनानिमित्त मंद्रूपमध्ये खेळाडूंचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १५ मार्च-**

मंद्रूप येथील न्यू गोल्डन क्लबच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात परिसरातील गुणवंत खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे यांनी केले.

मंद्रूप व परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी न्यू गोल्डन क्लब गेल्या सतरा वर्षांपासून सातत्याने कार्यरत असून हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनिता कोरे होत्या. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.


यावेळी युवराज राठोड, पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, ग्राम सेविका सुजाता व्हनकडे, प्रा. डॉ. कैलास कसबे, विश्वनाथ हिरेमठ, मोहम्मद अलकमा, शिवपुत्र जोडमोटे, सुरेश टेळे, शिवानंद लोभे, यासीन मकानदार, उमाशंकर रावत, श्रीधर टेळे, भागण्णा अटकर, मोतीराम चव्हाण, पिरसाब हवालदार, दानेश शेख, मल्लीनाथ घाले, संतोष बरूरे, प्रवीण कुंभार, शिवराज मुगळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबलू शेख यांनी केले, सूत्रसंचालन बिलाल शेख यांनी केले, तर आरिफ नदाफ यांनी आभार मानले.

# सोलापुरात रंगणार चौथी महिला महाराष्ट्र केसरी

**वासा व माती पूजन उत्साहात** | **विजेतीला मिळणार किया सोनेट कार; उपविजेतीला बुलेट**








**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

येथील ह. दे. प्रशालेच्या मैदानावर २८ व २९ मार्च रोजी चौथी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा रंगणार आहे. बोरामणीचे पैलवान सिद्धाराम साखरे यांच्या स्मरणार्थ, निर्झरा केअर फाउंडेशनने या भव्य स्पर्धेचे आयोजन केले आहे.

सोलापुरात प्रथमच होत असलेल्या या महिला केसरी स्पर्धेत ४२ जिल्ह्यातील ४०० मल्ल सहभागी होतील. या स्पर्धेसाठी वासा व माती पूजन रविवारी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. महिला कुस्तीला हक्काचे व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल निर्झरा केअर फाउंडेशनच्या आयोजिका स्वाती अळीमोरे-साखरे व सोमनाथ अळीमोरे यांचा अक्कलकोट स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व सागर कोळेकर यूथ फाउंडेशनतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

महिला कुस्ती क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या स्पर्धेतील बक्षिसांचे स्वरूप अत्यंत आकर्षक आहे. विजेतीला किया सोनेट कार व उपविजेतीला बुलेट मोटारसायकल देण्यात येणार आहे.तसेच प्रत्येक वजनी गटातील विजेत्या मल्लांना ५१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. या स्पर्धेसाठी वासा व माती पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी याचे दीपप्रज्वलन आमदार विजयकुमार देशमुख व महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, जि. प. सदस्य नेताजी खंडागळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केदार विभुते, नगरसेवक अक्षय अंजीखाने, ज्ञानेश्वर म्यकेल, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते दादासाहेब सरवदे, ज्येष्ठ कुस्ती संघटक राजाभाऊ देशपांडे, कुस्ती सम्राट अस्लम काझी, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, चनवीर बिराजदार, सुधीर लांडे, बालाजी चौगुले, समीर कोळेकर, योगेश बोंबाळे, दीपक चौगुले, गोपी घोडके, अतिश मोरे, अमर दुधाळ, अर्जुन साठे, सुनील शेवणकर, रविराज सरवदे, धीरज, राणू दोरकर आदी पैलवानांसह, माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, क्रीडा संघटक भीमराव बाळगे, क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे, प्रकाश कंपली आदी उपस्थित होते उपस्थितांचे स्वागत सागर कत्ते, सुरेश माळगे व सोमनाथ पटणी यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# महाळुंग-श्रीपूरचा विधानसभेत गाजला प्रश्न



## आमदार पाटलांनी केला प्रशासनाचा पंचनामा

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१५ मार्च-**

महाळुंग ग्रामपंचायतीचे महाळुंग-श्रीपूर नगरपंचायती मध्ये रुपांतर होऊन ४ वर्षांचा कालावधी लोटला असून कायम स्वरूपी मुख्याधिकारी नाही तसेच प्रशासकीय सेवेतील ८ पदे रिक्त असल्याने नगरपंचायीचे काम थंड पडले असल्याने या प्रश्नी सरकारचे नेमके धोरण काय आहे असा प्रश्न माढा मतदार संघाचे आ. अभिजीत पाटील यांनी विधानसभेमध्ये उपस्थित करून शासनाचा कामाचा पंचनामा केला. महाळुंग ग्रामपंचायीचे महाळूंग-श्रीपूर नगरपंचातीचे रूपांतर होऊन चार वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे. परंतु नगरपंचायत झाल्यापासून ना कायम स्वरूपी मुख्याधिकारी व प्रशासन अधिकारी त्यामुळे जसे नावडितीचे मूल असते तशीच परिस्थिती या नगरपंचायतीची झाली आहे.

खरे तर नगरपंचायत झाल्यावर नागरिकांना चांगल्या सुविधा मिळतील यात प्रामुख्याने नागरी वस्त्यांमध्ये गटारी, अंतर्गत रस्ते, पुरेसे पाणी, स्वच्छता व सिमेंटचे पक्के रस्ते या मुलभूत सुविधा मिळतील असे वाटत होते. परंतू चार वर्षांचा कालावधी पाहता पहिल्यासारखी ग्रामपंचारतच बरी होती असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली. नगरपंचायतीच्या ४ वर्षाच्या काळात सुमारे ११ मुख्याधिकारी येवून गेले अपवाद सोडता सर्व जण प्रभारी असलेले आठवड्यातून दोन वेळा येत असत. मात्र महत्वाचे अन्य अधिकारी यांची नेमणूकच न झाल्याने अधिकाऱ्याविना पोरकी असल्याने कोणतेही भरीव काम होत नाही वा झाले नाही. नागरिक कोणतेही काम घेवून गेले तर अधिकारी नाहीत ही सबब सांगितली जाते. वास्तविक पाहता माळशिरस तालुक्यात महसुली उत्पन्नाच्या बाबतीत अकलूज खालोखाल महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत येते तरीही अशी अवस्था आहे.

परंतू या गंभीर प्रश्नी आ. अभिजित पाटील यांनी विधानसभेत जाब विचारताना या नगरपंचायती मध्ये करनिरिक्षक प्रसासकिय अधिकारी दोन पदे, लेखा आणि परिक्षण २ पदे, आस्थापना अभियंता १ पद , पाणी पुरवठा अधिकारी १ पद , नगररचनाकार १ पद , स्वच्छता निरीक्षक १ पद अशी आठ पदे असून यात दोन पदे भरली आहेत त्यात ऋतुजा गायकवाड या आठवड्यातून एकच दिवस येतत तर नूतन जाधव या मला येथे रुजू करून घेता येत नाही कारण मला दुसरी परिक्षा द्यायची आहे म्हणजेच ही आठही पदे रिक्त असल्या सारखीच आहेत. म्हणजे पूर्ण वेळ मुख्याधिकारी व प्रशासन अधिकारी जर नेमलेच नाहीत तर कामकाज कसे चालणार असा सवाल केला आहे आ. अभिजित पाटील यांनी महाळूंग-श्रीपूर नगरपंचायतीच्या कामाचे शासकीय दुरावस्थेमुळे होणाऱ्या नुकसानीवर प्रकाश टाकल्याने व शासन दरबारी प्रश्न मांडल्याने सरकार नेमकी कसे पावले उचलते हे पाहणे आवश्यक आहे .

### नगरसेवकांची मोठी गोची

नगरपंचायत स्थापनेनंतर पंचवार्षिक निवडणूकीत मोहीते पाटील गटाचे ९ सदस्य निवडून आले यात विद्यमान उपनगराध्यक्ष भिमराव रेडे – पाटिल यांचे ५, नानासाहेब मुंडफण ४, तर विरोधी राहूल रेडे – पाटील (बबनदादा शिन्दे गट ) ६ , भाजपा अनिल जाधव गट १ , व कॉंग्रेस धवलसिंह मोहीते पाटील १ असे १७ नगरसेवक निवडून आले . त्यामुळे मोहीत पाटील गटाची सत्ता स्थापन झाली. परंतू शासकीय अधिकारी नसल्याने कोणतेही भरीव काम न झाल्याने येणाऱ्या निवडणुकीत मतदारांसमोर काय कामे केली कसे सांगणार अशी गोची नगरसेवकांची झाली आहे.

## महत्वाचे...



### खंडाळी येथे महिला दिन उत्साहात

**मोहोळ, दि. १५ मार्च-**

खंडाळी ता. मोहोळ येथे ग्रामपंचायत कार्यालय व स्व. प्रभाकर मुळे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमामध्ये विद्यमान ग्रामपंचायत सदस्या, आरोग्य विभागातील कर्मचारी, अंगणवाडी सेविका, बचत गटातील महिला तसेच विविध क्षेत्रातील सुमारे १०० ते १५० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच लता प्रभाकर मुळे होत्या, तर तुंगत ग्रामपंचायतच्या लोकनियुक्त सरपंच डॉ.अमृता आबा रणदिवे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात औदुंबर मुळे यांनी 'सशक्त नारी सशक्त समाज' या विषयावर विचार मांडत महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नसल्याचे प्रतिपादन केले. यावेळी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू-चमचा स्पर्धा, उखाणे अशा विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.




### शेतीच्या आधुनिकतेसाठी इस्राईल तंत्रज्ञान आवश्यक : गंगाधर बिराजदार

**दक्षिण सोलापूर, दि. १५ मार्च-**

इस्राईलमध्ये संपूर्ण शेती स्वयंचलित ठिबक सिंचनावर केली जाते. सांडपाण्याचा वापर प्रक्रिया करून पुन्हा शेतीस वापरले जाते, पारंपारिक शेतीपेक्षा जागतिक बाजारपेठेत कोणत्या पिकास मागणी जास्त आहे, अशी पिके लावली जातात व निर्यात केली जातात यामुळे मोठ्या प्रमाणात परकीय चलन शेतीउत्पादनातून देशाला प्राप्त होते. यामुळे इस्राईलमधील शेतकरी प्रगत वा आर्थिक समृद्ध आहे. याचे अनुकरण आपणही केले तर आपणही जागतिक प्रगत शेतकऱ्यांसोबत स्पर्धेत टिकणार आहे आणि तेंव्हाच आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार आहे, असे गंगाधर बिराजदार यांनी सांगितले. निंबर्गीचे प्रगतशील शेतकरी गंगाधर बिराजदार हे महाराष्ट्र शासन कृषी विभाग मार्फत दिनांक ९ ते १९ फेब्रुवारी दरम्यान इस्राईल आंतरराष्ट्रीय शेतकरी अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पूर्ण करून आल्याबद्दल मौजे निंबर्गी येथील सर्व शेतकरी व मित्रपरिवाराच्या वतीने स्वामी समर्थ सूत गिरणीचे संचालक शंकरराव पाटील व निंबर्गीचे सरपंच श्रीदीप हसापुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आपल्या मनोगतातून शंकरराव पाटील, श्रीदीप हसापुरे, भारत बिराजदार, निशांत लाडे यांनी बोलताना बिराजदार यांनी केलेल्या उल्लेखनीय शेती कार्याचा दाखला देत त्यांचे अभिनंदन केले. प्रास्ताविक कल्याणी शिरगोंडे यांनी केले व सूत्रसंचालन कृषी सहायक अशोक राठोड यांनी व आभार उपसरपंच पिरसाब हवालदार यांनी मानले. यावेळी शशिकांत दुपारगुडे, भारत बिराजदार, चन्नप्पा बोरगी, मंडल कृषी अधिकारी किरण सांवत, रावसाहेब आळगी, इरेशा कोळी, विकास बिराजदार, सिद्धाराम हत्ताळे, राजेश गुडेलू, दीपक धारेराव उपस्थित होते.



### पिलीव येथे कायदेविषयक शिबीर

**पिलीव, दि. १५ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीवच्या शहराध्यक्षा पूनम भैस यांच्या वतीने जागतिक महिला दिन व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महिलांना कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन निर्भया पथकाच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक करिष्मा वनवे, पिलीव पंचायत समिती गणाच्या सदस्या नम्रता पुकळे, तांदुळवाडी पंचायत समिती गणाच्या सदस्या मनिषा पाटील यांच्या हस्ते ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अंगणवाडी पर्यवेक्षिका राऊत, डॉक्टर शेवाळे यांनी मार्गदर्शन केले सूत्रसंचालन करडे यांनी केले. प्रास्ताविक व आभार शहराध्यक्ष पूनम भैस यांनी मानले. यावेळी निर्भया पथकाच्या सपोनी करिष्मा वनवे, प्रशासक एम.व्ही. मिसाळ, ग्रामपंचायत अधिकारी सदाशिव भंडलकर, दामोदर लोखंडे, नम्रता पुकळे, मनिषा पाटील, अॅड. आसावरी घाटे, स्नेहल पाटील, समाधान देशमुख, पद्मजा पिसे उपस्थित होत्या.

### वृक्षारोपण करुन महिला दिन साजरा

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

कुंभारी जवळील शिवपार्क येथील नियोजित बागेतील जागेत वृक्षारोपण करीत महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. पूजनम गायकवा, मनीषा धुमाळ यांनी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जयश्री रोकडे, अंजना होटकर, रेखा पारशेट्टी, सोनाली कांबळे, अंजली कांबळे, ज्योती लोकर, संगीता काटकर, रोहिणी बिराजदार, मथुरा भोसले उपस्थित होते. याप्रसंग संगीत खुर्चीचा कार्यक्रम होऊन अल्पोपाहार करुन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव रोकडे, शशिकांत धुमाळ, दत्ता कांबळे, आप्पासाहेब पारशेट्टी, सुभाष भोसले, नागेश कांबळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन महेश गायकवाड यांन केले तर प्रस्तावना व आभार सटवाजी होटकर यांनी मानले.




## निमगाव टें येथे महिला सक्षमीकरण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १५ मार्च-**

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानातर्गत निमगाव टे. येथे महिलादिनाचे औचीत्य साधून महिला सक्षमीकरण सप्ताह नुकताच संपन्न झाला असून विवीध क्षेत्रात उल्लेखनीय कामगीरी करणाऱ्या या यशस्वी महीलांना यशस्वी महीला गौरव पुरस्कार' कार्यक्रमाच्या अध्यक्षा गार्गी यशवंत शिंदे यांच्या हस्ते प्रधान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर भारती शिंदे, माधुरी गुटाळ, ग्रा.स. मनिषा मराठे, सुवर्णा लोंढे उपस्थीत होत्या.

यानिमीत्ताने गावात महिला बचत गटाचे साहीत्य, प्रदर्शन व विक्री चे स्टॉल उभारण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत महीलांची आरोग्य तपासणी यासह अनेक उपक्रम राबवले. महीलांच्या या स्टॉलला प्रणीता रणजितसिंह शिंदे यांनी भेट दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच यशवंत संजयमामा शिंदे ग्रामविकास अधिकारी नवनाथ दोंड यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांनी प्रयत्न केले. यावेळी चंद्रभागा कांबळे, वंदना नलवडे, मनिषा शिंदे, माधुरी देशमुख, कांचन शिंदे, ऋतुजा राजपूत, शाहीन मुलाणी, दीक्षा शिंदे, समीक्षा खंडाळे, अनिता वरपे यांचा सन्मान केला

## पुळुज, भाळवणी मंडळात १५०५ विविध दाखल्यांचे वितरण

### तहसीलदार लंगुटे, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मार्च-**

पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे राबविण्यात येत आहे. या अभियानातंर्गत आज दिनांक १४ रोजी पंढरपूर तालुक्यातील पुळुज व भाळवणी या मंडळातून एक हजार ५०५ विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

या अभियानातंर्गत पुळुज व भाळवणी येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार २११, सातबारा मधील दुरुस्ती ४४, डिजिटल सातबारा २८८, ८ अ उतारे १९६, विविध दाखले ५६२, प्रमाणपत्रे ४१८, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज १४, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे १०, सामाजिक योजना २३, शिधापत्रिका १३३, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ५४, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार ७९, ई- मोजणी फेरफार नकाशा ३५, आदी सेवा व दाखले देण्यात आले.



यामध्ये पुळुज मंडळातून ७५० तर करकंब मंडळातून ७५५ असे एकूण एक हजार ५०५ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, नायब तहसीलदार वैभव बुचके, दीपक शिंदे, दुय्यम निबंधक निराळी, निमसडे, मंडळ अधिकारी संतोष सुरवसे पुळुज, गणेश साठे भाळवणी उपस्थित होते.

### या ठिकाणी पुढील शिबिरांचे आयोजन )

यानंतर शुक्रवार दि.१० एप्रिल रोजी खर्डी, पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी भंडीशेगाव, रोपळे. शुक्रवार दि. ८ मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि.१५ मे रोजी तुंगत चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले आहे.



## शंकरलिंग प्रशालेत शालेय निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १५ मार्च-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत टाटा बिल्डिंग इंडिया यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आत्मनिर्भर भारत या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निबंध स्पर्धा ही लहान गट (इयत्ता पाचवी ते आठवी) व मोठा गट (इयत्ता नववी व अकरावी) अशा दोन गटांत घेण्यात आली.

या निबंध स्पर्धेत प्रशालेतील बहुतांश विद्यार्थी सहभागी झाले होते. लहान गटातून साक्षी भैरामडगी (८ वीअ), संस्कृती हंजगे (६वीअ), झीनत तडमूड (८वीअ या विद्यार्थिनींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले तर मोठ्या गटातून श्रेया फुलारी(९वी अ), काजल माळी (११वी) व साईगंधा जमादार (९वीअ) या विद्यार्थिनींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले.

यशस्वी विद्यार्थिनींना टाटा बिल्डिंग इंडिया यांच्यातर्फे अनुक्रमे गोल्ड मेडल, सिल्वर मेडल व ब्राँझ मेडल तसेच आकर्षक प्रमाणपत्र देऊन प्राचार्य वीरेश थळंगे, टाटा बिल्डिंग इंडियाचे ऑपरेशन एक्झिकेटिव्ह स्वप्निल राजेंद्र माशाळ व वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. परीक्षेचे परीक्षक म्हणून बसवराज दुधगी व प्रा.संतोष शिंदे यांनी काम केले.

प्राचार्य वीरेश थळंगे यांच्यासह परीक्षक म्हणून काम केलेल्या शिक्षकांना टाटा बिल्डिंग इंडिया तर्फे मोबाईल स्टॅन्ड देऊन गौरविण्यात आले.परीक्षा यशस्वी होण्यासाठी श्रीमंत भोसले, तानाजी जमादार, सिध्दाराम भैरामडगी, निलकंठ कवटगी, वीरेश थळंगे, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगाव, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी यांचे सहकार्य लाभले.

## बार्शीत कृषीभूषण डॉ. कसपटे यांच्यावर प्राणघातक हल्ला

### शेतकरी वर्गातून संतापाची लाट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ मार्च-**

आधुनिक शेतीचे प्रणेते आणि NMK-1 Golden सीताफळ वाणाचे जनक म्हणून देशभर ख्याती असलेले कृषीभूषण डॉ. नवनाथ कसपटे यांच्यावर त्यांच्या राहत्या गावी प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जमिनीतून वीज केबल नेण्याच्या वादातून झालेल्या या हल्ल्यात डॉ. कसपटे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर बार्शी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात आणि शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

डॉ. नवनाथ मल्हारी कसपटे (वय ७१, रा. गोरमळे, ता. बार्शी) हे बुधवारी, २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४:१५ च्या सुमारास आपल्या शेतात काम करत होते. यावेळी शेजारील शेतातील वीज पुरवठ्याची केबल त्यांच्या शेतातून बेकायदेशीरपणे नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी संबंधित व्यक्तींकडे विचारणा केली असता वादाला तोंड फुटले.

हा वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपी सुधीर कसपटे, गौरव कसपटे, चंद्राणी कसपटे आणि ललिता कसपटे यांनी डॉ. कसपटे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी सुधीर आणि गौरव कसपटे यांनी लोखंडी गज आणि लाकडी दांडक्याने डॉ. कसपटे यांच्या डोक्यावर व पाठीवर गंभीर प्रहार केले. गौरव कसपटे याने चाकूने त्यांच्या नाकावर वार केल्याने ते रक्ताच्या थारोळ्यात पडले. इतर दोन महिला आरोपींनीही त्यांना दमदाटी करत मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या डॉ. कसपटे यांना तातडीने प्रथम शासकीय रुग्णालयात आणि त्यानंतर पुढील उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र, मुख्य आरोपींसह इतर तिघे अद्याप फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. हजारो शेतकऱ्यांना सीताफळ लागवडीच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य देणाऱ्या व्यक्तिमत्वावर अशा प्रकारे हल्ला झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. घटनेला अनेक दिवस उलटूनही मुख्य आरोपी अद्याप मोकाट असल्याने, पांगरी पोलिसांनी तात्काळ सर्व आरोपींच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिक आणि शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. पुढील तपास पांगरी पोलीस करत आहेत.

## राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

### शिवतीर्थावर १४ एप्रिल रोजी होणार पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ मार्च -**

महाराष्ट्र शासन समाजभुषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्यावतीने गतवर्षीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती महोत्सवानिमित्त राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.

पंढरपूर येथील शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पंढरपूर शहराचे नावलौकिक करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तरी नमूद करण्यात आलेल्या पुरस्कारासाठी मान्यवरांनी प्रतिष्ठानकडे प्रस्ताव सादर करावेत असे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक डी.राज सर्वगोड यांनी केले आहे.

यावेळी प्रतिष्ठानचे सचिव अनिल ननवरे, नितीन काळे, जयंती समिती अध्यक्ष श्रीकांत चंदनशिव, सचिव ज्ञानेश्वर कांबळे, स्वागताध्यक्ष अजिंक्य देवमारे, कार्याध्यक्ष मंजुळा धोडमिसे, उपाध्यक्ष सतीश खडके, प्रभाकर गायकवाड, खजिनदार प्रतिक कुंभारे, सहखजिनदार संजय कबाडे, विलास जगधने, आशा बागल, वंदना कसबे उपस्थित होते. प्रतिष्ठानच्यावतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या २७ मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येणार आहे.

यामध्ये प्रबुध्द विधिज्ञ महर्षि वाल्मिकी शौर्यरत्न, वर्धमान महावीर अहिंसारत्न, राष्ट्रसंत रोहिदासमहाराज प्रबोधनरत्न, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासनरत्न, राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्योगरत्न, महात्मा बसवेश्वर समाजभूषण, राष्ट्रपिता महात्मा फुले समाजरत्न, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षणभूषण, राष्ट्रसंत गाडगे महाराज शिक्षणरत्न, नारायण मेघाजी लोखंडे कामगाररत्न, डॉ. सी. के. बोले वैद्यकीयरत्न, राजश्री शाहू महाराज क्रिडारत्न, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्येष्ठ पत्रकार (प्रिंट मिडीया), विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्येष्ठ पत्रकार (इलेक्ट्रॉनिक्स मिडीया), आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर युवा पत्रकार (प्रिंट मिडीया), आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर युवा पत्रकार (इलेक्ट्रॉनिक्स मिडीया), साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न, महाकवी वामनदादा कर्डक कलारत्न, डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, भारतरत्न मोक्षगुंडम सर विश्वेश्वरया स्थापत्यरत्न, भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम विज्ञान रत्न, राजमाता जिजाऊ आदर्शमाता' पुरस्कार, माता रमाई आदर्श पत्नी, विर शिवा काशीद वीररत्न, कर्मवीर भाऊराव पाटील जीवन गौरव, गौतम राजाध्यक्ष फोटोग्राफररत्न, उत्कृष्ट कृतिशील महिला बचत गटास राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. तरी मान्यवरांनी आपले प्रस्ताव ५ एप्रिलपर्यंत सेल सेंटर मोबाईल शॉपी, चप्पललाईन शहा पेट्रोल पंपासमोर पंढरपूर, जि. सोलापूर मो. नं-७०२८२०४५८३, एस.के फुटवेअर, गजानन महाराज मठा समोर पंढरपूर, जि. सोलापूर मो. नं-९०२८९०३१३८ वरील ठिकाणी पुरस्कारासाठी प्रत्यक्ष किंवा पोस्टाद्वारे प्रस्ताव पाठविण्यात यावेत व मोबा. ९४२३३३५१००,९१३०२५७४२९,८८८८३१७१३१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सोलापुरात 'भाजपा'तर्फे राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडे मार आंदोलन






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

केंद्रीय अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना काही खासदारांसमवेत संसदेच्या प्रवेशद्वारावर बसून चहा पिल्याच्या निषेधार्थ काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्रात विविध ठिकाणी तीव्र आंदोलने करण्यात आली. याच धर्तीवर सोलापुरातील पूनम गेटसमोर राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडे मार आंदोलन केले.

भाजपाच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर म्हणाल्या की, संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पीय बजेटचे कामकाज सुरु असताना काँग्रेस नेते खा.राहुल गांधी, काँग्रेस, तसेच इतर विरोधी पक्षांतील काही खासदारांनी संसद परिसरात चहा-बिस्कीटसह चायपार्टी आयोजित केली, हे त्यांचे कृत्य अत्यंत लाजिरवाणे आहे. संसद ही देशाची सर्वोच्च लोकशाही संस्था आहे. असे कृत्य दुर्दैवी आहे.

संसदेच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. संसदीय नियमांचा भंग आहे. अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना आहे. केवळ वैफल्यग्रस्त भूमिकेतून राहूल गांधी यांनी हे कृत्य केले आहे. लोकशाही संस्थांची प्रतिष्ठा राखणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. वारंवार देश विघातक गोष्टी करणे, जनतेला भडकावणे, पंतप्रधान, संसद सभापतींचा अपमान करणाऱ्या व्यक्तीना संसदेतून हकालपट्टी करावी, असेही त्यांनी सांगितले. महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, खा.राहुल गांधी हे केवळ स्टंटबाजीसाठी असे कृत्य करत असतात. पंतप्रधानांचा अनादर करणाऱ्या या नेत्याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो. माजी आमदार नरसिंग मेंगजी यांनीही आपल्या भाषणातून खा.राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या विरोधात आगपाखड केली. या आंदोलनात उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, भाजपाचे शहर सरचिटणीस नारायण बनसोडे, ज्येष्ठ कार्यकर्ते विठ्ठल बडगंची, लक्ष्मण गायकवाड यांच्यासह भाजपाचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते सामील झाले होते.

## सोलापूर जनता सहकारी बँक निवडणूक; परिवार पॅनलला प्रचंड प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

सोलापूर जनता सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक लागली आहे. महिलांसह विविध प्रवर्गातील काही जागा बिनविरोध झाल्या आहेत. उर्वरित १० जागांसाठी निवडणूक लागली असून १२ उमेदवार रिंगणात आहेत. सोलापूर शहर-जिल्ह्यात प्रचार सुरु असून परिवार पॅनलला सभासदांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे, असे परिवार पॅनलचे प्रमुख ॲड.मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले.

मागील पंचवार्षिक निवडणुकीतून निवडून आलेल्या परिवार पॅनलच्या उमेदवारांनी उत्तम कामगिरी करुन बँकेला सुमारे १०० कोटी रुपयांचा नफा मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. सभासदांना चांगला लाभांश देखील दिला. सभासदांनी दाखवलेल्या विश्वासामुळे संचालक झालेल्या परिवार पॅनलच्या सदस्यांनी चांगली कामगिरी केल्यामुळे बँक प्रगती करत आहे, असे उमेदवार सुनील पेंडसे यांनी सांगितले.

सहप्रमुख जगदीश भुतडा, रंगनाथ बंकापूर, प्राचार्य गजानन धरणे, सुनील पेंडसे, पुरुषोत्तम उडता, राजेश पवार, गिरीश बोरगावकर, चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, रविंद्र साळे, प्रा.देवानंद चिलवंत, आनंद करवंदे, सुरेश चिक्कळी, महादेव न्हावकर, प्रमोद भुतडा, विष्णू मोंढे, मल्लिनाथ शहाबादे, अमित आपटे, डॉ.हर्षद डंबळ, चरणसिंग चौव्हाण आदी प्रचार करत आहेत.

## वृध्द दांपत्यांचा मृतदेह आढळला; मृत्युचे कारण गुलदस्त्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

स्वागत नगर रोडवरील कृष्णा नगर परिसरातील एका घरात वृध्द दाम्पत्यांचा मृतदेह आढळला. ही घटना खूनाची की अन्य काही कारणामुळे घडली आहे, याचे कारण मात्र गुलदस्त्यात आहे. महादेव मंचाळ आणि रंगम्मा मंचाळ अशी मृत दाम्पत्यांची नावे आहेत.

महादेव मंचाळ हे गेल्या अनेक वर्षांपासून पॅरालिसिसच्या आजाराने त्रस्त होते आणि ते बेडवरच पडून होते. रविवार, दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी बराच वेळ झाला तरी घराचे दार उघडले जात नसल्याने शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी दार ठोठावून आवाज दिला.

मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शेजाऱ्यांनी दार उघडून आत पाहिले असता, पती-पत्नी दोघेही मृतावस्थेत आढळून आले. हे दृश्य पाहून शेजाऱ्यांनी तात्काळ एमआयडीसी पोलिसांना याची माहिती दिली.

पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल होत पंचनामा करुन दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पाठवले. घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात असून, घटनेची बारकाईने तपासणी सुरु आहे.

## विवाहितेचा छळ; तिघांविरोधात गुन्हा दाखल

**बार्शी, दि.१५ मार्च-**

माहेरून १० लाख रुपये घेऊन ये म्हणून दि. १२ डिसेंबर २०२४ ते २७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान राकेश पती, कलम सासू, रामचंद्र सासरे, रा. स्वागत नगर सोलापूर यांनी मिळून रितिका राकेश मोतीवाले रा. १७५, उत्तर सदर बाजार, लष्कर सोलापूर यांनी मिळून शिवीगाळ करून हाताने लाथा बुक्क्याने मारहाण केली. उपाशी ठेवून अपमान




केला व फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक, आर्थिक त्रास देऊन छळ केल्याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघां विरोधात दि. १४ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाघमोडे करत आहेत.

## सोलापुरात २० मार्च रोजी ज्ञानियांचा राजा-मोगरा फुलला कार्यक्रम


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शुक्रवार, दि.२० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सरस्वती मंदिर प्रशाला येथे ज्ञानियांचा राजा-मोगरा फुलला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरी, भावार्थदीपिका यांसारख्या ग्रंथांद्वारे अध्यात्म आणि तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत मांडले. समता, प्रेम, भक्ती आणि मानवतेचा संदेश देत समाजमनात प्रबोधनाची ज्योत पेटवली. त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित हा कार्यक्रम त्यांच्या विचारसंपदेचा, संतपरंपरेचा गौरव करणारा ठरणार आहे. या कार्यक्रमात प्रख्यात व्याख्याते गणेश शिंदे यांचे संत ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मदर्शनावर आणि त्यांच्या विचारांच्या सामाजिक परिणामांवर आधारित प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून ज्ञानयोग, भक्तियोग आणि समाजप्रबोधन या संत परंपरेतील महत्त्वपूर्ण मूल्यांचा उलगडा होणार आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. सदर कार्यक्रम सर्वांसाठछी विनामुल्य असून अधिकाधिक संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## पांजरापोळ चौक येथून दुचाकी गेली चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

पांजरापोळ चौक येथे दिनांक २३ फेब्रुवारी रोजी तुकाराम सौदागर पवार राहणार मुक्काम पोस्ट कोंडी, तालुका उत्तर सोलापूर यांची काळ्या रंगाची होंडा यूनिकॉर्न एक लाख रुपयांची मोटरसायकल क्रमांक एम एच१३ इबी ४००२ ही पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास खटमोडे करत आहेत.



## 'प्रिसिजन'च्या वतीने २९ मेगावॅट सोलार प्रकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

मंगळवेढा तालुक्यात सुमारे १०० एकर परिसरात उभारलेल्या प्रिसिजन कॅमशॉफ्टच्या २९ मेगावॅट सोलार प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन करण्यासाठी टीमने प्रकल्पाला भेट दिली.

सोलार प्रकल्पाची रचना, वीज निर्मितीची प्रक्रिया आणि प्रकल्पाचे एकूण कामकाज याबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत विकासाच्या दिशेने प्रिसिजनची असलेली बांधिलकी या प्रकल्पातून स्पष्टपणे दिसून येते. कंपनीचे संचालक व मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी यांनी नेतृत्व केले. स्वप्निल कुलकर्णी यांच्या टीमने हा प्रकल्प विक्रमी कालावधीत पूर्ण केला. या उपक्रमामुळे पीसीएलच्या हरित ऊर्जेच्या ध्येयाला अधिक बळ मिळणार आणि कंपनीला दीर्घकालीन खर्च बचतीचा लाभ होणार आहे.

## राष्ट्रीय लोकअदालतमध्ये जिल्ह्यातील १०,७०० प्रकरणे सामंजस्याने निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण-नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण-मुंबई यांच्या निर्देशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये जिल्ह्यातील १० हजार ७०० प्रकरणे सांमजस्याने निकाली काढण्यात आले.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ४० हजार १९४ प्रलंबित प्रकरणे आणि ५३ हजार ४०१ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण ९३ हजार ५९५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यापैकी १० हजार ७०० प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून एकूण ५३,४३,०५,२६१ रुपये मूल्य असणाऱ्या प्रकरणांचा समावेश होता.



न्यायालयीन, विविध बँका, वित्तिय संस्था, दक्षिण सोलापूर पंचायत समिती, बीएसएनएल, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शहर वाहतूक शाखा, विविध पोलिस स्टेशन आदी विभागांकडील प्रकरणांचा समावेश होता. दरम्यान, ९ मार्च ते १३ मार्च या कालावधीत घेण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ३,८३५ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

## महिलांनी अर्थव्यवस्थेत आपले स्थान अधिक भक्कम करावे

### छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात चार्टर्ड अकाउंटंट मोनिका मर्दा यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या युगात महिलांसाठी उपलब्ध असलेल्या संधी, आर्थिक सक्षमीकरण आणि तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची आहे. यासाठी महिलांनी शिक्षण, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून भविष्यातील अर्थव्यवस्थेत आपले स्थान अधिक भक्कम करावे, असे आवाहन चार्टर्ड



अकाउंटंट मोनिका मर्दा यांनी केले.

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे जागतिक महिला दिनानिमित्त ''कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात महिलांचे स्थान'' या विषयावर व्याख्यानाप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन मोटे हे होते. प्रास्ताविक डॉ. राणी मोटे यांनी केली. सूत्रसंचालन साक्षी अहिरवडे या विद्यार्थिनीने केले. श्रेया मॅकलवर हिने आभार मानले. यावेळी प्राध्यापक, डॉ. सोनकांबळे, डॉ. गायकवाड, डॉ. सुरवसे, डॉ. कीर्तीकर, प्रा. भुसे, प्रा. होटकर, प्रा. वाघमोडे, प्रा. कुचेकर, प्रा. जाधव तसेच कर्मचारी व विद्यार्थी उपस्थिते होते.

## अवैध वाळू साठ्यासह दोन टिपर, जेबीसी जप्त

### देगाव येथे अवैध वाळू वाहतूक करणारे वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मार्च-**

देगाव (ता.पंढरपूर) येथे देगाव ते बाभुळगाव जाणाऱ्या रोडवर यादव यांच्या वीट भट्टीजवळ करण्यात आलेल्या अवैध वाळूचा साठ्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत दोन टिपर, एक जेसीबी व ८ ब्रास अवैध वाळू साठा दि. १४ रोजी जप्त करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे याना गोपनिय माहिती मिळाल्याने त्यांचे कार्यालयाकडील पोलीस पथकातील पोलीस अंमलदार हे देगाव येथे गेले. देगाव ते बाभुळगाव जाणारे रोडवर यादव यांच्या वीट भट्टीजवळ मोकळ्या जागेत वाळू साठा दिसून आला. वाळू जेसीबी मशीन च्या साह्याने दोन



टिपर वाहनात भरत असल्याचे दिसून आले. तेव्हा टिप्पर आणि जेसीबी चालकास जागीच पकडण्यात आले. जेसीबी चालक प्रवीण नानासाहेब बोराटे (वय ३५) रा. मुंडेवाडी (ता. पंढरपूर) तसेच टिपरचालक विश्वास हनुमंत चव्हाण (वय ४३) रा. सुस्ते ता. पंढरपूर, तर मालक बालाजी मारुती पवार रा. देगाव असे असल्याचे सांगितले. तर टिपर मालकाचे नाव विचारले असता त्यांनी सदरचे टिपर हे सोमनाथ जाधव रा. देगाव यांचे मालकीची असल्याचे सांगितले. दोन टिप्पर प्रत्येकी ४ ब्रास वाळू भरल्याचे दिसून आले. त्यापैकी एक टिपर क्र. (डब्ल्यू बी ५३ बी १४३०) व दुसरा टिपर क्र.(एम.एच. १३ डिक्यू २८५८) व बिगर क्रमांकाचा जेसीबी ताब्यात घेण्यात आला. यावेळी ८ ब्रास वाळू साठा मिळून आला. पो.उपनिरीक्षक भोसले यांनी ग्राम महसूल अधिकारी डी. बी. कोताळकर यांना बोलावून माहिती देऊन पुढील कारवाईकामी त्यांच्या ताब्यात वाळू साठयासह दिले आहे.ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भोसले, पोहेकॉ रोकडे, खिलारे, रोंगे, पोना शिंदे, पोकॉ हुलजंती लोंढे यांनी पार पाडली आहे. आपल्या गावामध्ये अशा प्रकारचे अवैध धंदे चालु असल्यास आम्हास संपर्क करावा. यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकादेशीर कृत्य अथवा अवैध धंदे सुरू ठेवील, अशा समाजविघातक लोकांवर प्रचलित कायदयानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. तसेच अशा लोकांची यापुढे गय केली जाणार नाही, असा इशारा सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# गंगेवाडी खाणीत चौथ्या दिवशी सापडला बेपत्ता असलेल्या श्रीहर्षचा मृतदेह

## तब्बल ३ दिवसांपासून तहसीलदारांच्या टीमचा शोध
## चौथ्या दिवशी चिमुकल्याचा मृतदेह तरंगला पाण्यावर
## मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव शिवारात असलेल्या दगड खाणीत गुरुवार, दि. १२ मार्च रोजी पाण्यात पडून बुडालेल्या श्रीहर्ष उर्फ यश श्रीहरी हब्बू या दहा वर्षीय बालकाचा गेले तीन दिवस आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन दल आणि सोलापूर तालुका पोलीस शोध घेत होते, मात्र त्यांना त्याचा तपास लागला नाही आणि त्याचा मृतदेह रविवारी सकाळी पाण्यावर फुगून वर आल्यावर त्याला पाण्याबाहेर काढून नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याची माहिती तहसीलदार किरण जमदाडे यांनी दिली.



दगड खाणीच्या पाण्यात बुडालेल्या श्रीहर्षच्या शोध कार्यात तिसऱ्या दिवशी सकाळपर्यंत अपयश आले होते. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील श्रीहर्ष हा जिल्हा परिषद शाळेचा चौथीतील विद्यार्थी दि. १२ मार्च रोजी दुपारी त्याच्या काका आणि काकांच्या मित्रांसोबत कासेगांव हद्दीतील ब्रह्मनाथ मंदिर परिसरातील एका दगड-खाणीकडे गेला होता. त्यास काठावर बसवून सर्वजण पोहत थोड्या अंतरावर गेले असताना काठावर बसलेला यश पाण्यात पडून बुडाला. प्रारंभी पाण्यात शोध घेण्याचा प्रयत्न झाला, त्यात तो हाती लागला नाही. या दुर्घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळविण्यात आली. गुरुवारी दुपारपासून आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली हर्षची शोध मोहीम सुरू केली होती. यासाठी पो.उ.नि. घोडके, पो.नि. देशपांडे डब्ल्यू पी.एस. आय. डोंगरीतोट, सुपे, तलाठी हुडेवाले, सर्कल माळी, तहसीलदार किरण जगदाडे, कासेगांवचे सरपंच यशपाल वाडकर, एएसआय बाणेवाले घटनास्थळी भेट देवून माहिती घेतली होती.

श्रीहर्षच्या शोधासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ढोले, अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी रावसाहेब मगर, चालक मिलिंद सुरवसे, फायरमन सचिन लोकरे, राजू चिंता, संकेत कुंभार आणि महेश गेंड पाण्यात बुडालेल्या यश चा शोध घेत आहेत. स्थानिकचे ओंकार भोजने, सचिन गरड यांच्याकडील उपलब्ध कॅमेरे पाण्यात सोडूनही पाहिले. त्यानंतर आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ढोले यांनी त्यांच्याकडील उच्च दर्जाचा कॅमेरा जवळपास ७०-८० फुटावर अधिक खोलवर सोडून पाहिले, गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेली शोध मोहीम सकाळी सुरू झाली तर सायंकाळपर्यंत सुरू होती.

शनिवारी सकाळपर्यंत त्याला शोधण्यात सर्वांना जणू अपयश आले होते. ३ दिवसांपासून बोटीच्या मदतीने अग्निशमन दलाचे जवान त्याचा शोध घेत होते. रविवारी सकाळी मात्र श्रीहर्षचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसून आला. यानंतर एएसआय बाणेवाले व पोलीस कॉन्स्टेबल अकबर शेख यांनी पंचनामा केला. तहसीलदार जमदाडे यांनी सर्व यंत्रणा हलवून तो मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला. दुपारी शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, या घटनेमुळे कासेगाव-गंगेवाडी, उळे, तामलवाडी या परिसरात हळहळ व्यक्त होत होती.

---

# शिक्षक भरती प्रक्रियेसाठी 'पवित्र' पोर्टल आवश्यक

**पोर्टल शिवाय भरती झालेल्या शिक्षकांवर टांगती तलवार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

राज्यात शिक्षक भरती प्रक्रियेसाठी सुरू करण्यात आलेल्या 'पवित्र' पोर्टलला वगळून करण्यात आलेल्या नियुक्त्यांना शासन मान्यता देणार नाही, असे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पोर्टलशिवाय झालेल्या भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, विधानसभेत आमदार सुनील प्रभू यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. काही खासगी शिक्षण संस्थांनी शासनाच्या 'पवित्र' पोर्टलचा वापर न करता थेट शिक्षक भरती केल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. अशा नियुक्त्यांना शासन मान्यता देणार का, असा मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला. यावर सरकारने दिलेल्या लेखी उत्तरात स्पष्ट केले की, २२ जून २०१७ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी शाळांमधील शिक्षक भरती 'पवित्र' या संगणकीय प्रणालीद्वारेच करणे बंधनकारक आहे. त्यामुळे या आदेशानंतर पोर्टलला वगळून करण्यात आलेल्या नियुक्त्या शासनाच्या धोरणाशी विसंगत ठरतात. तसेच 'पवित्र' पोर्टल लागू झाल्यानंतर पोर्टलशिवाय झालेल्या शिक्षक नियुक्त्यांची तपासणी करण्यासाठी शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समित्या स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या समित्यांमार्फत अशा नियुक्त्यांची छाननी करण्यात येणार आहे.

यामुळे शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी 'पवित्र' पोर्टलचा वापर अनिवार्य असल्याचे शासनाने पुन्हा स्पष्ट केले आहे.

---

# 'हर घर जल'ला ब्रेक; राज्यातील हजारो जलजीवन प्रकल्प निधीअभावी बंद

## २१ हजार कामे ठप्प | गावकऱ्यांची पाण्यासाठी पायपीट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'जलजीवन मिशन' योजनेअंतर्गत राज्यात मंजूर झालेल्या हजारो कामांना निधीअभावी ब्रेक लागला आहे. राज्यात मंजूर असलेल्या ५१ हजारांहून अधिक कामांपैकी सुमारे २१ हजार कामे सध्या ठप्प असल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी अनेक गावांतील नागरिकांना उन्हाळ्याच्या तोंडावर पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.




गावे, वाड्या आणि वस्त्यांवरील नागरिकांना नळाद्वारे घरपोच स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने 'हर घर जल' संकल्पनेतून जलजीवन मिशन योजना सुरू करण्यात आली होती. सुरुवातीच्या टप्प्यात अनेक गावांमध्ये या योजनेची कामे चांगल्या वेगाने पूर्ण झाली. मात्र त्यानंतर निधी वेळेवर न मिळाल्यामुळे अनेक ठिकाणी कामे थांबवावी लागली आहेत. निधीअभावी ठेकेदारांनी कामे बंद ठेवल्याने राज्यातील हजारो गावांमध्ये पाणीपुरवठ्याच्या योजनांचे काम अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील महिला व ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर जावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलजीवन मिशनसाठी थकीत निधी लवकर देण्याची घोषणा केली असून, त्यामुळे रखडलेली कामे पुन्हा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऐन उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलजीवन मिशनची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी ग्रामीण भागातील ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

### जिल्ह्यातील स्थिती

राज्यातील सुमारे २१ हजार कामे ठप्प असताना सोलापूर जिल्ह्यातही सुमारे ५०० कामे बंद अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित ठेकेदारांना सूचना देण्यात आल्या आहेत.

### काम सुरु न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

''जलजीवन मिशनची राज्यात सुमारे २१ हजार तर सोलापूर जिल्ह्यात सुमारे ५०० कामे ठप्प आहेत. जिल्ह्यातील कामे तातडीने सुरू करण्याचे आदेश ठेकेदारांना दिले आहेत. काम सुरू न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.''

**- संजय धनशेट्टी,**
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जि.प. सोलापूर

---

# जि.प.अध्यक्षपदावर कोणाची मोहर?

## सोलापुरात राजकीय हालचालींना वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुका संपल्यानंतर आता जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीकडे लागले आहे. या निवडीसाठी भाजपमध्ये मोठी उत्सुकता असून विविध नावांची चर्चा रंगली आहे.



आता जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे यांच्या पत्नी वंदना कांबळे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवाजी कांबळे यांनी जिल्हा परिषदेत सलग पाच वर्ष समाजकल्याण सभापती म्हणून काम पाहिल्यामुळे त्यांचा अनुभव व मार्गदर्शन वंदना कांबळे यांच्या कामी येईल, असे मत राजकीय निरीक्षक व्यक्त करत आहेत.जर वंदना कांबळे यांची अध्यक्षपदी निवड झाली, तर माढा तालुक्याला तिसऱ्यांदा जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा मान मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये अलीकडे मोठे बदल झाले आहेत. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते भाजपमध्ये दाखल झाल्याने भविष्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही राजकीय घडामोडींना वेग आला आहे. यंदाचे जिल्हा परिषद अध्यक्षपद नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी राखीव आहे. जिल्हा परिषदेत भाजपला मिळालेल्या ६८ पैकी ३८ सदस्यांच्या बळावर अध्यक्षपदावर भाजपचीच मोहर बसणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. सुरुवातीला अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. मात्र भविष्यातील मंत्रिपदाच्या दाव्यावर परिणाम होऊ शकतो या कारणामुळे त्यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिल्याची माहिती समोर येत आहे.

दुसरीकडे, दादांच्या गटातून निवडून आलेले रामप्पा चिवडशेट्टी यांनीही अध्यक्षपदाची इच्छा व्यक्त केली होती. मात्र सध्याच्या राजकीय समीकरणांमुळे त्यांनाही शांत राहावे लागल्याची चर्चा आहे. बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नावाचीही चर्चा झाली होती. मात्र भविष्यात पुन्हा विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीमुळे त्यांनीही अध्यक्षपदासाठी स्पष्ट नकार दिल्याचे सांगितले जाते.

भाजपचे माढा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनाही संधी असल्याची चर्चा होती. परंतु नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान दोन ठिकाणी झालेले मतदान हे त्यांच्या आड येऊ शकते, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. दरम्यान, अध्यक्षपदाच्या अंतिम निर्णयात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

---



सोलापूर : महानगरपालिकेने सामान्य नागरिकांच्या अर्थसंकल्पाबाबत सूचना जाणून घेण्यासाठी शहरात ठीकठिकाणी बारकोडचे डिजिटल बॅनर लावले आहेत. असे बॅनर लावण्याची पहिलीच वेळ आहे. (छाया : केवल तिवारी)

---

## ▶▶ महत्वाचे...

### जन्म दिलेल्या बाळाला सोडून आई-वडील पसार

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

कोणाला कसलीही माहिती न देता दि. २१ फेब्रुवारीपासून ते आजतागायत जन्मलेल्या बाळाची आई दुर्गा नागेश राऊळे, व तिचा पती नागेश राऊळे (रा. हुमनाबाद जिल्हा बिदर) यांनी बाळासोबत न थांबता निघून गेले. सोलापूर शासकीय रुग्णालयात ही घटना घडली आहे. स्वाती भोसले सहाय्यक प्राध्यापक स्त्री व प्रसुती शास्त्र विभाग यांना अथवा रुग्णालयातील कोणालाही कल्पना त्यांनी दिली नाही. याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मनोहर करत आहेत.

### दूचाकीचा धक्का लागल्याने केली मारहाण

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

दुचाकीवरून जाकीर हुसेन इब्राहिम चाऊस (रा. ६०, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर) हे घराकडे जात असताना इराणी हॉटेल समोर रेहान बिलाल कुरेशी याच्या मोटरसायकलचा धक्का लागला. तेव्हा त्याने जाकीर यांना तुला गाडी नीट चालवता येत नाही का असे म्हणून शिवीगाळ करू लागला. जाकीर यांनी त्याला शिवीगाळ करू नको असे म्हणत असताना रेहान कुरेशी याने हाताने, बुक्क्यांनी मारहाण केली. हातातील अंगठीचा मार लागून ओठास आतून बाजूस जखम होऊन रक्त येऊ लागले. इतर आरोपीत मध्ये रेहान असलम कुरेशी, मुस्तकीम हैदर कुरेशी, हासनैन जाकीर कुरेशी (रा. सोलापूर) यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून तुला ठार मारतो, अशी धमकी दिली असल्याच्या गुन्हा जेलरोड पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पुढील तपास सय्यद करत आहेत.

### चांगला परतावा देतो म्हणत केली फसवणूक

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

शेअर मार्केटमध्ये सन २०२४ ते दि. ३० डिसेंबर २०२५ यादरम्यान सोमनाथ रमेश स्वामी (रा. ३३ चांदलक्ष्मी नगर, शेळगी, सोलापूर) याने दीपक प्रल्हाद मेघाचे (रा. ४१ / ४४४ न्यू बुधवार पेठ, सिद्धार्थ चौक, सोलापूर) व इतर इसमाकडून त्याच्या मार्फतीने गुंतवणूक करून चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून दीपक मेघाचे याचेकडून १७ लाख रुपये हातउसने घेतले.




त्याबाबत ६ लाख ९४ हजार रक्कम परतावा म्हणून दिली असून दीपक मेघाचे यांचे गुंतवणूक केलेली मुद्दल परत न करता विश्वासघात करून फसवणूक केली असल्याबाबतचा गुन्हा जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पुढील तपास मिसाळ करत आहेत.

### चारचाकीच्या धडकेत मोडला पाय

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

सैफुल ते नेहरूनगरकडे दि. ५ मार्च रोजी अभिषेक बाबू चव्हाण (रा. उद्धव नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) व मित्र कोणदे, जावेद शेख असे मिळून कोणदे यांची दुचाकी क्रमांक एम एस १३ एफ ए २८०५ वरून जात असताना अत्तार नगर, चौक या ठिकाणी आले असता चार चाकी गाडी क्रमांक एम एच १३ बी एन ४७५८चा चालक पुजारी (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) या वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवून अभिषेक चव्हाण यांना धडक दिली त्यात त्यांच्या डाव्या पायाला जखम होऊन, पाय मोडला. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास जाधव करत आहेत.



### तरुणावर हल्ला, तिघांविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१५ मार्च-**

आईस्क्रीमचे पैसे देत असताना गैरसमज करुन तिघा तरुणांनी रिक्षाचालकावर बेल्ट व कठीण वस्तूने हल्ला केल्याची घटना बार्शी शहरातील संतोषीमाता चौक परिसरात घडली आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागेश मधुकर जाधव (वय ३०, रा. लहुजी चौक, ताडसौदाणे रोड, बार्शी) हे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. १२ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास ते जेवणानंतर शतपावले करत संतोषीमाता चौक, सुभाषनगर येथे गेले होते. त्यावेळी हा प्रकार घडला. याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

---


# सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर

संचालक मंडळ निवडणूक
सन २०२५-२६ ते २०३०-३१

## परिवार पॅनल

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रापासून २५ कि.मी. च्या आत असणाऱ्या व राहणाऱ्या मतदार संघातील उमेदवार

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | फोटो | चिन्ह |
|---|---|---|---|
| १ | उडता पुरुषोत्तम ज्ञानेश्वर (टॉवेल कारखानदार) | | |
| २ | करवंदे आनंद भगवान (सी.ए.) | | |
| ३ | चिक्कळी सुरेश शिवप्पा (व्यापारी) | | |
| ६ | न्हावकर महादेव विठ्ठल (सामाजिक कार्यकर्ते) | | |
| ७ | पवार राजेश रमेश (उद्योजक) | | |
| ८ | पेंडसे सुनिल गंगाधर (उद्योजक) | | |
| ९ | बोरगांवकर गिरीश गोपाळ (सी.ए.) | | |
| १० | भुतडा प्रमोद द्वारकादास (उद्योजक) | | |
| ११ | मोंढे विष्णू संतोष (उद्योजक) | | |
| १२ | शहाबादे मल्लिनाथ गुरुबसप्पा (वकील) | | |

परिवार पॅनल 'किटली' या चिन्हावर फुलीचा शिक्का मारुन प्रचंड बहुमताने विजयी करावे. ही नम्र विनंती.

मतदान : मंगळवार दि. १७ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते दु. ४ वाजेपर्यंत

सोलापूर शहरातील मतदान केंद्रे - नू.म.वि. शाळा व एस.पी.एम. शाळा, डफरिन चौक, सोलपूर.
तालुक्यातील मतदान केंद्रे जाणून घेण्यासाठी बँकेच्या नजीकच्या शाखेत संपर्क साधावा.

निवडणूक प्रमुख - ॲड. श्री. मिलिंद कुलकर्णी
संपर्क कार्यालय पत्ता : बंग निवासस्थान, बसवंती मंगल कार्यालयासमोर, सम्राट चौक, सोलापूर. - ४१३००२.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३८४

**ऐसे संजयो असे सांगतु । म्हणे राया तो पार्थु ।**
**पुनरपि शोकाकुलितु । काय बोले ।।**

अर्जुनाची युध्द करण्याची मानसिकता राहिलेली नाही. कोणत्याही परिस्थितीत तो युध्द करु ईच्छित नाही. रणभूमीवरील अर्जुनाची अवस्था अर्जुनाला युध्द करु देणार नाही. अर्जुनाला या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी श्रीकृष्ण प्रयत्न करीत आहेत. मात्र श्रीकृष्णाच्या प्रयत्नाला अर्जुन सहकार्य करीत नाही. अर्जुन स्वत:च्या निर्णयावर ठाम झाला आहे. अर्जुन मोहग्रस्त झाला असतांनाही व युध्द करावयाचे नाही असे ठरविले असतांनाही आपण कितपत बरोबर व कितपत चूक आहोत याचा निर्णय आपण स्वत: घेवू शकत नसल्याने श्रीकृष्णांनी आपणाला मार्गदर्शन करुन योग्य काय ते सांगावे अशी अपेक्षाही तो करीत आहे. द्विधा अवस्थेत सापडलेल्या अर्जुनाचा विश्वास श्रीकृष्णांवर आहे. शारीरिक, आर्थिक संकटापेक्षा मानसिक संकट जास्त अवघड असते. अशा संकटातून सच्चा मित्रच किंवा संत महात्माच माणसाला बाहेर काढू शकतो. अर्जुनाचा सच्चा मित्र, सखा, सदगुरु सर्व काही श्रीकृष्ण परमात्माच आहेत आणि विशेष म्हणजे अर्जुनाचा स्वत:वर नाही एवढा विश्वास श्रीकृष्णावर आहे. एवढा विश्वास आपण आपल्या सदगुरुवर ठेवला तर आपल्या जीवनातील द्विधा अवस्था सहज लयास जाऊ शकेल.



मोहाच्या जाळयातून बाहेर काढण्याचा प्रयत्न श्रीकृष्णांनी करावा अशी ईच्छा अर्जुन व्यक्त करीत आहे. हे कृष्णा माझ्या मनात जी व्यथा निर्माण झाली आहे ती तुझ्या वचनामृताशिवाय अन्य कोणत्याही साधनाने दूर होणार नाही, त्यामुळे तूच मार्ग दाखव अशी विनवणी अर्जुन करु लागला. अर्जुन दु:खाने, मोहाने जर्जर कसा झाला आहे, त्याची मानसिक स्थिती किती व कशी केविलवाणी झाली आहे, याचे सविस्तर वर्णन संजयाने केले. अर्जुनाला या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी श्रीकृष्ण परमात्मा कसा मार्ग काढतील याकडे संजयाचे लक्ष आहे. म्हणून संजय न कळत बोलून गेला की श्रीकृष्ण परमात्मा निश्चितच मार्ग काढतील. राजा धृतराष्ट्राला संजयाचे हे मत आवडले नाही, हे संजयाच्या लक्षात आले. धृतराष्ट्र हा अर्जुनापेक्षाही जास्त मोहग्रस्त आहे. पुत्रप्रेमापोटी झालेला धृतराष्ट्राचा हा मोह कोण दूर करणार? अर्जुनाला श्रीकृष्ण तरी मिळाले आहेत, पण या धृतराष्ट्राला कोणीही नाही याचे थोडेसे दु:खही संजयाला वाटले. राजाला फक्त त्यांच्या बाजूने जे घडेल तेच आवडते. हे संजयाच्या लक्षात आले म्हणून संजयाने आपली भावना, मत व्यक्त न करता अर्जुन काय करीत आहे हे सांगीतले. स्वार्थापोटी अनेकजण संसारात असे मोहग्रस्त होतात की त्यांना त्या मोहात भर घालणारीच बाब आवडत जाते. तो मोहही माणसाला मोहातून बाहेर निघू देत नाही व माणूसही त्या मोहातून बोहर पडू ईच्छित नाही. राजा धृतराष्ट्र तरी जन्मांध आहे, पण बरेच लोक डोळस असूनही मोहापोटी, स्वार्थापोटी आंधळे होत असतात. हा मोहरुपी आंधळेपणा काढून टाकून ज्ञान दृष्टी प्राप्त होण्यासाठी ही ज्ञानेश्वरी, गाथा, गीता पुरेशी आहे असे आम्हास वाटते. अनुभूती अंती आपणही आमच्या मताशी सहमत व्हाल, असेही आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. १६ मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन कृ. १२**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (३०.२१)**
**योग - शिव (०९.३६)**
**करण - गरज (३२.३६)**
**राहू काल : सोमवार**
**रविवार : स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष :**
**राष्ट्रीय लसीकरण दिवस**
**१९७६ : ब्रिटिश पंतप्रधान 'हॅरोल्ड विल्सन' यांनी राजीनामा दिला.**
**२००० : भारतीय हॉकीपटू 'धनराज पिल्ले' आणि मध्यम अंतराची धावपटू ज्योतिमय सिकदर यांना के. के. बिर्ला पुरस्कार.**
**२००१: 'नेल्सन मंडेला' यांना गांधी शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



## पानगलच्या उपमुख्याध्यापिका डॉ.सुरैय्यापरवीन जाहागिरदार यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या उपमुख्याध्यापिका आणि मराठी विषयाच्या शिक्षिका डॉ. सुरैय्यापरवीन सय्यद जिलानीपाशा जाहागिरदार या चौतीस वर्षे अध्यापन आणि सतरा वर्षे उत्कृष्ट प्रशासकीय सेवेनंतर निवृत्त झाल्या.

त्यांचा सेवानिवृत्तप्रीत्यर्थ पानगल प्रशालेच्या क्रीडांगणावर हायस्कूल व कनिष्ठ म हाविद्यालयाच्या प्रत्येक वर्गाच्या वर्गशिक्षिका विद्यार्थ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान होते. कार्यक्रमाचजी सुरुवात इलियास सौदागर यांच्या पवित्र कुराण पठणाने झाली. यावेळी निकहत नल्लामंदु, इद्रीस पेरमपल्ली, इरफान डोका, तहसीन शेख, सबिहा पटेल, झारा जाफरी, सैफ जहागीरदार आणि सभेचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी अत्ताउल्लाह पटेल, कलीमुल्लाह पटेल, अ‍ॅड. सरफराज पिरजादे, झाकीर जाहागीरदार, अल्ताफ सिद्दीकी, अशफाक म नियार, आरिफ पठाण, बदरुन्निसा दफेदार, मुहम्मद अली शेख, वसीम नल्लामंदु, महेमूद खतीब, रियाज सय्यद, फौजिया शेख, फरजाना नदाफ, झाकीर हुसेन शाहपुरे, शिरीन खान, अब्दुल रशीद शेख, समीर कमिशनर उपस्थित होते. सूत्रसंचालन अकबर पठाण यांनी तर आभार अब्दुल रऊफ पटेल यांनी मानले.

# राष्ट्रीय जलसाक्षरता दिंडीचा श्री सिद्धेश्वर मंदिरातून शुभारंभ

## अक्कलकोट मार्गे श्रीशैलकडे दिंडीचे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

जागतिक जल, वन व हवामान दिनाच्या निमित्ताने ड्रीम फाउंडेशनतर्फे आयोजित राष्ट्रीय जलसाक्षरता दिंडीचा शुभारंभ आज सकाळी श्री सिद्धेश्वर मंदिरातून उत्साहात करण्यात आला. मंदिर समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी व जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाला कार्यकारी अभियंता बसलिंगप्पा हिपरगी, शोभाश्री मल्टिस्टेटचे व्यवस्थापक किरण पुजारी, शाहीर रमेश खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच दिंडी व्यवस्थापक गुरुशांत भतगुणकी, गजराबाई गुरुशांत भतगुणकी, कस्तुरी पाटील, संगीता काशीनाथ भतगुणकी, शुभम पाटील, महानंदा केंगनाळकर, राणी पाटील, महादेव ठोंबरे, भारती बिराजदार, बसम्मा पाटील, अजय नरवडे यांच्यासह ड्रीम फाउंडेशन परिवारातील युवक, श्री बसवेश्वर तरुण मंडळ (पाटील वस्ती, गौडगाव बुद्रुक), बसव संगम शेतकरी गट (संगम वस्ती) येथील शेतकरी आणि जलप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात जलसाक्षरता दिंडीच्या रथाचे पूजन करण्यात आले. ''पाणी सांभाळा जीवन सांभाळा'', ''पाणी हेच जीवन'', ''जल है तो कल है'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी केले. यावेळी शाहीर रमेश खाडे यांनी जलसंवर्धनाविषयी प्रेरणादायी गीते सादर करून उपस्थितांमध्ये जलजागृती निर्माण केली. उद्घाटक धर्मराज काडादी यांनी १२व्या शतकात श्री सिद्धेश्वर महाराजांनी केलेल्या जलव्यवस्थापन आणि तलाव निर्मितीच्या परंपरेची माहिती देत जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि ड्रीम फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले.

जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांनी या उपक्रमाला शासनाचे मार्गदर्शन व सहकार्य राहील, असे सांगून दिंडीस शुभेच्छा दिल्या. सकाळी १० वाजता जलसाक्षरता दिंडी अक्कलकोट मार्गे श्रीशैलकडे प्रस्थान केली. मार्गातील गावांमध्ये पाणी संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात येणार असून श्रीशैल येथे राष्ट्रीय जल कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

# शिष्यवृत्ती अपहार प्रकरणी आरोपीना पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय यांनी बांधकाम कामगार शिष्यवृत्ती घोटाळा प्रकारणी दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी आर. एस. मुसळे व बाळासाहेब शिंदे यांना दि. १८ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायाधीश यांनी पारित केला.

यात आरोप अ२सा की, बांधकाम कामगारांच्या मुलासाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनेमध्ये बनावट बोनाफाईड, शैक्षणिक कागदपत्रे सादर करून शासनाची रक्कम रुपये ३ कोटी ६३ लाख २० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने दि. ४/०३/२०२६ गुन्हा रजिस्टर नंबर २५०/२०२६ अन्वये फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दुकाने निरीक्षक (सुविधाकार), कंत्राटी कर्मचारी, दलाल आणि शिष्यवृत्ती लाभार्थी अशा एकूण २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे.

या गुन्ह्यामध्ये सोलापूर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वर नमूद आरोपीना दि १४/०३/२०२६ रोजी अटक करुन आजरोजी दि १५/०३/२०२६ में न्यायालया समोर हजर करुन तपास अधिकाऱ्यांनी तपासकामी ५ दिवसाच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. प्रकरणातील आरोपीचे वकिल अ‍ॅड. शशी कुलकर्णी यांचा युक्तिवाद तसेच सरकारी वकिलांचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीस ३ दिवस दि. १८/०३/२०२६ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

यात आरोपीतर्फे अ‍ॅड. शशी कुलकर्णी, अ‍ॅड.गुरुदत्त बोरगांवकर, अ‍ॅड. प्रसाद अग्निहोत्री हे काम पाहत आहेत.

## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये 'अ‍ॅडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग'वर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

येथील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या वतीने टेक मंत्राच्या सहकार्याने अंतिम वर्ष डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी अ‍ॅडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग (३डी प्रिंटिंग) या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली.

सध्याच्या बदलत्या औद्योगिक युगात ३डी प्रिंटिंगचे महत्त्व वाढत असून विद्यार्थ्यांना ३६० सॉफ्टवेअरच्या माध्यमातून प्रत्यक्ष मॉडेलिंग आणि सिम्युलेशनचा अनुभव मिळावा, तसेच उद्योगात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक डिजिटल उपकरणांची माहिती व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे



आयोजन करण्यात आले होते. या उद्घाटन कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार आणि यांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. बी. गदवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. पोतदार यांनी नमूद केले की, उद्योगक्षेत्रातील जलद बदलांनुसार अध्यापन पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करणे ही काळाची गरज असून, अशी प्रशिक्षणे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनवतील.

या कार्यशाळेत तज्ज्ञ प्रशिक्षक प्रा. ए. एम. मळेकर व प्रा. एस. ए. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने ३६० मधील डिझाइन व सिम्युलेशन, ३डी प्रिंटिंगची प्रत्यक्ष प्रक्रिया आणि आधुनिक उत्पादनासाठीचे प्रभावी एकत्रीकरण या तांत्रिक बाबींचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. ए. आर. मळेकर, प्रा. एस. ए. देशपांडे व यांत्रिकी विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील व सचिव एस. एस. पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात ४५७ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

बालाजी अमाईन्स लि., रोटरी क्लब ऑफ सोलापूर, आणि शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने, सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, चिंचोळी येथे भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४५७ लाभार्थींनी तपासणी करून घेतली. त्यामध्ये १३६ जणांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असून १९० जणांना चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराचा उद्देश नागरिकांना नेत्र आरोग्याबाबत जागरूक करणे तसेच गरजू रुग्णांना मोफत नेत्र तपासणी व आवश्यकतेनुसार चष्मा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देणे असा होता.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि रोटरी क्लबच्या कार्याची माहिती दिली. प्रकल्प प्रमुख मितेश पंचमिया यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बालाजी अमाईन्स लि. चे पूर्णवेळ संचालक राजेश्वर रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा



समारोप बालाजी अमाईन्स लि.चे प्रतिनिधी दत्तप्रसाद सांजेकर यांच्या आभार मानले. सूत्रसंचलन सचिन सुतार यांनी केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे सदस्य व बालाजी अमाईन्स लि चे अधिकारी निलेश फोफलिया, आशिष मेहता, पारूल पटेल, सुनील माहेश्वरी, शिवाजी उपरे, संजय मडूर, सचिन मोरे ,अमोल गुंड, बसवराज अंटद, गजानन काळे,गणेश नवगिरे,आदित्य जैन, अमोग पांडे,संतोष कणेकर, डॉ. राजीव मोहोळकर, मकरंद बसवंती, विशाल वर्मा, बी. एस. मुंदडा यांनी सहकार्य केले.



## थोरला मंगळवेढा व पंजाब तालीमच्यावतीने रोजा इफ्तार

### पोलिस उपायुक्त विजय कबाडे व गौहर हसन यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

थोरला मंगळवेढा तालीम, पंजाब तालीम, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सोमपा गटनेता अमोल शिंदे व माजी सभापती मनपा शिक्षण मंडळ संकेत पिसे यांच्यावतीने पवित्र रमजान म हिना निमित्त रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सन २००७ साला पासून तत्कालीन पोलीस आयुक्त स्व. अशोक कामठे यांच्या उपस्थितीत थोरला मंगळवेढा तालीम हे महाराष्ट्रातले पहिले गणेशोत्सव मंडळ ठरतेय, त्याम ध्ये रोजा इफ्तार पार्टीचे कार्यक्रम घेण्यात आले होते, व सन २०२६ रोजी ही रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन हे निरंतर आहे. सोलापूर शहर पोलीस उपआयुक्त गौहर हसन व उपायुक्त विजय कबाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी नगरसेवक तोफिक हत्तुरे, नगरसेवक चेतन नरोटे, मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, राजू कुरेशी, राजू हुंडेकरी, नगरसेवक अझर हुंडेकरी, माजी नगरसेवक रियाज खरादी, करीम लोखंडवाला, युवा नेते ज्ञानेश्वर सपाटे, युवा नेते सागर पिसे, सोहेल कुरेशी, समीर शेख, प्रसाद कुमठेकर वाहिद विजापुरे, समीर लोंढे, जावेद वाडर, इब्राहिम शेख, इम्तियाज कमिशनर, गफूर शेख, अल्फरान आबादीराजे आदी उपस्थित होते.

## पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर : मुल्ला

### एडीआयआरए उपक्रमांतर्गत ऑनलाइन कार्यशाळेस प्रतिसाद

**सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे पत्रकारितेसाठी अत्यंत उपयुक्त साधन ठरत आहे. बातमी संकलन, माहितीचे विश्लेषण, व्हिडिओ-फोटो संपादन, डेटा अभ्यास आणि माहिती पडताळणी यांसारख्या विविध कामांमध्ये एआयचा प्रभावी वापर करून पत्रकारिता अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक करता येते, असे मत ज्येष्ठ पत्रकार तथा एआयविषयक तज्ज्ञ मोहसीन मुल्ला यांनी व्यक्त केले.

डाटा लीड्स , गुगल , एशियन डेव्हलपमेंट बँक आणि एव्हीपीएन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या एडीआयआरए या उपक्रमांतर्गत सोलापुरातील पत्रकारांसाठी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित केलेली विशेष ऑनलाइन कार्यशाळा शनिवारी गुगल मीट द्वारे पार पडली. या कार्यशाळेत संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील माध्यमकम र्मींसाठी एआयच्या संधी आणि उपयोगांविषयी तज्ज्ञ मोहसीन मुल्ला यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेदरम्यान मोहसीन मुल्ला यांनी पत्रकारितेत वापरता येणाऱ्या विविध एआय टूल्सची माहिती देत न्यूज रिसर्च, डेटा ॲनालिसिस, कंटेंट क्रिएशन, ग्राफिक्स डिजाईन, फोटो-व्हिडिओ एडिटिंग, हेडलाईन जनरेशन आणि फॅक्ट-चेकिंग यांसारख्या कामांमध्ये एआय कसा उपयोगी ठरू शकतो याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. बदलत्या डिजिटल युगात पत्रकारांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून आपल्या कामाची गुणवत्ता वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच एआयचा वापर करताना विश्वसनीयता, नैतिकता आणि माहितीची पडताळणी या बाबींचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या विविध शंका आणि प्रश्नांना मोहसीन मुल्ला यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे दिली.

या कार्यशाळेला श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक संघाचे उपाध्यक्ष आफताब शेख यांनी केले तर सरचिटणीस सागर सुरवसे यांनी आभार मानले.

## राज्यात 'घरगुती सिलेंडर' वापरकर्तेही त्रस्त!

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे महाराष्ट्रात एलपीजी गॅसचा भीषण तुटवडा निर्माण झाला असून, घरगुती आणि व्यावसायिक सिलेंडर पुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने लोकांचे हाल होत आहेत, अनेक ठिकाणी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ महिलांवर आली आहे. सरकारकडून साठेबाजी रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तरीही त्यांचा डोळा चुकवून राज्याच्या काही भागात गॅसचा काळाबाजार सुरूच आहे. या युद्धजन्य परिस्थितीचा मोठा फटका महाराष्ट्रातील जनजीवनाला बसला असून, गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याने घरगुती गॅस वापरकर्ते चांगलेच त्रस्त असल्याचे सध्यातरी दिसून येत आहे.

इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे, ज्यामुळे थेट परिणाम आयातीवर होत आहे. यामुळे ग्रामीण आणि काही शहरी भागात लोक जुनं ते सोनं म्हणत चुलीचा वापर करू लागले आहेत. ग्रामीण भागातील बांधावर तोडून पडलेली झाडे, बांधांवरील काटाड्या आता लोक उपसू लागले असून, त्या इंधनावरच महिलावर्ग रोजी रोटी भाजू लागल्याचे वास्तव आहे. गॅस मिळविण्यासाठी २-२ दिवस वाया घालविण्यापेक्षा रस्त्यांवर पडलेली झाडे, मोडके फाटेही सामान्य लोक आता गोळा करताना दिसू लागले आहेत. अनेक हॉटेल्सधारकही आता वाळलेल्या (वठलेल्या) झाडांचे जळण (सरपण) विकत घेवून आपला व्यवसाय हळूहळू चालवित आहेत. मोठ्या हॉटेल्सधारकांनीही तर व्यावसायिक गॅस बंद केल्याने आपले हॉटेल्स बंद केले आहेत. सध्या शहरी भागातील मोठ-मोठे हॉटेल्स बंद होत असल्याने बेकारीत अजून वाढच होत आहे.

राज्यातील हॉटेल्स, ढाबे आणि रुग्णालयांम धील व्यावसायिक गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला आहे, परिणामी जेवण बनवणे कठीण झाले आहे. इतकेच नाहीतर घरगुती सिलेंडर धारकांनाही बुकींग करून ठरलेल्या दिवशीही गॅस एजन्सीधारकांकडून गॅस मिळत नसल्याची खंत अनेक ग्राहक व्यक्त करीत आहेत. अधिकृत कनेक्शन असलेल्या ग्राहकांना सिलिंडर मिळण्यासाठी अनेक दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे नागरिकांतूनही संताप व्यक्त होत आहे. टंचाईचा गैरफायदा घेवून काही ठिकाणी गॅसचा काळाबाजार सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. राज्याच्या काही भागात उदा. भिवंडीसारख्या शहरात आठशे हजाराचे सिलेंडर दीड-दोन हजाराला विकत असल्याची वृत्ते येत आहेत. टंचाईचा फायदा घेऊन काही ठिकाणी होत असलेला हा काळाबाजार रोखून गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि पुरवठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जिल्हानिहाय विशेष नियंत्रण कक्ष स्थापन केले आहेत. इतकेच नाहीतर अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी गॅस पुरवठा वाढवण्याचे आणि तक्रारी स्वीकारण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे काही भागात गॅस टंचाईपेक्षा अफवांही जास्तच वाढू लागल्याचेही दिसून येत आहे. कल्याण-डोंबिवलीसह राज्याच्या अनेक ठिकाणी प्रशासनाने गॅस सिलेंडरचा पुरवठा पुरेसा असल्याचा दावा करून अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. सध्या परिस्थिती गंभीर असून, युद्धजन्य परिस्थिती निवळल्याशिवाय गॅस पुरवठा पूर्णपणे पूर्ववत होण्याची शक्यता कमी असल्याने नागरिकांनीही गॅसचा वापरही मर्यादितच




करण्याची गरज आहे. विजेप्रमाणे गॅसचीही सर्वांनी काटकसर करण्याची सवय लावली तर आपण याही संकटावर लवकरच मात करणार आहोत.

या युद्धाचे परिणाम केवळ एका देशापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण जगावर विविध प्रकारे होतात. युद्धाचा मुख्य परिणाम मानवी हानी आणि जीवितहानीवर होत आहे. या युद्धामुळे हजारो निष्पाप नागरिकांचा मृत्यू होतो आणि अनेक लोक गंभीर जखमी होतात. यामुळे जागतिक अर्थव्यवस्था अडचणीत येत आहे. या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. अन्नधान्य, इंधन आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमती वाढून महागाई वाढते. व्यापार आणि पुरवठा साखळी विस्कळीत होत आहे. दोन देशांमधील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होत आहे.

वस्तूंची आयात-निर्यात विस्कळीत होते, ज्यामुळे अनेक देशांमध्ये टंचाई निर्माण होऊ शकते. शिक्षणव्यवस्था, पर्यावरण हानीही या युध्दामुळे होत असून, विविध शहरातील मोठे उद्योजकांनाही कच्चा माल मिळत नसल्याने तेही जाम अडचणीत सापडले आहेत. एकंदरीत सांगायचे म्हणजे या आधुनिक युद्धात वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रांमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते आणि निसर्गाचे संतुलन बिघडते आणि यांसारख्या युद्धांमुळे जगातील अनेक देशांवर थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम होताना दिसत आहेत.

## महत्वाचे...



### माढा एसटी बसस्थानक परिसरात मोफत पाणपोई सुरु

**माढा, दि. १५ मार्च-**

यावर्षी मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच सर्वत्र उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत असून वातावरणात कमालीची उष्णता वाढली आहे. मार्चमध्येच उन्हाने ४० शी पार केली आहे. सध्या सर्वत्र दहावीसह इतर परीक्षा सुरू असल्याने कॉलेज व शालेय विद्यार्थ्यांची मोठी संख्या माढा बस स्थानक परिसरात असते उन्हामुळे विद्यार्थ्यांना तहान लागते बस स्थानकात प्रवाशांसाठी थंड पिण्याचे पाण्याची सोय नसल्याने उन्हापासून प्रवासी व नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला व त्यांना थंड पाणी प्यायला मिळावे या उद्देशाने बस स्थानक परिसरातील माढेश्वरी मोबाईल शॉपीचे मालक तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यार्थी संघटनेचे तालुका सचिव अक्षय शिंदे यांनी मोफत थंड पिण्याचे पाण्याची सोय केली आहे. या पाणपोईमुळे शेकडो नागरिक, कॉलेज व शालेय विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय होत आहे. शिंदे यांच्याकडून दरवर्षी उन्हाळ्यात याठिकाणी थंड पाण्याची सोय केली जाते.



### इस्लामपूर येथे महाराजस्व समाधान शिबीर

**माळशिरस, दि. १५ मार्च-**

नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविणे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत इस्लामपूर मंडळ स्तरावरील टप्पा क्र. १ चे शिबिर श्री संभाजीबाबा विद्यालय इस्लामपूर येथे संपन्न झाले. यावेळी जि.प.सदस्य गौतम माने, पंचायत समिती सदस्य आनंद शेंडगे,बाबासाहेब माने, महसूल नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर,पुरवठा विभागाचे नायब तहसिलदार रविकिरण शेट्टे, मंडळ अधिकारी सुभाष रणदिवे, संजय गांधी निराधार योजनेचे संदीप कोळेकर, ग्राममहसुल अधिकारी अमोल खेडकर, पांडुरंग गेजगे, सोपान गुंजाळ, धर्मेश खटके, सचिन कराळे, सरपंच नितीन नलवडे, उपसरपंच कैलास पवार, पोलीस पाटील नितीन पाटील उपस्थित होते. शिबिरामध्ये विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला. त्यामध्ये निकाली फेरफार २७, सात बारा दुरुस्ती १७, डिजिटल सात बारा ९२, आठ अ २७, जात प्रमाणपत्र २५, नॉनक्रिमीलेयर ५, उत्पन्न दाखले ३०,रहिवाशी प्रमाणपत्र २४, कमीजास्त पत्रक भूसंपादन १,वारस नोंद १७,सामजिक अर्थसहाय्य १३, नवीन शिधापत्रिका १३,कृषी विभागा मार्फत ट्रकटर ५ ,पॉवर टिलर २,पी. एम. किसान योजना २९,फार्मर आय डी ११, आरोग्य विभागा मार्फत तपासणी ३४,भूमीअभिलेख मार्फत८,इतर अधिकारातील तगाई बोजा १ असे ३८६ अर्ज प्राप्त झाले.त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करून काही प्रमाणपत्राचे वाटप हि करण्यात आले.तर राहिलेल्या बाकी अर्जावर प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रास्ताविक सचिन कराळे यांनी केले. तर सूत्रसंचालन संतोष महामुनी यांनी केले.

### राष्ट्रवादी पक्षाकडून सातारा जिल्हा निरीक्षकपदी नागेश फाटे

**पंढरपूर, दि.१५ मार्च-**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने निरीक्षक नेमण्यात आले असून पक्ष वाढीसाठी दिलेले योगदान लक्षात घेऊन सातारा जिल्ह्याच्या निरीक्षक पदाची जबाबदारी पक्षाचे निष्ठावान प्रदेशचे पदाधिकारी नागेश फाटे यांच्यावर देण्यात आल्याने सर्व स्तरातील मान्यवर मंडळींकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

याप्रसंगी बोलताना नागेश फाटे म्हणाले की, पक्षाने जो माझ्यावर विश्वास दाखवला आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पडेन असा विश्वास वरिष्ठ नेत्यांना देत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा.शरदचंद्र पवार, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, आमदार रोहित पवार, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील, खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, आमदार नारायण पाटील, आमदार उत्तम जानकर, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, कार्याध्यक्ष रवी पाटील यांच्यासह पक्षाच्या नेते मंडळींचे आभार मानले.

### डॉ. डिसले यांचे शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात मार्गदर्शन

**बार्शी, दि. १५ मार्च-**

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे गुरुवारी ग्लोबल टीचर प्राईझ विनर डॉ. रणजितसिंह डिसले यांच्या 'शालेय शिक्षणात एआयचा वापर जबाबदारीने आणि सुरक्षितपणे' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. गुंड यांनी प्रास्ताविक केले. व्याख्यानात डॉ. रणजितसिंह डिसले यांनी शालेय शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर आधारित माहिती कृतीसत्र स्वरुपात सादर केली. त्यांनी माहिती सुरक्षा तसेच एआयचा वापर करताना जबाबदारीची जाणीव या विषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. डिसले जे सध्या हॉर्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा फायदा डी.एड.च्या विद्यार्थ्यांना झाला. सूत्रसंचालन व आभार तसेच नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जे. पी. यांनी केले.

# साडेबारा हजार मुलींना 'लेक लाडकी'चा आधार

**पहिल्या टप्प्यात प्रत्येकी ५ हजार जमा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळावा आणि त्यांचे भविष्य सुरक्षित व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या 'लेक लाडकी' योजनेला सोलापूर शहर आणि जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील १२ हजार ४८३ मुलींना लाभ मिळाला असून पहिल्या टप्प्यातील प्रत्येकी पाच हजार रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. पिवळे व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुली या योजनेसाठी पात्र ठरत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे.

मुलींच्या शिक्षणाचा खर्च अनेक कुटुंबांना पेलवणे कठीण जात असल्याने काही मुलींना अर्ध्यावर शिक्षण सोडावे लागते. ही समस्या लक्षात घेऊन राज्य शासनाने १ एप्रिल २०२३ पासून 'लेक लाडकी' योजना सुरू केली. या योजनेतून मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत एकूण १ लाख १ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. ही रक्कम टप्प्याटप्प्याने थेट लाभार्थी मुलीच्या बँक खात्यात जमा केली जाते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मुलीचा जन्म महाराष्ट्रात झालेला असणे आवश्यक आहे. तसेच मुलीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असावे. पिवळे किंवा केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींनाच या योजनेचा लाभ मिळतो. योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य पाच टप्प्यांत दिले जाते. मुलीच्या जन्मानंतर जन्म दाखला व नोंदणी पूर्ण झाल्यावर ५ हजार रुपये, मुलगी पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीमध्ये ७ हजार रुपये, अकरावीमध्ये ८ हजार रुपये आणि मुलगी १८ वर्षांची झाल्यावर ७५ हजार रुपये अशी रक्कम दिली जाते. या अंतिम टप्प्यातील रक्कम मिळण्यासाठी मुलीचे शिक्षण सुरू असणे आवश्यक आहे.

जिल्हा महिला व बालविकास विभागाकडून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पात्र पालकांनी आपल्या मुलीच्या नावाने अर्ज जिल्हा महिला व बालविकास कार्यालयात सादर करावा लागतो. अर्ज करताना मुलीचे व पालकांचे आधारकार्ड, रेशनकार्ड, जन्म दाखला, रहिवासी दाखला, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत तसेच दुसऱ्या अपत्यानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. या योजनेचा लाभ एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलींनाच मिळू शकतो. सोलापूर जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून दक्षिण सोलापूर तालुक्यात सर्वाधिक सुमारे ८०० कुटुंबांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.मुलींच्या शिक्षणाला चालना देत त्यांना आर्थिक पाठबळ देणारी ही योजना सोलापूर जिल्ह्यातील अनेक कुटुंबांसाठी दिलासादायक ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

> 'लेक लाडकी योजना ही मुलींच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाची योजना आहे. १ एप्रिल २०२३ नंतर महाराष्ट्रात जन्मलेल्या पात्र मुलींना या योजनेचा लाभ दिला जात आहे. जिल्ह्यात आतापर्यंत बारा हजारांहून अधिक मुली लाभार्थी ठरल्या असून पालकांनी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा.'
>
> **प्रसाद मिरकले,**
> जिल्हा महिला व बालविकास अधिकारी.

### उपळाई (ठो) जिल्हा परिषद शाळेत महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) शाळेने विविध उपक्रमाचे आयोजन करुन महिला दिन साजरा केला. या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता भोंग, उपाध्यक्ष श्रीमती योगिता सदावर्ते व प्रमुख अतिथी श्रीमती वर्षा विष्णू यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल काळे यांनी केले. त्यानंतर आरोग्य पोषण, स्वच्छता व मार्गदर्शन, मासिक पाळी स्वच्छता जनजागृती या विषयावर आरोग्यसेविका श्रीमती वर्षा विष्णू यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी सुरक्षाविषयक उपाययोजना मार्गदर्शन व पोक्सो कायदा याविषयी दिपाली गोरे यांनी माहिती दिली. कायदेविषयक जनजागृती, महिलांचे हक्क,बालविवाह प्रतिबंधक कायदा याविषयी शाळेतील शिक्षिका श्रीमती सुवर्णगौरी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणाच्या हक्काचा कायदा व समानता कायदा याविषयी मुख्याध्यापक अनिल काळे यांनी मार्गदर्शन केले. शाळेची माजी विद्यार्थीनी ज्ञानेश्वरी पाटील हिनेही शाळेच्या जुन्या आठवणी सांगून ममार्गदर्शन केले. यावेळी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, मेहंदी व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापक काळे यांनी आभार मानले.




### राष्ट्रभाषा परीक्षेत रामभाऊ जोशी हायस्कूलचे यश

**३०० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रविष्ट असणारी राज्यातील एकमेव प्रशाला**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १५ मार्च-**

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा (हिंदी )पुणे अंतर्गत सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला.सदर परीक्षेत रामभाऊ जोशी हायस्कूल करकंबच्या विद्यार्थ्यांनीघवघवीत यश संपादन केले.राष्ट्रभाषा सभा पुणे यांचे वतीने घेण्यात आलेल्या सर्व परीक्षेस ३०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यामध्ये प्रथम श्रेणीत ७८,द्वितीय श्रेणीत १९५ तर तृतीय श्रेणीत ३३विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यामध्ये इयत्ता ५वी (राष्ट्रभाषा- बालबोधनी परीक्षा) ४१, इयत्ता ६वी(राष्ट्रभाषा- प्राथमिक परीक्षा) ४७,इयत्ता ७ वी (राष्ट्रभाषा प्रवेशिका परीक्षा) ५१, इयत्ता ८वी (राष्ट्रभाषा सुबोध परीक्षा) ६६, इयत्ता १०वी (राष्ट्रभाषा प्रबोध परीक्षा) १०१विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले.

या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशालेतील हिंदी विभाग प्रमुख तथा प्राचार्य हेमंत कदम, श्रअतुल अभंगराव,शकूर बागवान यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व यशस्वी विद्यार्थांचे दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानीय सचिव महेश चोप्रा, प्रशासक प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे,पर्यवेक्षक धनवंत करळे यांनी अभिनंदन केले.

### मोठी स्वप्ने पहा, पण मातृभूमीला विसरू नका

**वाळूज प्रशालेत डॉ. संदेश कादे यांची प्रकट मुलाखत**

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि १५ मार्च-**

विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पहावीत, चांगले शिक्षण घ्यावे आणि आपल्या गावाचे, समाजाचे व देशाचे नाव उज्ज्वल करावे. आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या मातृभूमीची आणि आपल्या शाळेची ओळख कधीही विसरू नये, असे प्रतिपादन डॉ. संदेश कादे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ व वाळूजचे सुपुत्र डॉ. संदेश ज्ञानोबा कादे (सनराईज हॉस्पिटल, सोलापूर व अबुधाबी) यांची प्रकट मुलाखत वाळूज प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत डॉक्टरांशी थेट संवाद साधला.



जीवनात यश मिळवायचे असेल तर कष्ट, सातत्य आणि प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचे आहेत. अडचणी येतातच; मात्र त्या अडचणींवर मात करून पुढे जाण्याची जिद्द ठेवली तर यश निश्चित मिळते, असेही डॉ. कादे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांमधील यशाबद्दल बक्षीस वितरण करण्यात आले.

याच कार्यक्रमाच्या निमित्ताने भगवंत नेत्र रुग्णालय, बार्शी यांच्या वतीने अत्याधुनिक यंत्रांच्या साहाय्याने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन व नेत्र आरोग्याविषयी माहिती देण्यात आली. गावातील अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी तानाजी कोल्हाळ, जनार्धन कादे, युवराज कादे, अमोल कादे, सोपान काकडे, उत्कर्ष मोटे, अजित कादे, अनिकेत कादे, यशवंत घाडगे, मोहन कादे, नाना कदम उपस्थित होते. प्रस्ताविक संजय राजगुरु यांनी केले, सूत्रसंचालन गुरुराज कुलकर्णी यांनी केले तर आभार बोधले यांनी मानले.

### शतायुषी चन्नवीरय्या स्वामीजींच्या पुण्याराधनानिमित्त नागणसूर येथे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १५ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथील श्री गुरु बम्मलिंगेश्वर बृहन्मठात शतायुषी लिं.चन्नवीरय्या स्वामीजी यांच्या पाचव्या पुण्याराधना कार्यक्रमानिमित्त मठाधिपती श्री श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली रविवार दि १५ ते २६ मार्च दरम्यान विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि. २० मार्च रोजी रात्री ८.०० वाजता काशीपीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात श्रीमती सितामाता शेळके प्रशालेच्या आदर्श विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा होणार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लिं. वासप्पा करोटे व लिं.गंगाबाई करोटे यांच्या स्मरणार्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अंदेवाडीचे वीरभद्र शिवाचार्य स्वामीजी, सलगरचे शिवबसव स्वामीजी यांचा गौरव सन्मान करण्यात येणार आहे. नूतन जि.प. सदस्य सिध्दाराम शिवमूर्ती, तंटामुक्त अध्यक्ष प्रशांत प्रचंडे, तालुका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील उपस्थित राहणार आहेत. कै. श्रेया विश्वनाथ शिवणगी यांच्या स्मरणार्थ शेळके प्रशालेच्या सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येणार आहे. दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ७.०० वाजता पूज्य शतायुषी लिं.चन्नवीरय्या स्वामीजी यांच्या आत्मज्योतीचे प्रज्वलन औसाचे डॉ.शांतवीर शिवाचार्य स्वामीजी, शिवयोगी शिवाचार्य स्वामीजी, बसवलिंग स्वामी, गुरुशांतलिंग शिवाचार्य स्वामीजी, प्रभू प्रशांत स्वामीजी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.गुरुवार दि. २६ रोजी सकाळी ६.०० वा. पूज्य श्री. लिं. शतायुषी चन्नवीरय्या स्वामीजींच्या क्रियासमाधीस रुद्राभिषेक, सायंकाळी ४.०० वाजता स्वामीजींच्या प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात येणार आहे.

## शासन, प्रशासनाने एकत्र काम केल्यास कामे गतिमान

**आमदार सुभाष देशमुख; होटगीत समाधान शिबीर**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १५ मार्च-**

शासन आणि प्रशासन दोन्ही मिळून जर हातात हात घालून काम केले तर निश्चितच कामकाज गतिमान झाल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.

ते होटगी येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी तहसीलदार किरण जमदाडे, जिल्हा परिषद सदस्य रामप्पा चिवडशेट्टी, पंचायत समितीचे सभापती संदीप टेळे सरपंच लक्ष्मीबाई गायकवाड, पंचायत समिती सदस्या अंबिका पाटील, पंचप्पा धनशेट्टी, बलवान गोतसुर्वे, बाजार समितीचे संचालक अतुल गायकवाड, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले, पोलीस उपनिरीक्षक कांबळे, नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे, नायब तहसीलदार विनायक कुलकर्णी, नायब तहसीलदार रुपाली करमाळकर आदी उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरासाठी प्रशासकीय अधिकारी शासनाच्या आदेशानुसार आपले कार्यालय सोडून ते आपल्या चेहऱ्यावरील काम पूर्ण झाल्याचा आनंद पाहण्यासाठी सर्व यंत्रणेसह आपल्या गावात आले आहेत. तेव्हा या शिबिरातून एकही नागरिक नाराज होऊन रिकाम्या हाती जाणार नसल्याची ग्वाही तहसीलदार किरण जमदाडे यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध पुतळ्याचे पूजन आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शाळा परिसरात आमदार सुभाष देशमुख व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शिबिरासाठी महसूल विभाग ग्रामपंचायत यांनी यंत्रणा सज्ज ठेवली होती, नागरिकांसाठी सावली, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था करण्यात आली होती. सुविधा कक्षाद्वारे तालुक्यातील सर्व मंडल अधिकारी व तलाठी यांनी प्रत्येक नागरिकांना अर्ज भरून देणे, विविध दाखले देणे, मार्गदर्शन केल्याने नागरिकांना शिबिराचा लाभ घेणे अधिक सोयीचे झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडल अधिकारी प्रतिभा घुगे, रियाज भाईजान, संतोष फुलारी, ग्राम महसूल अधिकारी शेखर शेड्याळ, सचिन सावळे,अजय राठोड, वामन जाधव, ग्रामसेवक सुरेश कोळी, पोलीस पाटील रेणुका इंगळे, कोतवाल मल्लू कोळी, सोनाली चिवडशेट्टी, अंगणवाडी सेविका अन्नपूर्णा फुलारी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन इंद्रजीत लांडगे तर असीम शेख यांनी आभार मानले.

**अडीच हजाराहून अधिक नागरिकांनी घेतला शिबिराचा लाभ**

१.पुरवठा व सेतु विभाग– ६९८
२.घरकुल वाळू वाटप– ८७
३.विविध दाखले, प्रमाणपत्रे व आधारकार्ड– ३९३
४.निराधार योजना व निवडणूक – १६२
५.७/१२ व खाते उतारा वितरण– ४०९
६.आरोग्य विभाग, पोलीस विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग, पशुवैद्यकीय विभाग, महापारेषण विभाग – ३१९
७. agriStack नोंदणी मंजूरी– ६६१

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

बार्शी : श्री भगवंत व लक्ष्मीस द्राक्षांची आरास. कै. दत्तात्रय विश्वनाथ जगदाळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या भगिनी मानेगांव धाकटे येथील सारिका साठे परिवाराच्यावतीने श्री भगवंत व लक्ष्मी चरणी द्राक्ष फळांची आरास करण्यात आली. ही आरास पुजारी सर्वश्री अनिल बडवे, शाम बडवे, सुशिल बडवे, निलेश बडवे, श्रेयस बडवे यांनी केली.







## महत्त्वाचे



### राष्ट्रीय महालोक अदालतमध्ये ५९९ प्रकरणे निकाली

**माळशिरस, दि. १५ मार्च-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली,उच्च न्यायालय मुंबई, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे अध्यक्ष एस.एस.शर्मा व सचिव पी.पी. पेठकर व रा.वी. ताम्हाणेकर अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश -१ माळशिरस यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण समिती व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महा लोकअदालत मध्ये तब्बल ५९९ प्रकरणे निकाली काढण्यात येऊन२ कोटी ७६ लाख ४७ हजार १९४ रकमेची वसुली करण्यात आली. यासाठी एकूण आठ पॅनल तयार करण्यात आलेले होते. पॅनल प्रमुख म्हणून रा. वि. ताम्हाणेकर अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती माळशिरस तथा जिल्हा न्यायाधीश -१ हे होते. लोक अदालतीत २९० न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यात आले तसेच दाखल पूर्व प्रकरणे (माळशिरस तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र ग्रामीण बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, नगरपरिषद, नगरपालिका नगरपंचायत,ग्रामपंचायत) यांची ३०९ प्रकरणे निकाली काढण्यात आली व गुन्हा कबुलीची प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोक अदालत यशस्वी होण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी एल. डी. हुली, एस. डी घनवट, बी. डी. गोरे, यु. बी. पेठे, ए. ए. व्यास, जी. एम. बिरादार, एम. जे. गायकवाड यांनी परिश्रम घेतले.



### वाटंबरेच्या श्वेता पवारची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड

**सांगोला,दि.१५ मार्च -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नुकत्याच जाहीर केलेल्या निकालाम ध्ये सांगोला तालुक्यातील वाटंबरे येथील श्वेता सखाराम पवार हिची खेळाडू कोट्यातून पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. या यशाबद्दल सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.सी.झपके यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. श्वेता पवारचे प्राथमिक शिक्षण वाटंबरे येथे तर माध्यमिक शिक्षण सांगोला विद्यामंदिर प्रशालेत झाले. यावेळी क्रीडा शिक्षक सचिन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वविध स्तरांवरील बॉक्सिंग स्पर्धेत सहभागी होऊन यश मिळविले होते. पुढे १२ वी पर्यंतचे शिक्षण जय हिंद कॉमर्स कॉलेज पिंपरी येथे तर पदवी पर्यंतचे शिक्षण बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे येथे घेतले. सन २०१९ मध्ये झालेल्या ७२ व्या विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेत तिने बॉक्सिंग क्रीडा प्रकारात कांस्यपदक मिळविले. एमपीएससीच्या २०२५ च्या परीक्षेमधून तिने महसूल सहाय्यक या पदाला गवसणी घालत पुणे शहराच्या उपनिबंधक कार्यालयात ती सध्या कार्यरत आहे. पुढे एमपीएससीच्या माध्यमातून तिने खेळाडूंच्या कोट्यातून सहाय्यक पोलीस निरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. .

**खेळाडूंनाही उत्तम नोकरीच्या संधी**

गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांबरोबरच खेळाडूंनाही राखीव जागांच्या माध्यमातून नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहून प्रयत्नांमध्ये सातत्य राखले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपले योग्य प्रयत्न पालकांच्या लक्षात आणून द्यावेत आणि पालकांनी मुलांना संधी द्यावी.

**श्वेता पवार,** नूतन पोलीस उपनिरीक्षक



### महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सत्यवान वाघमारे सन्मानित

**पिलीव, दि. १५ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात कार्यरत असणारे शिक्षक सत्यवान वाघमारे यांना पुणे येथील आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशनच्या वतीने सिने अभिनेत्री नेहा पटेले व अपूर्वा परदेशी यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्यवान वाघमारे यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्यवान वाघमारे यांना या अगोदर वाम नदादा जीवन गौरव पुरस्कार व इतर तब्बल चार राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल यांनी अभिनंदन केले.

# ‘लखन-सर्जा’ ने पटकावले दीड लाखांचे बक्षिस

## सहकार महर्षी केसरी बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १५ मार्च-**

वाशिम व छत्रपती संभाजीनगरच्या लखन-सर्जा बैलजोडी गाडीने सहकार म हर्षी केसरी बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित गाडी मालक मनोहर पाटील व साईनाथ पाटील यांना रोख रु.१ लाख ५० हजार व चषक बक्षीस तर बैलांना मानाची झुल,बाशिंग, शेंब्या,तुळशी हार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

अकलूज-चाकोरे रोडवर आनंदनगर येथे श्री.विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्टच्यावतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यस्मरणार्थ सहकार महर्षी केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते विजय गणेशोत्सव मंडळांनी आयोजित केलेल्या या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष होते. यात राज्यभरातील ३७२ बैलगाडा स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचा शुभारंभ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता मैदानाचे पूजन करून करण्यात आला. यावेळी आमदार रणजीत सिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील स्पर्धेचे प्रमुख अर्जुनसिह मोहिते-पाटील, सौभाग्यवती नंदिनी देवी मोहिते-पाटील व मोहिते-पाटील कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते.

५३ गटात महाराष्ट्र राज्य बैलगाडा संघटनेच्या नियमानुसार स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक फेरीत ७ बैलगाडा सोडण्यात येवुन फेरीतील प्रथम क्रमांकाच्या बैलजोडी उपांत्य फेरीतील विजेते अंतिम फेरीत ८: बैलगाड्या सोडण्यात आल्या. अंतिम फेरीत लक्ष्मण-सावकार मालक नवनाथ जगदाळे व भारत वळकुंडे वळकुंड(व्दितीय), साई-अर्जुन कार्तिक वावरे माळशिरस व अवतार पवार अंबड जालना (तृतीय) रायफल- सर्जा रणजित निंबाळकर साखरवाडी व आरोही घाडगे शिरसवाडी(चतुर्थ), चिक्या-बकासुर मोहील धुमाळ सुसगाव व अजित जगताप कारुंडे (पाचवा), बुलेट-राजा निखिल कोरडे खडकवासला व योगेश भगत शिरसूफळ(सहावा), छावा-बदाम विक्रम गोरे बागेहल्ली अक्कलकोट व तस्मिय्या सय्यद (सातवा), चिक्या- नाया आशुतोष जाधव कलेढोण व वाशीम एक्स्प्रेस कराड(आठवा)यांना अनुक्रमे १ लाख१० हजार,७१ हजार,६१ हजार,५१ हजार,३१ हजार,२१ हजार,११ हजार व स्मृती चिन्ह देण्यात आले.

यावेळी नंदिनीदेवी मोहिते पाटील, संयोजक मदनसिंह मोहिते पाटील,आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, खा.धैर्यशील मोहिते पाटील, जि.प.सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, अखिल भारतीय बैलगाडा शर्यत संघटनेचे अध्यक्ष नितीन शेवाळे, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, वैष्णवीदेवी मोहिते पाटील, भाऊसाहेब आंधळकर, सचिव राजेंद्र काकडे, विश्वस्त चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, वसुंधरा देवडीकर उपस्थित होते. पंचाचे काम विठ्ठल अर्जुन, लखन चव्हाण, लक्ष्मण पवार, गणेश काळे, आप्पा रुपनवर, देवीदास ढोपे, संतोष शिंदे, भैय्या मोरे, बाबुराव शेंडगे, सचिन साळुंखे, मनोज दडस, बाळासाहेब काळे, बाबा बोडरे यांनी पाहिले व समालोचन, सुनील मोरे केडगाव, प्रताप झांजुर्णे कोरेगाव विकास जगदाळे झेंडा पंच धनवडे बापू कोरेगाव यांनी केले. निसर्गरम्य परिसरात स्पर्धा पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी गर्दी केली होती.




अकलूज चाकोरे रोडवरील शिव कीर्ती बागेतील बैलगाडा शर्यत मैदानावर सकाळी स्पर्धा सुरू होण्याआधी असंख्य बैलगाडी प्रेमींनी गर्दी केली होती सोन्या, छोट्या, हर्निया, बुलेट थ्री नोट थ्री , बुलेट, सर्जा ,राजा बकासुर, सावकार आदी बैलांनी मैदान गाजवलेले होते त्यांचे प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बकासुर या गावठी प्रजातीच्या बैलाने गतवर्षी मैदान मारले होते मात्र यावेळी बकासुरणे निराशा केली

## जर्सी गायीच्या कालवडींचा छळ, एकावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ मार्च-**

जर्सी गायच्या २० कालवडींचा छळ केल्याप्रकरणी सांगोला पोलिसांनी एकावर कारवाई केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, शनिवार दि.१४ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास आरोपी आयुब अकबर मुजावर (वय-५४), रा.शेगाव, ता.जत, जि.सांगली याने सांगोला शहराजवळील पंढरपुर ब्रीज खाली त्याचे ताब्यातील एमएच १० डीटी ४५३७ या आयशर टॅम्पो मध्ये पाठीमागील हौदात काळ्या पांढऱ्या रंगाचे जर्सी गायची २० कालवडे क्षमते पेक्षा जास्त दाटीवाटीने कोंबुन त्यांना वेदना होईल अशा परिस्थीतीत कमी रूंदीच्या जागेत हालचाल करता येणार नाही, लोखंडी अँगलला दोरीने बांधुन तसेच त्यांना सदर वाहनात चारा, पाण्याची व औषधाची कोणतीही सुविधा नसताना त्यांचे अम ानुषपणे निर्दयीपणे कोंबुन, अज्ञात कारणास्तव घेवुन जात असताना सांगोला पोलिसांना मिळून आला. पोहेकॉ सर्जेराव वाघमोडे यांनी सांगोला पोलीस ठाणे कायदेशीर फिर्याद दिली आहे.

सदर कारवाई मध्ये ६ लाख रु.किं.चे १ आयशर टॅम्पो तसेच प्रत्येकी अंदाजे ५ हजार रुपये प्रम ाणे २० कालवडे असा ७ लाखांचा मुद्देमाल मिळाला.

## बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून भगवंत महोत्सवासाठी १० लाखांचा निधी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ मार्च-**

बार्शी शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री भगवंत यांच्या प्रकटदिनानिमित्त दरवर्षी साजरा होणाऱ्या भगवंत महोत्सव २०२६ साठी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या पाठपुराव्यामुळे या निधीला मंजुरी मिळाली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांच्या कार्यालयाकडून मिळालेल्या परवानगीनुसार, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या भगवंत महोत्सवामध्ये विविध उपक्रम राबविण्यासाठी हा निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या संदर्भातील प्रस्ताव बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मांडून हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. सन २०२४- २५ या आर्थिक वर्षात बाजार समितीचे उत्पन्न सुमारे १२.५५ कोटी रुपये असून ते मागील वर्षाच्या तुलनेत वाढलेले आहे. बाजार समितीकडे सुमारे २४.७० कोटी रुपयांच्या ठेवी असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली आहे. दरवर्षी बार्शी नगरपरिषद व भगवंत देवस्थानच्यावतीने भगवंत प्रकटदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या महोत्सवात धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रम, भजन, कीर्तन, शेतकरी गायन, जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी आणि बाजार समितीच्या कार्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी १० लाख रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार हा निधी खर्च करण्यास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांनी अटी व शर्तीसह अंतिम मंजुरी दिली आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या पुढाकारामुळे ग्रामदैवताच्या महोत्सवासाठी बार्शीच्या मिळालेला हा निधी महोत्सव भव्य व आकर्षक करण्यास मोठी मदत ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## भाळवणीत जागतिक ग्राहक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मार्च-**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जागतिक ग्राहक दिनानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्य विजय शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक पंचायतीचे प्रांत सदस्य विनोद भरते व ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास हे होते.

यावेळी उपसरपंच नितीन शिंदे, आरोग्य अधिकारी डॉ. निशा रोकडे, ग्राहक पंचायतीचे तालुका सदस्य शहाजी जाधव, प्रकाश माळी, राम कलढोणे, दीपक शेंडगे उपस्थित होते.



प्रारंभी ग्राहक पंचायतीचे आराध्य दैवत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी केले. सूत्रसंचालन तालुका उपाध्यक्ष प्रशांत माळवदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सदस्य शशिकांत देशपांडे यांनी मानले. यावेळी आशा वर्कर्स, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल मंदिर परिसरात तात्पुरत्या व्यवसायिकांची भाऊगर्दी



### व्यवसायिकांच्या अतिक्रमणांवर कारवाईची मागणी; मंदिर परिसरातील रस्ते भासू लागले अरुंद

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १५ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या भोवती असलेल्या कायमस्वरुपी दुकानदारांपेक्षा तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय करणाऱ्या व्यापारी, फ ेरीवाले, हातगाडीवाले यांची अतिक्रम णे मंदिर परिसरात वाढलेली दिसत आहेत. मात्र त्याकडे पालिका, महसूल तसेच पोलिस प्रशासनाचे पुर्ण दुर्लक्ष होत आहे.

वाढलेल्या अतिक्रमणामुळे सहाजिकच मंदिर परिसरातील सध्या अस्तित्वात असलेले आहे ते प्रशस्त रस्ते अरुंद किंवा छोटे पडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने तात्पुरत्या अतिक्रम णांवर कारवाई करावी, अशी मागणी वारकरी भाविक तसेच शहरातील नागरिकांतून होत आहे.

राज्यातील प्रमुख तिर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचे विठ्ठल मंदिर प्रसिध्द आहे. मंदिर परिसरातील रस्ते तसे बऱ्या पैकी प्रशस्त आहेत.

मात्र पूर्वी मंदिर परिसरातील कायम स्वरुपी स्थानिक दुकानदार मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करीत होते. मात्र गेल्या दोन, तीन वर्षापासून कॉरिडोरच्या भितीने स्थानिक नागरिकांची अतिक्रम णे कमी झालेली दिसत आहेत.

**चैत्री वारी तसेच अधिक मासात गर्दी वाढणार**

येत्या काही दिवसांवर चैत्र वारी आलेली आहे. त्या नंतर पुन्हा अधिक म ास आहे. त्यामुळे इथुन पुढच्या काळात पंढरपूरातील गर्दी मध्ये सातत्याने वाढ होत राहणार आहे. त्यामुळे मंदिर परिसरातील रस्ते भाविकांना चालण्यासाठी अपुरे पडणार आहेत. त्यामुळे प्रशासनाने आत्ता पासूनच मंदिर परिसरातील कायमस्वरुपी दुकानदारांना तंबी देवून त्यांना एका ठराविक रेषेच्या बाहेर आपली दुकाने आणण्यापासून मज्ञाव करावा. या बरोबरच मंदिर परिसरात तात्पुरते व्यवसाय करणारे जे विक्रेते आहेत त्यांचा देखील बंदोबस्त करावा, याशिवाय हातगाडी, फेरीवाले यांना देखील दुसरीकडे मोकळ्या ठिकाणी व्यवसाय करण्यासाठी जागा द्यावी तरच मंदिर परिसर सुटसुटीत दिसेल.

**मंदिराच्या सुरक्षेचा प्रश्न एरणीवर**

विठ्ठल मंदिर हे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असल्यामुळे मंदिराच्या सुरक्षेसाठी राज्याच्या गृहविभागाने कायमस्वरुपी खास पोलिस बंदोबस्त देवू केलेला आहे. मंदिरा बाहेर स्वतंत्र पोलिस चौकी देखील कार्यरत आहे. मात्र मंदिर परिसरातील फेरीवाले, हातगाडीवाले तात्पुरत्या स्वरुपातील व्यवसाय करणारे विक्रेते यांच्याकडे मंदिर परिसरात विक्री करण्यासाठी कोणताही परवाना नाही. त्यांची शासकीय दप्तरी कुठेही नोंद नाही.

**कॉरिडोर प्रकल्प रेंगाळला**

मंदिर परिसर प्रशस्त आणि मोकळा असावा यासाठी विठ्ठल मंदिर परिसरात शासनाकडून कॉरिडोर प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मात्र गेल्या दोन,तीन वर्षापासून या प्रकल्पाची नुसतीच चर्चा होत आहे. त्यासाठी कोणतीही ठोस कृती होताना दिसत नाही. सध्या जशी मंदिर परिसरात तात्पुरत्या व्यवसायीकांची भाऊगर्दी आहे तशीच गर्दी कॉरिडोर झाल्या नंतर देखील सुरुच राहिली तर कॉरिडोर करुन तरी काय उपयोग होणार, मंदिर परिसर पुन्हा आरुंद, चालण्यासाठी अपुराच पडणार असा देखील सूर मंदिर परिसरातील संभाव्य बाधित नागरिकांकडून आळविला जात आहे.